१८३१
म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
क्र. ५१९
REFBK-0004349

दत्तात्रय व्यंकटेश पै

ह्यांचीं

# निवडक भाषणें

शके १८९३

ग्रंथसंग्रहालय ठाणे
ग्रा. क्र. ३७९


किंमत ८ आणे.

REFBK-0004349

हिंदु छापखाना, मडगांव—गोवा.

ग्रं. सं. ठाणें
निबंध
५११

[redacted] व्यंकटेश पै

ह्यांचीं

# निवडक भाषणें

शके १८५३

किंमत ८ आणे.

हिंदु छापखाना, मडगांव.

# वाचकांस दोन शब्द

मी आजवर केलेल्या भाषणांपैकीं कांहीं निवडक भाषणें छापून काढलीं तर मागें आपण कोणत्या विषयावर सार्वजनिक रीत्या कोणते विचार व्यक्त केले ते स्वतःस व माझ्या वाचकमित्रांस एकत्रित सांपडण्याची सोय होईल असें मनांत आलें व त्यामुळेंच प्रस्तुत पुस्तकाचा जन्म झाला. वक्तृत्वाच्या सोयीसाठीं ह्या भाषणांमध्यें मुळांत ज्या द्विरुक्ति आणि जीं विशदीकरणें किंवा विस्तरणें उपयोगांत आणलीं होतीं तीं लेखनांत गाळलेलीं आहेत. पण त्यामुळें मूळ विधानांच्या हेतूंत यत्किंचितही विपर्यास होऊं नये अशी खबरदारी घेतलेली आहे. पुस्तकाच्या अवघ्या ५०० प्रती काढलेल्या आहेत. त्या खपून नुसता कागदछपाईचा खर्च निघाला तर आणखी कांहीं निवडक भाषणें छापावीं असा मानस आहे.

मडगांव, ता. १–४–३१.

दत्तात्रय व्यंकटेश पै.

# अनुक्रमणिका


| विषय | पृष्ठ |
|---|---|
| १ भावी गोमंतकाची पूर्वतयारी | १ |
| २ फिरंगी औदार्याचें सत्य स्वरूप | ९ |
| ३ स्वराज्याची मीमांसा | १३ |
| ४ हिंदुसंघटनेंत गोमंतकीय हिंदूंचें स्थान | २५ |
| ५ पार्लमेंटच्या प्रतिनिधीस— | २७ |
| ६ हिंदु संस्कृति रक्षणार्ह आहे काय ? | ३८ |
| ७–८ गोमंतकांतील शुद्धीचें रहस्य | ४२ |
| ९ लालाजींच्या स्मृतीस— | ५४ |
| १० सध्याच्या सामाजिक चळवळींचें स्वरूप | ५७ |
| ११ मराठा गायक वर्गास चार शब्द | ६२ |
| १२ गोमंतकांतील मराठीची स्थिति | ६९ |
| १३ दॉ. रॉश दिनीझ ह्यांना निरोप | ७८ |
| १४ कै. परांजपे ह्यांच्या स्मृतीस— | ८१ |
| १५ लोकसत्तावादी आल्मैद ह्यांचें कार्य | ८३ |

# पै ह्यांचीं निवडक भाषणें

———:o:———

## १ भावी गोमंतकाची पूर्वतयारी

[असोळणें येथील 'श्रीवेताळप्रासादिक ज्ञानमंदिर' ह्या संस्थेच्या वाचनालयांत ता. २२ मे १९२४ रोजीं श्री. दत्ताराम गोविंद कामत ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झालेलें व्याख्यान.]

भावी गोमंतकाची पूर्वतयारी कशी करावी ह्याचा विचार करण्याकरतां भावी गोमंतक कसा असेल हें आधीं पाहिलें पाहिजे. गोमंतकाची गतकालीन स्थिति आणि सद्यःकालीन प्रवृत्ति हे दोन बिंदु सांधून काढलेली रेषा भविष्यत्कालीन गोमंतकाची निदर्शक होईल. ह्या भावी कालाचा आपणास अनेक दृष्टींनीं विचार करतां येईल. पण आज मी मुख्यतः राजकीय दृष्टीनेंच विचार करणार आहें. ज्या कालाला उद्देशून मी 'भावी' असें विशेषण योजलेलें आहे तो अमुकच इतक्या वर्षांनीं येईल असें निश्चित सांगतां येत नाहीं. तो दूर जाणें अगर जवळ येणें हें आपल्या प्रयत्नांच्या कमीअधिक जोमावर व शहाणपणावर अवलंबून राहील.

चार शतकांपूर्वी फिरंग्यांनीं ह्या भूमीवर आपले पाय ठेवले. तिमोजी नाइकानें दिलेल्या हिंदुस्थानाच्या ओसरीवर हे फिरंगी पाहुणे नुसते हातपाय पसरूनच राहिले नाहींत, तर त्यांनीं तिच्या

मालकाचें अंत:करण कुरतडून काढण्याचाही प्रयत्न केला व तो बऱ्याच अंशीं सफल झाला. फिरंगी प्रथमत: येथें पैशाकरतां आले. पण पुढें सत्तेकरतां सत्ता आणि सत्तेकरतां आत्मीयता ह्यांची त्यांना हांव सुटली. फिरंगी लोक धर्मवेडे तर होतेच. पण त्यांच्या धर्मप्रसाराच्या मुळाशीं 'ज्ञेंतियां'ना मोक्ष मिळवून द्यावा एवढा एकच हेतु मात्र खास नव्हता. हिंदुस्थानच्या संपत्तीच्या झऱ्याचें पाणी आपणास सदोदित बिनधोक प्यावयाचें असेल तर त्याच्याभोंवतीं आपल्या सत्तेचें कुंपण अवश्य घालून ठेवलें पाहिजे, आणि हें कुंपण कायम राहावयाचें असलें तर हिंदी लोकांचें हिंदीपण नष्ट करून त्या जागीं फिरंगीपण खिळवलें पाहिजे हें पोर्तुगीज मुत्सद्द्यांनीं तेव्हांच ताडलें होतें. आफाँस द आल्बुर्कर्कानें हिंदी आणि फिरंगी लोकांच्या विवाहसंबंधाचा इतक्या नेटानें पुरस्कार केला तो ह्याचसाठीं. केवळ धर्माचा प्रसार फिरंग्यांस करावयाचा असता तर तो हिंदी लोकांची भाषा, पोशाख, खाद्यपेय, वाङ्मय, वैद्यक इत्यादींचें रक्षण करून करतां आला असता. पाद्री लोकांच्या ज्या सभा भरल्या त्यांत धर्मप्रसार जुलूमजबरदस्तीनें न करण्याचे अनेकदां ठराव झाले होते. धर्मप्रसारार्थ देशी भाषेचा अभ्यास करण्याबद्दलही शिफारशी झाल्या होत्या. पण केवळ धर्मप्रसारानें आपला हेतु तडीस जाईल कीं नाहीं अशी शंका मुत्सद्द्यांस वाटली असावी. पाद्रीशाही धर्माच्या दैविक नांवाखालीं जीं सैतानी कृत्यें करते त्यांमुळें आपल्या राज्यविस्तारास अडचणी उपस्थित होतील हें राज्यकर्त्यांना कळत नव्हतें असें नाहीं. पण धर्माबरोबरच आपली

संस्कृति, भाषा, वाङ्मय, इतिहास व आचारविचार ह्या लोकांवर जर एकदां आपण लादूं शकलों तर हातीं आलेलें हें संपत्तीचें आगर यावच्चंद्रदिवाकरौ आपल्याकडे राहील अशी फिरंगी मुत्सद्दयांना कल्पना आली असावी. नपेक्षां धर्माच्या नांवानें होणारीं दुष्ट कृत्यें सर्वस्वी नापसंत व तीं बंद करण्याचें सामर्थ्य असतांही कित्येक सरकारी अधिकाऱ्यांनीं पाद्रीशाहीकडे जो कानाडोळा केला त्याची उपपत्ति लागत नाहीं. हिंदी लोकांचें स्वत्व खच्ची करून त्यांच्यांत फिरंगीपण भिनविलें म्हणजे ते आपणापासून निराळे होण्याची भीति नाहीं ही गोष्ट अनेक पोर्तुगीज राजकारणी लोकांच्या लक्षांत आली होती असें म्हणण्यास पुरावे आहेत. आपणास जेतेपणाचें समाधान कायमचें मिळावें आणि हिंदी लोकांस जितपणाचें दुःख केव्हांही वाटूं नये असा हा अत्यंत खोल व दूरदर्शी डाव होता. फिरंग्यांच्या सुदैवानें आणि आमच्या दुर्दैवानें तो बव्हंशीं साधला असें आपल्यास पोर्तुगीज हिंदुस्थानच्या परिस्थितीचा विचार केला असतां सहज दिसून येईल. ब्रिटिश लोकांनीं राज्यविस्तार फार केला. संबंध हिंदुस्थान त्यांनीं आपल्या घशांत उतरविलें.पण दीड—दोन शतकांच्या आंतच तें ओकून टाकावें लागतें कीं काय अशी त्यांना भीति उत्पन्न झाली आहे. उलटपक्षीं चार शतकें भरून गेलीं तरी फिरंगी निश्चित आहेत. राज्यविस्ताराच्या दृष्टीनें फिरंग्यांचें धोरण चुकलें, इंग्रजांचें साधलें आणि राज्याच्या दृढीकरणाच्या दृष्टीनें इंग्रजांचें चुकलें, फिरंग्यांचें साधलें असेंच म्हणावें लागतें. ब्रिटिश हिंदुस्थानांतील लोकांस दीडशें वर्षांच्या आंतच पूर्ण स्वातंत्र्याची इच्छा झाली, पण

पोर्तुगीज हिंदुस्थानांतील लोकांच्या मनावरून त्याचें वारेंही जात नाहीं ह्याचें मूळ फिरंग्यांच्या, फार जुन्या काळापासून आजच्या घटकेपर्यंत चालत आलेल्या, धोरणांतच सांपडतें. ब्रिटिश हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य नष्ट झाल्यास फार काळ लोटला नसल्यानें त्याच्या स्वातंत्र्याच्या कल्पना जिवंत आहेत, आणि गोव्याचें स्वातंत्र्य नष्ट झाल्यास फार काळ लोटला असल्यानें त्याच्या स्वातंत्र्याच्या भावना मेल्या आहेत असें सांगण्यांत येतें. पण तें बरोबर वाटत नाहीं. गोमंतकाचें स्वातंत्र्य नष्ट होऊन एकाएकीं चारशें अगर अधिक वर्षें झालीं असें नव्हे. ब्रिटिश हिंदुस्थानाचें स्वातंत्र्य नष्ट झाल्यास जितकीं वर्षें झालीं तितकीं वर्षें होऊन गेल्याचा काळही गोव्यानें पाहिला होता. मग त्या वेळीं स्वातंत्र्याची कल्पना लोकांस कां आली नाहीं ? असो.

फिरंगी लोकांनीं येथील राज्यकारभारांत जें धोरण स्वीकारलें त्यामुळें येथील लोकांची कशी अधोगति झाली आहे ह्याचें चित्र आज नव्यानें रेखाटण्याची गरज नाहीं. येथें आज हिंदु व ख्रिस्ती असे दोन प्रमुख समाज आहेत. ते वंशपरंपरेनें, रक्तामांसानें एकच आहेत. एकाच भूमीपासून ते आपलें जीवितसंरक्षण करीत असतात. हितसंबंधांच्या दृष्टीनें ते एकमेकांशीं गुंतलेले आहेत. पण त्यांचीं तोंडें परस्परभिन्न दिशांकडे झालेलीं आहेत. एका समाजांतील थोर व्यक्तींची दुसऱ्या समाजांतील थोर व्यक्तींशीं ओळख नाहीं; एकाच्या भावना दुसऱ्याला माहीत नाहींत; एकाचें दुःख तें दुसऱ्याचें सुख असेही कित्येक प्रसंग येतात. ख्रिस्ती समाजाला आपण हिंदी आहोंत ह्याचा विसर पडला व त्यानें

आपलें सर्वस्व पोर्तुगालास विकून टाकलें. त्यामुळें हा समाज हिंदी ह्या नात्यानें जगास मृतवत् झाला आहे. ज्याला स्वाभिमान नाहीं त्याला जगांत पुसतो कोण ? हिंदु समाजानें स्वत्वबीजाचें रक्षण केलें. पण त्यापासून वृक्ष वार्धास लागून गोड फळें येण्यास वावच मिळाला नाहीं. अगदीं कहराच्या वेळीं हिंदूंनीं आपला स्वाभिमान अभिमानास्पद रीतीनें व्यक्त केला; पण स्वास्थ्याच्या काळांत त्याच्यावर मळ सांचला. खिस्ती समाजाचें दडपण ह्या समाजावर फार पडलें व अजूनही तें पडत आहे. आपले योग्य आचारविचार, आरोग्यकारक कपडेलत्ते, वीर्यवान् वाङ्मय ह्यांच्याकडे दुर्लक्ष होण्याच्या मुळाशीं हें खिस्ती समाजाचें दडपणच पुष्कळ अंशीं आहे.

पण हें दडपण दिवसेंदिवस कमी कमी होत जाईल आणि कालांतरानें समूळ नष्ट होऊन उलट हिंदु समाजाचाच खिस्ती समाजावर वचक बसेल अशीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं आहेत. असें होण्याचें कारण हिंदु समाजांत झालेली जागृति होय. ह्या जागृतीचें सर्व श्रेय रिपब्लिकास दिलें जातें. पण मला तसें वाटत नाहीं. हिंदु समाजाच्या जागृतीचें श्रेय ब्रिटिश हिंदुस्थानांतील चळवळीस दिलें पाहिजे. रिपब्लिक होण्यापूर्वींच हिंदु समाजांत जागृति दिसूं लागली होती. रिपब्लिकच्या आधीं ज्याला खिस्ताची प्रार्थना किंवा 'दौत्रिन' येत नाहीं, त्याला पोर्तुगीज प्राथमिक शाळेचा शिक्षक होतां येऊं नये असा कायदा झाल्यावेळीं हिंदूंनीं पणजीस सभा वगैरे भरवून ही जागृति व्यक्त केली होती. रिपब्लिकमुळें तिला थोडी पुष्टि मिळाली असण्याचा जसा संभव

आहे तसाच, 'रिपब्लिक झालें. आतां आपणास सर्व कांहीं मिळेल' अशा आनंदातिशयानें, हिंदूंत शिथिलताही उत्पन्न झाली असण्याचा संभव आहे. तें कसेंही असो. रिपब्लिक झालें, पण धार्मिक सवलतींशिवाय आपणास विशेष कांहीं मिळालें नाहीं, आपलें हिंदराष्ट्रीयत्व अजून सरकारकडून कबूल केलें गेलें नाहीं, आपल्या समाजबंधनांना अजून कायदेशीरपणें मान्यता दिली गेली नाहीं, आपल्या भाषेला मताधिकार मिळाला नाहीं, आपल्या इतिहासाचें, आपल्या वाङ्मयाचें, आपल्या कलांचें, आपल्या शास्त्रांचें संगोपन व संवर्धन होण्याची रिपब्लिकनें झाली तरी काडीइतकीही तजवीज केली नाहीं, ह्याची आतां विचारी लोकांना जाणीव होऊं लागली आहे. ही जाणीव अधिकाधिक तीव्र होत जाईल व तीव्रतेप्रमाणें लोक प्रयत्नास लागतील आणि कांहीं गोष्टी साध्यही करतील. 'कांहीं' म्हणावयाचें कारण हेंच कीं, वर सांगितलेल्या सर्वच्या सर्व गोष्टी गोव्याच्या अल्प विस्तारामुळें अंमलांत येऊं शकणेंच अशक्य आहे. पण त्या साध्य झाल्याशिवाय आपलें पूर्ण समाधान होणार नाहीं; किंवा दुसऱ्या शब्दांनीं सांगावयाचें म्हणजे आकुंचित क्षेत्राचे दुष्परिणाम त्यांना पटतील. ते टाळण्याकरतां अर्थातच क्षेत्राचा विस्तार करण्याची बुद्धि उत्पन्न होईल.

ह्यापुढील माझें भाषण आपणास शेख महंमदाचें राज्य—किंवा सुंदर शब्दांनीं सांगावयाचें म्हणजे एका उत्तम कल्पनावाद्याचें (Idealista) मनोराज्य--वाटेल. पण परिस्थितीचा विचार केला तर तें आपणास पटल्याशिवाय मात्र राहाणार नाहीं अशी माझी पूर्ण

खात्री आहे. क्षेत्रविस्तार करणें म्हणजे जेणेंकरून गोव्याचें क्षेत्र आकुंचित झालें आहे तें कारण नाहींसें करणें. ही गोष्ट आजच शक्य नाहीं हें मी जाणतों. पण ती तुम्हांआम्हांला टाळतां येणारी गोष्ट नव्हे. ती आज ना उद्यां घडून येईलच येईल. म्हणजे त्रिखंड झालेला हा हिंदुस्थान पुन्हा अखंड होईल. त्या वेळीं सबंध हिंदुस्थान हें एक संयुक्त राष्ट्र होईल. आणि दरेक प्रांत त्याचा घटक बनेल. गोवें अर्थातच महाराष्ट्राचा एक जिल्हा होईल. व आपण गोमन्तकस्थ लोक खरोखर सुखी होऊं. असो. तात्पर्य हें कीं, गोवें व महाराष्ट्र ज्या दिवशीं एक होतील त्याच दिवशीं आपले सर्व मनोरथ पूर्ण होतील असें सर्वांना वाटूं लागेल.

आपल्या ख्रिश्चन बंधूंतही ह्या दृष्टीनें विचार करणारे लोक निपजले आहेत. प्रो. पेद्रु लेयांव बार्रुश्, प्रो. मार्तीनु फ्रां. शा. द सौझ, ल्वासयु मिरांद (पुत्र), देझिदेर्यु फ्रीयश्, दो. सांतान रुद्रीगिश्, आपल्या ह्या गांवचे दो. कायतानु व्हाज इत्यादि मण्डळी हिंदी दृष्टीची बनली आहे. त्यांचे विचार अजून अस्पष्ट आहेत. पण ते पुढें स्पष्ट होतील व महाराष्ट्राबाहेर राहिलों असतां आपला खरा उद्धार होणार नाहीं, ह्याची त्यांना हिंदूइतकीच तीव्र जाणीव होईल. तेव्हां दोन्ही समाजांचे प्रयत्न एकीकृत होतील व त्याच्या जोरावर आपण इष्ट कार्य साध्य करूं.

भावी गोमंतकाचें पुसट चित्र मी आपणापुढें रेखाटलें आहे. वारा वाहविणें किंवा बंद करणें नावाड्याच्या हातांत नाहीं. पण वाहणाऱ्या वाऱ्याप्रमाणें शीड धरून आपली नौका इष्ट स्थळीं पोंचवणें किंवा उलट दिशेनें वल्हवून समुद्रास्तृप्यंतु करून घेणें

हें त्याच्याच शहाणपणावर किंवा मूर्खपणावर अवलंबून असतें. आमची इच्छा असो किंवा नसो, हिंदुस्थान अविभाज्य आहे [India est una] व तें तसें राहिलें तरच आपण पूर्ण सुखी होऊं ही कल्पना लोकांस पटून तसें एक दिवस प्रत्यक्ष घडून आल्याशिवाय राहाणार नाहीं. हा जो वारा वाहूं लागला आहे त्याला अनुसरूनच आपण आपल्या प्रयत्नाची दिशा ठरवली पाहिजे. कालाच्या ओघाच्या विरुद्ध जाण्याचा आपण प्रयत्न करूं तर त्यांत गडप होऊन जाऊं.

गोमन्तकाच्या ह्या भावी कालाची पूर्वतयारी, सध्याच्या परिस्थितींत, म्हणजे राजकीय बाबत जशाची तशीच असतांना, आपणास कशी करतां येईल तें आतां थोडक्यांत पाहूं. हिंदु तरुणांनीं आपण हिंदी आहोंत ही भावना सदोदित जागृत ठेवावी व आपल्या संस्कृतीचें योग्य ज्ञान मिळवून तें आपल्या ख्रिस्ती बंधूंस द्यावें. महाराष्ट्राशीं एकात्मता उत्पन्न होण्याकरतां, महाराष्ट्र-साहित्य-संमेलन, हिंदुमहासभा, इत्यादींशीं समरस होण्याचे प्रयत्न करावे; मराठी व हिंदी भाषांचें शिक्षण वाढवावें. आणि देशकार्याकरतां दिवसांतून थोडा तरी वेळ खर्च करण्यास केव्हांही विसरूं नये.

# २. फिरंगी औदार्याचें सत्यस्वरूप

[ डिचोली येथील 'विद्यावर्धक मंडळा'नें साजरा केलेल्या श्रीसरस्वत्युत्सवांत ता. १० आक्टोबर १९२४ रोजीं श्री. यशवंत सूर्याजीराव सरदेसाई ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झालेलें व्याख्यान.]

मनुष्य आहे त्याच स्थितींत समाधान मानूं लागला म्हणजे त्याची प्रगति खुंटलीच म्हणून समजावें. आपल्या पो. हिंदुस्थानांत रिपब्लिक आहे, स्वराज्य आहे, राज्यकर्त्यांत व जित प्रजेंत भेदभाव मानला जात नाहीं, व ह्यामुळें आपणास मिळालें तें पुष्कळ व राहिलें तें फार थोडें अशी आमच्यांतील कित्येक लोकांनीं स्वतःची समजूत करून घेतली आहे. ह्या समजुतीच्या मुळाशीं जें प्रमेय गृहीत धरलें जातें तें हें कीं, फिरंगी लोक फार उदार आहेत. आमच्या प्रगतीला खीळ घालणारे जे अनेक अनिष्ट ग्रह आमच्यांत भरून राहिले आहेत त्यांतच ह्याचीही गणना केली पाहिजे. सबब, त्याची मीमांसा करून तो कसा चुकीचा आहे हें दाखवण्याचा मी प्रयत्न करीत आहें. प्रयत्न म्हणण्याचें कारण ह विषयच असा आहे कीं, त्याची मीमांसा एकाद्या व्याख्यानांत करतां येणें शक्य नाहीं. फिरंग्यांच्या उदारपणाची मीमांसा करण्याकरतां त्यांच्या अमदानीचे आपण ३ विभाग करूं. पहिल्या विभागांत गोवें घेतल्यापासून इंकिजिसांव बंद होईपर्यंतचा म्हणजे सन १८१२ पर्यंतच्या ३ शतकांचा काल येईल. दुसऱ्यांत १८१२ पासून १९१० पर्यंतच्या एका शतकाचा अंतर्भाव होईल व तिसरा विभाग रिपब्लिक झाल्यापासून आजपर्यंतच्या कालावधीनें

बनेल. राज्य कमावण्याच्या व चिरस्थायी करण्याच्या हेतूनें फिरंग्यांनीं जे मार्ग अंमलांत आणले त्यांच्या दुष्ट-सुष्टपणावरून हे विभाग केलेले आहेत. पहिल्या विभागांत त्यांनीं जीं क्रूर कृत्यें केलीं तीं औदार्याचींच लक्षणें समजावयाचीं काय? त्या वेळीं येथील इतके लोक परप्रांतीं गेले कीं, त्यामुळें देश उध्वस्त व व निर्जन बनला आहे असें येथील अधिकाऱ्यांनींच पोर्तुगालास कळवलें होतें. ह्या परप्रांतीं गेलेल्या लोकांस एकाद्यानें असा प्रश्न केला असता कीं, "बाबांनो, तुम्ही असे अन्नवस्त्राविणें केविलवाण्या स्थितींत बायकामुलांसह, आपल्या दर्जास न शोभणारी हमाली करूनही जे भटकत असतां ते कां?" आणि त्यांनीं जर "आमच्या राजकर्त्यांच्या औदार्यामुळें" असें उत्तर दिलें असतें, तर तें खरें मानणारा एकादा तरी इसम निपजता का? औदार्य हें हजारों कुटुंबांना देशोधडीस लावण्याचें कारण होऊं शकतें ही गोष्ट फक्त फिरंगी व फिरंगाळलेले लोकच मात्र मान्य करतील! तात्पर्य हें कीं, फिरंगी लोक आपल्या अमदानीच्या पहिल्या विभागांत उदार होते असें मानणें म्हणजे 'औदार्य' शब्दाची विटंबनाच करणें होय! आतां दुसऱ्या विभागाकडे पाहूं. ह्या विभागांत पूर्वीसारखे अत्याचार झाले नाहींत. पण हिंदु लोकांच्या देवळांसमोर प्रेतें ठेवणें, त्यांच्या उत्सवांना बंदी करणें, त्यांची पदोपदीं अवहेलना करणें वगैरे प्रकार चाललेच होते. फिरंगी औदार्याची ठळक खूण म्हणून जिच्याकडे बोट दाखवण्यांत येतें ती गोष्ट ह्याच विभागाच्या पहिल्या चरणांत म्हणजे सन १८२८ सालीं घडली. आणि ती

म्हणजे ह्या वर्षी पोर्तुगीज हिंदुस्थानाला स्वतःचे दोन प्रतिनिधि पोर्तुगालच्या पार्लमेंटांत पाठवण्याचा हक्क मिळाला ही होय. हा हक्क कोणास मिळाला ह्याचें बारकाईनें संशोधन केलें म्हणजे हा औदार्याचा डोलारा कोलमडून खालीं पडतो. मी जर माझ्या बायकोला उत्तम वस्त्रें लेवविलीं, तिला सुग्रास अन्न खावविलें तर मला तुम्ही 'उदार' म्हणाल काय ? किंबहुना मी एकाद्या मुलाला दत्तक घेऊन त्याला माझी सगळी इस्टेट दिली तर माझ्या औदार्याची आपण किती किंमत कराल ? ज्या मुलाला मी दत्तक घेतलें, त्याला स्वतःचें नांव सोडावें लागलें, आपल्या बापाच्या व कुलाच्या नांवावर तिलांजलि द्यावी लागली, आपल्या मातृग्रामाला लाथ मारावी लागली, व इतकें झाल्यावर मीं त्याला माझें म्हणून नांव दिलें, मी मेल्यावर माझी उत्तरक्रिया तो करील अशी खात्री करून घेतली व नंतरच त्याला माझी सगळी मालमत्ता मीं बहाल केली ! ह्यांत माझें औदार्य तें काय ? माझ्या सुखाला, माझ्या कीर्तीला कारण होणाऱ्यावर व मलाच सर्वस्व समजणाऱ्यावर मीं प्रीति केली ह्यांत उदारपणा तो कोठें आहे ? ज्याच्यापासून मला कसलाही नैतिक किंवा भौतिक फायदा नाहीं, ज्याचे पुष्कळ आचारविचार, मतें व ममत्व हीं माझ्यापासून भिन्न आहेत त्याला मीं जर कांहीं दिलें असतें तर त्याची गणना औदार्याच्या सदरांत करतां आली असती. प्रतिनिधि पाठवण्याचा जो हक्क पोर्तुगीज हिंदुस्थानास मिळाला त्याची गोष्ट अशीच आहे. ज्यांनीं फिरंगी भाषेचा अंगीकार केला, ज्यांनीं 'हिंदी नागरिक' ह्या आपल्या मूळ नांवावर पाणी सोडून पोर्तुगीज नागरिकत्व

पत्करलें, ज्यांनीं आपल्या पूर्वजांचें स्थान आफाँसु, वास्कु, पेद्रु, लाद्रु, आंद्रु, फोर्सू इत्यादिकांना दिलें, ज्यानें आपल्या मातृपदाचा मान हिंदुस्थानाकडून काढून पोर्तुगालाला दिला, एकंदरींत जे हिंदी ह्या नात्यानें जिवंतपणींच मरून फिरंगी ह्या नात्यानें मेल्याशिवाय पुनर्जन्म पावले, त्यांनाच हा हक्क देण्यांत आला ! म्हणजे ही इस्टेट फिरंग्यांनीं आपल्या दत्तक पुत्राला, आपल्या कायदेशीर व नैतिक वारसाला बहाल केलेली आहे. 'तुमचा धर्म सांभाळा, तुमची संस्कृति वाढवा, तुमच्या कलांचें व विद्यांचें संगोपन करा व इतकें करूनही आम्ही तुम्हांला अमुक अमुक हक्क, केवळ माणुसकीला शोभतील म्हणून देतों' असें जर फिरंग्यांनीं सांगितलें असतें व तदनुसार केलें असतें तर त्यांच्या औदार्यांत कांहीं तथ्य राहातें ! ज्या सालीं हा हक्क देण्यांत आला त्याच्या आगेंमागें आलेल्या वर्षांतही फिरंग्यांनीं नीच कृत्यें केलीं होतीं व सन १९१० सालापर्यंत तीं चाललीं होतीं. १९०७ सालीं हिंदु लोकांना शिक्षक होण्याची मनाई करण्यांत आली होती, ह्यावरूनही त्यांनीं जे हक्क दिले ते आपल्या मानसपुत्रांसच दिले होते हें दिसून येईल. १९१० त रिपब्लिक झालें. पुढें १९१७ त स्वराज्य मिळालें, पण हिंदी भाषा, हिंदी विद्या, हिंदी कला, हिंदी संस्कृति ह्यांची काय दशा आहे ह्याचा विचार करा. जे लोक १ ल्या विभागांतील ३ शतकांत उदार नव्हते, दुसऱ्या विभागांत येणाऱ्या एका शतकांतही जे उदार झाले नाहींत, ते यक्षिणीनें कांडी फिरवल्याप्रमाणें १९१० सालांत एकाएकीं उदार बनूं शकतील काय ? चारशें वर्षांचा दीर्घकालीन स्वभाव ५

आक्टोबरच्या एका दिवसांत बदलण्यास जर फिरंगी समर्थ होतात तर ते तितक्याच अवधींत नवी सृष्टि कां उत्पन्न करूं शकणार नाहींत? असो. रिपब्लिकच्या अमदानींत जे सौम्य प्रकार दिसून आले त्यांची मीमांसाही, प्रतिनिधि पाठवण्याच्या हक्काच्या मीमांसे-सारखीच लावतां येते. पण तें करण्याला आतां वेळ नाहीं.

---

## ३. स्वराज्याची मीमांसा

[ मडगांव येथील 'सारस्वत ब्राह्मण समाज' संस्थेतर्फे होणाऱ्या वार्षिक व्याख्यानमालेंत ता. १५ एप्रिल १९२६ रोजीं श्री. जनार्दन विष्णु कामत ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झालेलें व्याख्यान. ]

आज जगांत सर्वत्र धडपड चाललेली दिसून येते. ही धडपड जशी व्यक्ति व्यक्तिशः करीत आहे तद्वतच समाज समुदायशः करीत आहे. ह्या धडपडींचीं रूपें नानाविध आहेत. त्यांपैकीं समाजाच्या राजकीय धडपडीविषयीं आपणास आज बोलावयाचें आहे. स्वतंत्र देशांत असो, परतंत्र देशांत असो, राजकीय चळवळीला सर्वत्र प्राधान्य आलेलें असतें. आणि ह्याचें कारण एवढेंच कीं, समाजाच्या सर्व अंगांवर राजकीय अंगाची म्हणजे सरकारची सत्ता चालत असते. जिला आपण निव्वळ सामाजिक स्वरूपाची म्हणूं अशी प्रौढविवाहाची चाल जर आपल्यांत प्रचलित करावयाची झाली तर तें सरकारी कायद्याच्या जोरावर जितक्या लवकर घडवून आणतां येईल तितक्या लवकर इतर कशानेंही घडवून आणतां येणार नाहीं; मग कायद्याच्या

जोरावर घडवून आणलेली सामाजिक सुधारणा समाजाला हितकारी ठरो अगर अहितकारी ठरो. सामाजिक सुधारणेशिवाय राजकीय सुधारणा अशक्य आहे असें जें कित्येकांचें मत आहे त्यांत तथ्य किती आहे हा प्रश्न वेगळा. पण त्यावरून एक गोष्ट निर्विवाद दिसून येते ती ही कीं, सामाजिक सुधारणेपेक्षां राजकीय सुधारणा अधिक महत्वाची आहे. कारण त्या म्हणण्यांत, सामाजिक सुधारणेला तितक्यापुरतें साधनस्वरूप देऊन राजकीय सुधारणेला साध्यस्वरूप दिलेलें आहे. आणि साधन हें साध्यापेक्षां केव्हांही गौणच. तात्पर्य हें कीं, राजकीय चळवळ ही कितीही कष्टदायक असली तरी समाजाच्या इतर सर्व अंगांवर तिची सत्ता चालत असल्यामुळें ती स्वतंत्र देशांसही टाळतां येत नाहीं. मग परतंत्र राष्ट्रांना ती कशी टाळतां येईल?

स्वतंत्र असलेल्या इंग्लंडांत काय किंवा परतंत्र असलेल्या आफ्रिकेंतील रीफ लोकांच्या प्रदेशांत काय, राजकीय चळवळ सारखी चालली आहे. अवघ्या ९ लक्ष रीफ लोकांनीं स्पेन व फ्रान्स अशा दोन बलाढ्य राष्ट्रांशीं युद्ध पुकारून त्यांना वठणीवर आणलें ह्यावरून रिफांच्या स्वातंत्र्येच्छेबद्दल कौतुक व आदर वाटावयास लागतो. आणि तीव्र स्वाभिमान व प्राणत्यागापर्यंत स्वार्थत्याग करण्याची तयारी असल्यास गोव्याएवढेंही क्षेत्रफळ नसलेला एकादा प्रदेश बलाढ्य राष्ट्रांनाही कसा नमवूं शकतो ह्याचें प्रत्यंतर पटतें. ब्रिटिश हिंदुस्थानांतही ही राजकीय चळवळ जोरांत चालली आहे हें तिकडील वृत्तपत्रांच्या वाचकांस माहीत असेलच. 'स्वराज्य' मिळवावें हें तेथील सर्व पक्षोपपक्षांचें

ध्येय निश्चित झालेलें आहे. पण तें मिळवावें कसें, ह्याबद्दल त्या पक्षांत तीव्र मतभेद पडलेले दिसून येतात. ह्या मतभेदांमुळें स्वराज्य दुरावेल किंवा जवळ येईल हा प्रश्न निराळा. पण ह्या मतभेदांमुळें जे वादविवाद तिकडे चालले आहेत त्यांमुळें जनतेला राजकारणविषयक प्रश्नांचा सांगोपांग अभ्यास करण्यास फार सुलभ होणार आहे. आपल्या ह्या गोमंतक प्रांतांतही 'स्वराज्य'-विषयक थोडी हालचाल चाललेली आहे. ब्रिटिश हिंदुस्थानांत 'स्वराज्य' मिळालें तें २ आणे असून मिळवावयाचें तें १४ आणे आहे असें म्हणतात. तर आपल्या गोव्यांतले महान् महान् मुत्सद्दीही आपणास मिळालेलें स्वराज्य भरीव असून तेंच आपण पचविलें पाहिजे असें म्हणतात. पण कोणत्याही निमित्तानें का असेना 'स्वराज्य' 'स्वराज्य' असा घोष येथेंही होऊं लागलेला आहे. तेव्हां हें 'स्वराज्य' म्हणजे काय ह्याचा विचार होणें अवश्य आहे. तो झाला तर आपणास मिळालेल्या स्वराज्याची खरी किंमत काय आहे, व आपणास जें मिळवावयाचें आहे त्याचें खरें स्वरूप काय असलें पाहिजे ह्याची जाणीव करून घेतां येईल.

'स्वराज्य' म्हणजे काय तें आपणास दोन रीतींनीं ठरवतां येईल. एक स्वराज्योपभोगी राष्ट्रांकडे पाहून त्यांच्यांत कोणकोणत्या गोष्टी अगर गुण आहेत तें ठरवून आणि दुसरी निव्वळ तर्काचा, युक्तिवादाचा अगर शब्दार्थशोधनाचा अवलंब करून. प्रथमतः पहिली पद्धतीच अंगिकारूं. इंग्लंड आणि फ्रान्स हीं राष्ट्रें स्वराज्योपभोगी आहेत, हें कोणासच नाकबूल नाहीं.

जेणेंकरून आपण त्यांना स्वराज्योपभोगी राष्ट्रें म्हणतों असें त्यांच्यांत काय आहे ? तेथील लोक गळ्याला गळोटी घालतात, हाताला हातमोजे लपेटतात म्हणून काय आपण त्यांना स्वराज्योपभोगी राष्ट्रें म्हणतों ? नाहीं, हें उघड आहे. मग त्यांच्यांत कोणता गुण आहे म्हणून ह्या अभिधानाला तीं पात्र झालेलीं आहेत ? परंतु ह्याचें संशोधन करण्यापूर्वी श्रोत्यांच्या लक्षांत एक गोष्ट आणून देणें अवश्य आहे ती ही कीं, 'स्वराज्य' आणि 'लोकसत्ता' किंवा 'प्रतिनिधिसत्ताक' राज्य ह्यांची गुंतागुंत करतां कामा नये. राष्ट्र 'स्वराज्योपभोगी' ठरण्यास तें राजसत्ताक नसून प्रजासत्ताकच असलें पाहिजे असें नाहीं. आणि हें, इंग्लंड व फ्रान्स हीं जीं दोन राष्ट्रें आपण उदाहरणाकरतां घेतलीं आहेत त्यांच्याकडे पाहिलें असतां दिसून येतें. इंग्लंडांत राजसत्ता—मग ती नांवाची का असेना ?— आहे आणि फ्रान्सांत प्रजासत्ता आहे. पण दोन्ही स्वराज्योपभोगी राष्ट्रें आहेत. इंग्लंड राजसत्ताक आहे म्हणून तें स्वराज्योपभोगी राष्ट्र नव्हे असें कोणी म्हणत नसतो. आतां स्वराज्य आणि लोकसत्ता ह्यांचा फार निकट संबंध आहे. व वेळ मिळाल्यास तो किती निकट आहे ह्याचा विचार पुढें मी करीनही. त्याचप्रमाणें स्वराज्य हें साध्य आहे कीं साधन आहे, आणि परतंत्र राष्ट्रांनीं स्वराज्य संपादन करण्याचे जे अनेक मार्ग आपणास दिसत आहेत त्यांत कोणत्या परिस्थितींत कोणता मार्ग अधिक फलदायी ठरेल ह्याचाही विचार करावयाचा आहे. 'मीमांसा' ह्या शब्दांत एकमेकांशीं संलग्न असलेल्या ह्या सर्व प्रश्नांचा अंतर्भाव करतां

येईल. व हा अभिप्राय लक्षांत घेऊनच तो शब्द आजच्या विषयाच्या नांवांत योजलेला आहे.

इंग्लंड अगर फ्रान्स ह्या राष्ट्रांना स्वराज्योपभोगी राष्ट्रें कां म्हणतात हें पाहूं गेलें असतां पहिल्याप्रथम जी गोष्ट आपल्या लक्षांत येते ती ही कीं, इंग्लंडचा राज्यकारभार इंग्रज लोकांच्या आणि फ्रान्सचा राज्यकारभार फ्रेंच लोकांच्या हातीं आहे. ह्या उदाहरणांवरून आपणास असा सर्वसामान्य नियम काढतां येतो कीं, देशाचा राज्यकारभार देशज, म्हणजे देशांत जन्मलेल्या, लोकांच्या हातांत असला म्हणजे तो देश स्वराज्योपभोगी आहे असें म्हणावें. परंतु राज्यकारभार देशज लोकांच्या हातांत असणें ह्याचा तरी अर्थ काय? हा अर्थ ठरवण्यासाठीं आपणास शासनशास्त्राकडे एक दृष्टिक्षेप केला पाहिजे. ज्याला आपण 'शासनसंस्था' किंवा 'सरकार' म्हणतों त्याचे दोन मुख्य विभाग, अगर शास्त्रीय परिभाषेनें 'सत्ता' कल्पिलेल्या असतात. एक कायदे करणारी सत्ता आणि दुसरी कायदे अंमलांत आणणारी सत्ता. पोर्तुगीज भाषेंत ह्या सत्तांना अनुक्रमें Poder Legislativo व Poder Executivo अशा संज्ञा देतात. ह्या दोन सत्तांशिवाय सरकार किंवा शासनसंस्था ह्या चिजेचें अस्तित्वच संभवत नाहीं. न्यायसत्ता किंवा Poder Judicial अशी तिसरी एक सत्ता शासनसंस्थेंत कल्पिलेली असते. एकमुखी राजसत्तेंत Poder Moderador अशी चौथीही एक सत्ता शासनसंस्थेच्या अस्तित्वासाठीं अवश्य मानली जात होती. तथापि अगदीं शास्त्रशुद्ध विचार करून शासनशास्त्रज्ञांनीं, 'न्यायसत्ते'चा 'अंमलबजावणी

सत्तेंत आणि Poder Moderador चा 'कायदेकारी सत्ते'त समावेश केलेला आहे. तात्पर्य हें कीं, 'सरकार' ह्या संस्थेच्या संभवाकरतां 'कायदेकारी' आणि अंमलबजावणी करणारी किंवा 'कार्यकारी' अशा दोन मुख्य सत्ता अपरिहार्य असून, त्या दोन्हींत इतर सत्तांचा अंतर्भाव होत असल्यानें पुरेशाही आहेत. आतां देशज लोकांनीं 'राज्यकारभार चालवणें' म्हणजे ह्या दोन सत्तांपैकीं कोणती सत्ता त्यांच्या हातांत असणें, कायदेकारी कीं कार्यकारी? कार्यकारी सत्तेची कामगिरी हीच कीं, कायदेकारी सत्ता जें काय सांगते किंवा जे कायदे करते ते कायदे प्रजेकडून पाळून घ्यावे. उपमेनें सांगावयाचें झालें तर, कायदेकारी सत्ता ही यजमानीण असते आणि कार्यकारी सत्ता ही सांगकामी दासी असते. Senhor mandar eu andar किंवा 'लिहिलेप्रमाणें साक्ष' हें कार्यकारी सत्तेचें ब्रीदवाक्य असतें. तिचें सगळें कर्तृत्व कायदेकारी सत्तेनें आंखबंद करून दिलेल्या क्षेत्राच्या आंत असतें. त्या क्षेत्राबाहेर ती निर्माल्यवत् असते. तथापि व्यवहारांत तिच्याशींच प्रजाजनांचा संबंध नित्याला येत असतो. आपणाला आलेला हुकूम मूळ कोणाकडून सुटलेला आहे हें प्रजाजन नित्यव्यवहारांत पाहात बसत नाहींत; तर त्या हुकुमाप्रमाणें आपणास वागवून घेतो कोण हेंच त्यांच्या लक्षांत भरलेलें असतें. आणि ह्याच्यावरून साधेभोळे लोक अशी कल्पना करतात कीं, सरकार म्हणजे कार्यकारी सत्ता किंवा ती ज्यांच्या रूपानें प्रतीत होते त्या सरकारी नोकरांची टोळी! कोणी म्हणेल कीं, पाटील, मामलेदार, सुभेदार असल्या किरकोळ नोकरांना 'सांगकाम्या' म्हणून सोडून द्या.

पण प्रधानमण्डळाला तरी तुम्ही सरकारचा मुख्य घटक म्हणून मानाल कीं नाहीं? परंतु ह्या गोष्टी माझ्या—तुमच्या मानण्यावर अवलंबून नाहींत, वस्तुस्थितीवर अवलंबून आहेत. कायदेकारी सत्ता किंवा पार्लमेंट आणि कार्यकारी सत्तेचा आद्य घटक किंवा प्रधानमण्डळ ह्यांचा एकमेकांशीं बेबनाव झाल्यास ज्यावरून प्रधानमण्डळाला राजिनामा देऊन स्थानच्युत व्हावें लागतें आणि पार्लमेंट अढळ राहातें, त्यावरून प्रधानमण्डळाच्या हातांत केव-ढीही सत्ता असलेली दिसली तरी तें पार्लमेंटच्या नोकरवजा आहे हें मान्य केलेंच पाहिजे. धन्याशीं जुळलें तर प्रधानमंडळाची धडगत, नपेक्षां बडतर्फी ठरलेलीच! कोंबडा आरवतो आणि सूर्य उगवतो एवढ्याच पूर्वोत्तरसंबंधावरून 'सूर्योदयाचें कारण कुक्कुटरव होय' असें म्हणणें जसें मूर्खपणाचें ठरेल तसेंच, राज्यकारभार हांकतांना दिसले म्हणून कार्यकारी सत्तेचे मूर्त अवयव जे नोकर लोक तेच खरेखुरे राज्यकर्ते आहेत असें म्हणणेंही अज्ञानाचें ठरेल. पण सर्वांचीच दृष्टि इतकी खोल जावी अशीही अपेक्षा करणें बरोबर नाहीं. तथापि सुज्ञ लोकांनीं त्यांच्या नजरेस ही गोष्ट वेळोवेळ आणणें अवश्य आहे. असें न करतां, उलट आज ज्याप्रमाणें गोव्यांत मोठमोठे पुढारी गणले गेलेले लोक, आमचे हिंदु सरकारी नोकरींत शिरले ही गोष्ट हिंदु समाजाच्या राजकीय प्रगतीची खूण असल्याचें सांगतात तें तसेंच चालूं दिल्यास नोकऱ्यांचा नसता हव्यास उत्पन्न होऊन सत्याचा अपलाप व तरुण पिढीची दिशाभूल केल्याचें पाप त्यांच्या पदरीं पडल्याशिवाय राहाणार नाहीं.

सरकारी नोकऱ्या आणि राजकीय सत्ता ह्यांची समव्याप्ति नाहीं हें आणखी एका तऱ्हेनें सिद्ध करतां येईल. देश स्वराज्योपभोगी ठरण्यास सरकारी नोकर—अर्थात् कार्यकारी, कायदेकारी नव्हे, सत्ता हातीं असणारे लोक किंवा Empregados—देशज असावे लागतात असें आपण घटकाभर कल्पूं. आतां प्रश्न असा कीं, हे देशज नोकर किती असावे लागतात, झाडून सगळे कीं कांहीं देशज नसले तरी चालतील? 'झाडून सारे' असें उत्तर दिलें तर इंग्लंड, फ्रान्स, रशिया हीं राष्ट्रें स्वराज्योपभोगी नाहींत असें म्हणावें लागेल. कारण ह्या राष्ट्रांत, विमान खातें, खनिज खातें, शिक्षण खातें इत्यादि खात्यांतून अनेक परदेशज लोक नोकऱ्या करीत असतात. पण इंग्लंडादि राष्ट्रें स्वराज्योपभोगी नाहींत असें म्हणतां येईल काय? नाहीं. बरें, ही आपत्ति टाळण्यासाठीं जर आपण असें म्हटलें कीं, देश स्वराज्योपभोगी ठरण्यास त्यांतील सरकारी नोकर शेंकडा ५१ ह्या प्रमाणांत तरी देशज असावे, तर ह्या नोकरांत कोणत्या दर्जाच्या नोकरांचा समावेश करावा, असा प्रश्न पुढें येतो. उदाहरणार्थ, शेंकडा ५१ देशज नोकर आहेत पण ते सगळे खालच्या दर्जाचे असून त्यांचे मुख्य तेवढे परदेशज आहेत, अशी स्थिति असल्यास देशाच्या स्वराज्योपभोक्तृत्वाची कसोटी कशी लावावयाची? एकाद्या घरांत अनेक नोकर असले तर, "काय हो, ह्या घरांत नोकर पुष्कळ असून यजमान एकटाच आहे, तेव्हां घराची मालकी यजमानाकडे नसून नोकरांकडेच आहे." असें जर कोणी म्हणेल तर तें जितकें हास्यास्पद ठरेल

तितकेंच सरकारी नोकरांच्या संख्येवरून राजकीय सत्ता मोजणें हेंही हास्यास्पद ठरेल ! तात्पर्य, 'राज्यकारभार चालवणें म्हणजे काय ' असा जो आपला मूळचा प्रश्न होता त्याचें उत्तर हें कीं, देशांतील 'कायदे करण्याचें काम हातीं असणें'. आतां इतकें खरें कीं, कार्यकारी सत्तेंतील लोक देशज असले तर दुधांत साखर पडेल. पण हेंही तितकेंच खरें कीं, सरकारी नोकर परकी असले तरी देशाच्या स्वराज्योपभोक्तृत्वाला बाध येणार नाहीं. कारण जेव्हां ते परकी लोक देशाचें नुकसान करीत असलेले आढळून येतात तेव्हां त्यांस जाग्यावरून दूर करतां येतें. परंतु देशांतील कायदे करण्याची सत्ता देशज लोकांच्या हातीं असली तरी तो देश स्वराज्योपभोगी असेलच असें म्हणतां यावयाचें नाहीं. आपण असें समजूं कीं, आपल्या देशासंबंधींचे कायदे करण्याची सत्ता हिंदी लोकांच्या हातांत आली आहे; पण त्यांना अशी एकच अट घालण्यांत आली आहे कीं, हे कायदे जेणेंकरून हिंदुस्थानाचें अहित होईल असे असावे. अशी अट पाळावयाची असली तर कायदे करण्याची सत्ता असून नसल्यासारखी—नव्हे तर उलट घातक—होईल. तथापि 'कायदे करण्याची सत्ता' असें जेव्हां आपण म्हणतों तेव्हां ती सत्ता बिनअटीची अर्थात् अखेरची, शेवटची आहे असेंच आपण गृहीत धरीत असतों. व म्हणूनच 'देशाच्या हिताचे' कायदे करण्याची सत्ता असें निराळें सांगण्याची गरज राहात नाहीं. तथापि हा मुद्दा संदिग्ध राहूं नये म्हणून 'कायदे करण्याची सत्ता' ह्या शब्दांमागें 'देशाच्या हिताचे' हे अगर त्यांचे पर्याय शब्द योजणेंच बरें.

आतां, आपण असें एक प्रमेय घेऊं कीं, देशज लोकांना स्वदेशाच्या हिताचे कायदे करण्याची सत्ता आहे. पण हे कायदे आणि तज्जन्य इतर सगळा कारभार देशांतील भाषेच्या द्वारें न होतां तो परभाषेंतून होत आहे. तर अशा देशाला स्वराज्योपभोगी देश म्हणतां येईल काय ? केलेले कायदे जर परभाषेंतून असले तर ते देशज लोकांचा व्यवहार सुखकर करण्यास समर्थ होतील काय ? आणि जर नाहीं तर ते देशी भाषेंतून होण्याची गोष्ट गृहीत न धरल्यास देशास स्वराज्योपभोगी म्हणतां येणार नाहीं हें उघड नाहीं काय ? राज्यकारभार देशी भाषेंतून न चालल्यामुळें लोकांची कशी कुचंबणा होत असते हें गोव्यांतील लोकांस स्वानुभवानेंच माहीत असल्यानें त्याचें विशेष विवेचन करण्याची गरज नाहीं. देशज लोकांच्या हातांत अखेरची कायदेकारी सत्ता असली म्हणजे ते निसर्गतःच स्वभाषेंतून कायदे करतील हें उघड असल्यानें भाषेसंबंधींचा हा मुद्दा व्याख्येंत अंतर्भूत करण्यांत न आला तरी चालेल. तथापि ती निःसंदिग्ध व्हावी, ह्यासाठीं तो मुद्दा तिच्यांत समाविष्ट केला आहे.

आतांपर्यंत जें विवेचन केलें त्याचें संश्लेषण करतां असें दिसून येतें कीं, स्वदेशाच्या हिताचे कायदे स्वभाषेंतून करण्याची अखेरची सत्ता देशज लोकांच्या हातांत असणें म्हणजे स्वराज्य होय.

'स्वराज्य' शब्दाचा तार्किक पद्धतीनें विचार केल्यासही आपण वरील व्याख्येप्रत कसे येऊन पोंचतों तें आतां थोडक्यांत पाहूं. स्वराज्य म्हणजे आपल्या लोकांनीं चालवलेलें राज्य हा अर्थ अगदीं स्पष्ट व साधा आहे. पण 'आपले' ते कोण आणि राज्य

चालवणें म्हणजे काय, असे दोन प्रश्न पुढें येतात. आपले म्हणजे विवक्षित धर्माचे असें म्हणावें तर ज्या देशांत अनेक धर्मांचे लोक आहेत त्या देशांस व्याख्या गैरलागू होईल. 'आपले' म्हणजे विवक्षित भाषा बोलणारे असें म्हणावें तर हिंदुस्थानासारख्या देशांत तितक्यानेंही निर्वाह होत नाहीं. तेव्हां 'आपले' म्हणजे आपल्या देशाशीं जे लोक स्वत:चे आणि स्वत:च्या पूर्वजवंशजांचे हितसंबंध निगडित आहेत असें मानतात व त्या देशाविषयीं ममत्वबुद्धि, प्रेम, आदर आणि अभिमान बाळगतात अशा सर्व लोकांचा समुदाय होय असें म्हणावें लागतें.

'राज्य चालवणें' ह्याचा अर्थ चटकन् कोणी असा सांगेल कीं, जिला सरकार म्हणतात त्या संस्थेचीं कामें करणें. परंतु गाडी चालवणें म्हणजे गाडी ओढणें कीं गाडी हांकणें हें निश्चित ठरल्याशिवाय ज्याप्रमाणें चालवणारे कोण, बैल कीं गाडीवान, हें निश्चित ठरत नाहीं, त्याचप्रमाणें राज्य चालवणें म्हणजे राज्य-शकट ओढण्याची नोकरी करणें कीं तो हांकण्याची मालकी करणें हेंही निश्चित ठरत नाहीं. पण राज्यशकट ओढणें हा राज्य चालवण्याचा खरा अर्थ नव्हे तर तो हांकणें हाच त्याचा अर्थ होय हें मागें विशद करून सांगितलेंच असल्यानें त्याची पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं. तेव्हां केवळ शब्दार्थ घेऊनही गेलों तरी आपण वरील व्याख्येप्रत येऊन पोंचतों हें सिद्ध होतें.

स्वराज्य हें एका अर्थी साधन आहे. देशांतील लोकांना जगभर मानमरातब असावा, त्यांची आर्थिक व शैक्षणिक स्थिति चांगली असावी इत्यादि गोष्टी स्वराज्याशिवाय पूर्णांशानें शक्य

होत नाहींत हें लक्षांत घेतलें असतां स्वराज्य हें साधन आहे असें म्हणतां येईल. परंतु आपण घटकाभर असें गृहीत धरूं कीं, 'तुमच्या देशाचा मानमरातब, आर्थिक व शैक्षणिक स्थिति हीं सगळीं तुमच्या मनाप्रमाणें ठेवतों, तुम्हीं फक्त आपल्या देशाला आमच्या देशाचा मांडलीक म्हणा' असें एका देशानें दुसऱ्या देशांस सांगितलें, तर ही गोष्ट कबूल करण्यास किती देश तयार होतील? आयर्लंडला आपली आर्थिक स्थिति मनाप्रमाणें ठेवण्याचा हक्क मिळाला आहे. राजकीय स्वरूपाचे बहुतेक सगळे अधिकार त्याला मिळालेले आहेत. इंग्लंडहून जो व्हाइसरॉय तेथें जात असतो तो नुसता कुंकवाचा टिळा आहे. पण त्याच्यावरही हल्ला करणारे लोक आयर्लंडांत निपजले आहेत. ह्यावरून काय दिसून येतें? तर हेंच कीं, स्वराज्य हें केवळ बाह्य सुखाचें एक साधन म्हणून लोकांना पाहिजे असतें असें नव्हे. तर मानसिक भूक, स्वाभिमानी मनाची भूक शमविण्याची शक्ति त्याच्या अंगांत वसत असते, म्हणूनही तें लोकांस पाहिजे असतें. आणि ह्या गोष्टीकडे नजर पुरवली म्हणजे स्वराज्याचें साध्यस्वरूप लक्षांत भरल्याशिवाय राहात नाहीं.

स्वराज्य आणि लोकसत्ता ह्यांच्या संबंधांचें, त्याचप्रमाणें परतंत्र राष्ट्रांनीं स्वराज्यसंपादनार्थ उपयोगांत आणावयाच्या मार्गांचें विवेचन केल्याशिवाय ही मीमांसा पुरी होत नाहीं. तथापि वेळेच्या अभावीं ह्या दोन्ही मुद्दयांचें विवेचन आज करतां येत नाहीं. तरीही पहिल्या बाबतींत, जातां जातां इतकेंच सांगतों कीं, राजा कितीही बुद्धिमान् व लोकहितदक्ष असला

तरी त्याची नजर देशांतील अगदीं निकृष्ट वर्गापर्यंत आणि प्रत्येक बाबीवर जाणें स्वभावत:च अशक्य असल्यानें लोकसत्तेशिवाय खरें स्वराज्य शक्य नाहीं. परंतु सगळे लोक कांहीं राज्यकारभारांत प्रत्यक्षत: शिरूं शकत नसतात. ह्याचमुळें प्रातिनिधिक राज्याचा उगम होतो. हे प्रतिनिधि केवळ ज्ञाननिष्णात असून चालावयाचे नाहींत. तर त्यांना लोकहिताची स्वभावजन्य आवड, स्वार्थत्यागी वृत्ति व निरलसता इत्यादि गुण असले पाहिजेत. केवळ चिठ्ठयांच्या साह्यानें इष्टमित्रांच्या वजनावर निवडून येणारे प्रतिनिधि 'स्वराज्य' हें नांव सार्थ करूं शकतीलच असें म्हणतां यावयाचें नाहीं. असो.

मागें जी मी स्वराज्याची व्याख्या केली ती ज्यांना पटली असेल त्यांनीं तिच्या कसोटीला आपलें गोमंतकीय स्वराज्य लावावें म्हणजे त्याची किंमत काय आहे हें कळून येईल.

---

# ४. हिंदुसंघटनेंत गोमंतकीय हिंदूंचें स्थान

[वांई प्राज्ञपाठशाळेचे ब्रह्मश्री महादेवशास्त्री दिवेकर ह्यांचें मडगांवच्या सारस्वत ब्राह्मण समाजाच्या वार्षिक व्याख्यानमालेंत ता. १६ एप्रिल १९२६ रोजी 'संघटना कीं पुनर्घटना?' ह्या विषयावर व्याख्यान झालें. त्या प्रसंगीं अध्यक्ष ह्या नात्यानें केलेला समारोप]

आज जर कोणती गोष्ट ब्रिटिश हिंदुस्थानांतील हिंदुमात्राच्या विचाराचा विषय होऊन बसली असेल तर ती 'हिंदुसंघटन' ही होय, हें ब्रह्मश्री दिवेकरशास्त्री ह्यांच्या भाषणावरून श्रोतृवर्गाच्या लक्षांत आलेंच असेल. ह्या चळवळीचा उगम

सन १९१२ च्या सुमारास झाला. कर्झनसाहेबांनीं मुसलमानांस गोंजारण्याकरतां त्यांना जे विशेष हक्क दिले त्यामुळें उत्पन्न झालेल्या परिस्थितीचा विचार करण्याकरतां रायबहादूर शादीलाल ह्यांच्या अध्यक्षतेखालीं दिल्ली येथें एक सभा भरली होती. अलीकडे तर मुसलमानांनीं ताळच सोडलेला आहे. हिंदु लोक जर संघटित न होतील तर ते नामशेष होण्याचा संभव दिसूं लागला आहे. सौम्य स्वरूपानें असले तरी ख्रिस्ती लोकांकडूनही हिंदु समाजाचे लचके तोडले जातच आहेत. पण संघटनेंत केवळ प्रतिकारात्मक चळवळीचाच अंतर्भाव होत नाहीं; तर स्वसंवर्धनात्मक प्रयत्नांचाही अंतर्भाव होतो हें मुळींच विसरतां कामा नये. ह्या चळवळीचें महत्त्व थोडक्यांत सांगावयाचें झालें तर असें म्हणतां येईल कीं, तो एक हिंदु समाजाच्या जीविताशीं निगडित झालेला प्रश्न आहे.आणि अशा चळवळींत म्हणजे हिंदु समाजाच्या संरक्षण–संवर्धनांत गोव्यांतील हिंदु समाजालाही स्थान असणें अवश्य आहे. तेव्हां ही जी संघटनेची चळवळ ब्रिटिश हिंदुस्थानांत सर्वत्र चाललेली आहे तिच्याविषयीं न बोलतां, हें स्थान कोणतें, किंवा, ह्या चळवळींत गोव्याचा संबंध कितपत आहे, ह्यासंबंधींच थोडा विचार करूं. हा विचार करतांना एक गोष्ट आपण जरूर लक्षांत ठेविली पाहिजे कीं, राजकीय दृष्ट्या गोव्यांतील हिंदु समाज ब्रिटिश हिंदुस्थानांतील हिंदु समाजापासून अलग असला तरी इतर कोणत्याही दृष्टीनें ह्या उभय समाजांत भेद पाडतां यावयाचा नाहीं; पुनर्विवाह, विधवाविवाह, धर्म–परावर्तन वगैरे सामाजिक सुधारणा ज्याच्यांत चालू आहेत असा ख्रिस्ती समाज कित्येक

शतकांपासून गोव्यांतील हिंदु समाजास निकटवर्ती असतांना ह्या सुधारणा त्यानें अंगिकारल्या नाहींत, आणि ज्या वेळीं ब्रिटिश हिंदुस्थानांतील हिंदु समाजानें त्या स्वीकारण्याची तयारी दाखविली तेव्हांच त्यांच्यासंबंधीं गोव्यांतील हिंदु समाज विचार करूं लागला, ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे दुसऱ्याचा पहिल्याशीं अवयव–अवयवी भाव कसा आहे तें मनास पटेल. असें असतां कांहीं अप्रबुद्ध लोकांच्या विचारसरणीप्रमाणें गोव्यांतील हिंदु समाजाचा निराळा संसार जर आपण थाटूं तर आपला नाश होईल. पाणी नदींतलेंच, पण तें निराळें ठेवल्यानें जसें कुजून जातें, नदींत खेळल्यानें जात नाहीं, तद्वतच गोव्यांतील हिंदु समाजरूपी पाणी ब्रिटिश हिंदुस्थानांतील हिंदु समाजरूपी नदीपासून निराळें केल्यास येथील हिंदु समाज सडून जाईल. तेव्हां ह्या चळवळीशीं गोमंतकीय हिंदु समाजानें शक्य तितक्या मोठ्या प्रमाणांत समरस होत राहिलें पाहिजे.

---

# ५. पार्लमेंटच्या प्रतिनिधीस—

[पोर्तुगीज हिंदुस्थानातर्फे पोर्तुगीज पार्लमेंटवर पाठवावयाच्या प्रतिनिधीची सन १९२५ च्या नोव्हेंबरांत जी निवडणूक झाली ती फारच चुरशीची होऊन गेली. सतत तीनचारदां निवडून आलेले प्रतिनिधि मि. फ्रांझेरिश् द कॉश्त हे ह्या निवडणुकींत पुनश्च उमेदवार राहिले होते आणि आरोग्य खात्याचे प्रस्तुतचे मुख्याधिकारी असलेले दो. फ्रोयलानु दॅ मॅलु हे त्यांना प्रतिस्पर्धी म्हणून उभे होते. बहुतेक सर्व

हिंदूंनीं दो फ्रोयलानु द मॅलु ह्यांची बाजू उचलली होती. निवडणुकींत दो. मॅलु हे प्रचंड बहुमतानें निवडून आल्यामुळें त्यांच्या मडगांवांतील हिंदु मतदारांनी ता. १८ एप्रिल १९२६ रोजीं तेथील सारस्वत ब्राह्मण समाजाच्या सभागृहांत त्यांच्या अभिनंदनार्थ एक जाहीर समारंभ घडवून आणला. समारंभास अनेक प्रमुख प्रमुख हिंदु व ख्रिश्चन स्त्रीपुरुष जमले होते. त्या प्रसंगीं कोंकणींतून झालेलें भाषण.]

बंधुभगिनींहो, मी कोंकणींत बोलत असलेलों ऐकून आपण मला रानटी, असंस्कृत मनुष्य म्हणाल; तथापि आपण खात्री ठेवा कीं, असें वाटण्याचें खरें कारण, आपला स्वाभिमान मरून गेला आहे, हेंच होय. ह्या कोंकणी, अगर थोड्या व्यापक अर्थी बोलावयाचें झाल्यास, देशी भाषांची राजकारणाच्या अगर समाजाच्या कोणत्याही इतर अंगाच्या उत्कर्षास किती जरुरी आहे हेंच मी आपणास प्रथम सांगणार असून नंतर इतर गोष्टींकडे वळणार आहें. आमच्यांतले वर्तमानपत्रकर्ते, व्याख्याते, कौन्सिलर, मुत्सद्दी वगैरे सारे लोक आम्हांला रिपब्लिक राज्यपद्धति लाभली, आम्हांला स्वराज्य मिळालें, आमच्यांत लोकसत्ता पसरली इत्यादि गोष्टी मारे ओरडून सांगत आहेत. पण बाह्य दृष्टि सोडून देऊन जरा आत्मनिरीक्षण केलें तर ह्या ओरडण्यांत फारसें तथ्य नाहीं असेंच आपणास दिसून येत नाहीं काय? आज, पोर्तुगालच्या पार्लमेंटांत काय किंवा येथील कायदेमंडळांत काय, हें खातें काढून टाक, तें खातें निर्माण कर, ह्याचा पगार वाढीव, त्याच्या पगाराला काट मार, हा नियम बदल, तो नियम तहकूब कर वगैरे अनेक घडामोडी होत असतात. पण, कांहीं कौन्सिलर, त्या घडा-

मोर्डीशीं प्रत्यक्ष संबंध येणारे इसम आणि कांहीं राजकारणी मंडळी ह्यांच्यापलीकडे ह्या वडामोर्डीची कोणाला नुसती तोंड-ओळख तरी असते काय? आपण कोणता कर केव्हां भरावा आणि न भरल्यास त्याचा परिणाम काय होणार ह्याचीही माहिती लोकांना नसावी हें आमच्यांत दॅमॉक्रासी किंवा लोकसत्ता प्रसरल्याचें लक्षण समजतां येईल काय? आणि जर नाहीं तर ह्याचें कारण काय असावें? कारण हेंच कीं राज्यकारभारांतील साऱ्या उलाढाली बहुजनांच्या परिचयाच्या नसलेल्या पोर्तुगीज भाषेंतून होतात. आधीं इकडे पोर्तुगीज जाणणारे ख्रिस्ती लोकांतही थोडेच आहेत, त्यांत नेहमीं वृत्तपत्रें वाचणारे त्याहीपेक्षां थोडे आणि राजकीय विषयांची गोडी असणारे फारच थोडे! येथें इतकीं वृत्तपत्रें असून काय-देमंडळांतील कामकाजाची माहिती एकट्या 'यॅराल्द' पत्रांतून व तीही सहा-सात आठवड्यांनंतर प्रसिद्ध होत असते ह्यावरून आमच्या पोर्तुगीज वाचकांच्या बाजारांत कसला माल खपतो ह्याची कल्पना करावी! हा प्रकार बदलून राजकीय विषयांची चर्चा जेव्हां लोकांच्या भाषेंतून होऊं लागेल तेव्हांच त्यांची माहिती सामान्य वर्गापर्यंत पोंचेल. ज्याला ज्या विषयाचें ज्ञान नाहीं त्याला त्याची गोडी नसते व ज्याला ज्याची गोडी नसते तो त्या कामांत भाग घेत नाहीं, हें लक्षांत आणलें म्हणजे लोकांचा राज्य-कारभारांत शिरकाव होऊन खरी दॅमॉक्रासी उत्पन्न होण्यास राज-कीय क्षेत्रांत लोकांच्या भाषेला किती महत्वाचें स्थान दिलें पाहिजे तें चांगलें पटतें. ब्रिटिश हिंदुस्थानच्या राजकीय चळवळींचें सिंहावलोकन केलें असतांही आपणास असेंच दिसून येतें कीं जेव्हां ती लोकांच्या भाषेंतून व्हावयास लागली तेव्हांच तिला

यश येण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. अर्थात् मी जो कोंकणींतून बोलत आहें तो ह्या तत्वाची, मला लाभलेल्या प्रसंगीं, अंमल-बजावणी करण्याकरतांच असून, देशी भाषांचा राज्यकारभारांत शिरकाव करण्याची मागणी जी आम्ही करीत आहोंत तिच्या मुळाशींही हाच अत्यंत महत्वाचा मुद्दा आहे. राज्यकारभार शक्य तितका देशी भाषांतून चालूं लागला तरी कोणतीही भाषा लिहि-तांवाचतां न येणाऱ्या लोकांना त्याचें अज्ञान राहील हें कांहीं खोटें नव्हे. पण पोर्तुगीज जाणणाऱ्या चार लोकांपलीकडे जें त्याचें क्षेत्र जात नाहीं तें कितीतरीपट अधिक विस्तृत होईल हेंही कांहीं खोटें नाहीं. आपले कित्येक ख्रिस्ती बंधु स्वतःची भाषा पोर्तुगीज असल्याचें मानतात; पण त्यांची ही समजूत कशी खोटी आहे हें दाखवण्याकरतां मी एकच उदाहरण देतों. आमचे ख्रिस्ती बंधु जो नृत्यगानाचा समारंभ हमेश करतात तो ज्यांनीं बारकाईनें पाहिला असेल त्यांच्या लक्षांत एक गोष्ट आली असली पाहिजे कीं, नृत्यगानांत भाग घेणारे लोक जोंपर्यंत पोर्तुगिजींतून गायन करीत असतात तोंपर्यंत त्यांची चित्तवृत्ति तल्लीन होत नाहीं. पण ज्या वेळीं हे लोक कोंकणी भाषेंतून 'मांडों' गाऊं लागतात त्या वेळीं देहभान सुटून आपण स्वर्गांत आहोंत कीं पृथ्वीवर आहोंत हेंही ते क्षणभर विसरून जातात. ह्याचें कारण कोणतें? तर ह्या भाषेंतील गायन नुसतें जिभेवरून उडून न जातां तें बेंबीच्या देंठापर्यंत पोंचत असतें! (टाळ्या)

'मराठी किंवा देशी भाषांना मताधिकार द्या' असें आम्ही म्हटल्याबरोबर आमचे कित्येक ख्रिस्ती बंधु अशी विपरीत समजूत

करून घेतात कीं, ह्या मागणीच्या पाठीमागें सगळा राज्यकारभार हिंदूंच्या हातीं आणून सोडण्याची हिकमत लपलेली आहे. पण मी ह्या लोकांना असें विचारतों कीं, मराठीच्या मताधिकाराच्या मागणीबरोबर ती भाषा शिकण्याची ख्रिस्ती लोकांना मनाई करावी असें कोणी कधीं मागितलें आहे काय? आणि जर नाहीं, म्हणजे ख्रिस्ती लोकांनाही जर ती शिकतां येते तर तिला मिळालेला मताधिकार केवळ हिंदूचीच मिरास होऊन बसेल ह्या म्हणण्यांत काय अर्थ राहातो ? ब्रिटिश हिंदुस्थानांत देशी भाषांचें शिक्षण तर झालेंच पण दुय्यम शिक्षणांतील सारे विषय शिकविण्याकरतां-ही देशी भाषाच बोधभाषा म्हणून स्वीकारण्यापर्यंत मजल पोंचली आहे. ब्रिटिश हिंदुस्थानाचें उदाहरण दाखवल्याबरोबर आमचे कित्येक ख्रिस्ती काय किंवा हिंदु काय असा टाहो फोडतात कीं ब्रिटिश हिंदुस्थानापेक्षां आम्ही फार पुढें गेलों असल्यानें त्याच्या-कडून आम्हांला शिकण्यासारखें कांहीं नाहीं. आणि ह्या आमच्या पुढारलेपणाचें प्रत्यंतर म्हणून हे लोक गोव्यांतील साक्षर लोकां-च्या प्रमाणाकडे प्रामुख्यानें बोट दाखवतात. पण खानेसुमारीच्या आंकड्यांचें सत्य स्वरूप जाणण्याइतकी अक्कल ज्यांना असते त्यांना ह्या गोष्टींतील गौडबंगाल लगेच कळून येतें. ज्यांना 'झ्युवांव' हा शब्द G आणि u नें लिहावा कीं J आणि o नें लिहावा ह्याचेंही पुरतें ज्ञान नसतें अशा लोकांचाही गोव्यां-तील खानेसुमारींत साक्षर-सुशिक्षित वर्गांत अंतर्भाव केलेला असतो. परंतु ज्यांची पोर्तुगीज ही मातृभाषा नाहीं अशा गोव्यां-तील लोकांना रोमन लिपीची नुसती ओळख आहे म्हणून त्यांना

शिक्षित हें नांव खऱ्या अर्थानें लावतां येईल काय? ज्याची जी मातृभाषा असते त्याला ती सहज बोलतां येते व बोललेली समजते. अशा लोकांना त्या भाषेच्या लिपीची ओळख झाली म्हणजे तींत लिहिलेल्या मजकुराचें ज्ञान आपोआप होतें. आणि अशाच लोकांचा तेवढा शिक्षितांत अंतर्भाव केला पाहिजे. ब्रिटिश हिंदुस्थानांत जे शेंकडा ९ साक्षर आहेत ते ह्या कोटींतले आहेत आणि गोव्यांत जे शेंकडा १४ साक्षर आहेत ते 'पेद्रु' हा शब्द dru नें संपविणारे आहेत! अर्थात् हें पांचांचें आधिक्य नुसतें दिखाऊ, वरपांगी, फसवणूक करणारें आहे, हें माझ्या श्रोतृवर्गानें पूर्ण लक्षांत बाळगावें. शिवाय, शेंकडा १४ साक्षरतेचें प्रमाण खरें धरलें तरी तें स्वर्गाला हात लावण्याइतकें नाहीं. असो. तात्पर्य काय कीं, देशी भाषांना राज्यकारभारांत व राजकीय चर्चेत योग्य स्थान मिळणें इष्ट आहे.

देपुतादसाहेब, मला हें पक्कें ठाऊक आहे कीं, योग्यतेच्या दृष्टीनें पाहातां, आपणास जर स्वर्गांतील गिरिशिखरावर ठेवलें तर मला ठेवण्याकरतां पाताळांत दरी खणावी लागेल. परंतु आपण कितीही बुद्धिमान् असलां तरी माझा जोडा मला कोठें बोंचतो हें आपण जाणूं शकणार नाहीं, तें मीच सांगितलें पाहिजे. बाळंतपणावर मी कांहीं ग्रंथ वाचले आहेत, मूल उपजतांना आईच्या गर्भाशयादिकांत कोणकोणत्या विकृति होतात तें मी पाहिजे तर सांगूं शकेन, पण प्रसूतिवेदना कशा असतात ह्याची मला नीट कल्पनाच करतां येत नाहीं! (भागिनी वर्गात हास्य!) त्या प्रसूत झालेल्या स्त्रियाच अनुभवूं शकतात. त्याचप्रमाणें

माझ्या आकांक्षा काय आहेत व त्या न पुरल्यामुळें मला किती तीव्र वेदना होतात ह्याची खरी कल्पना माझ्याशिवाय इतरांना होणें दुरापास्त आहे. सद्गृहस्थ हो, पोस्टमनला मराठी शिकीव, नवीन कांविजादींत चार मराठी शाळा काढ, माझ्या भावाला एकादी बडी पगारी जागा दे, असल्या सटरफटर मागण्या करण्याइतक्या माझ्या आकांक्षा क्षुद्र नाहींत. आमच्या देपुतादानें असल्या क्षुद्र गोष्टींत अगर एकाद्या खात्यांतील शाखेची नियमावलि करण्यांत आपली शक्ति खर्च करावी असें सांगणें म्हणजे देपुतादाच्या जागेच्या उच्चतेची आपणास कल्पनाच नाहीं असें दर्शविण्यासारखेंच आहे! असल्या नियमावलि माझ्यासारखा अल्पज्ञ माणूसही करूं शकतो. देपुतादासारख्यानें आपल्या शक्तीचा व्यय ह्याच्यापेक्षां महत्वाच्या कार्यांत केला पाहिजे. आपल्या राज्यकारभारांत सर्वत्र जें ढोंग आणि जो आंधळेपणा माजून राहिला आहे तो आपण घालवून दिला पाहिजे. येथील लोकांवर आपली भाषा लादण्याचे अमानुष उपायही मॉनार्कीतील फिरंग्यांनीं करून पाहिले, पण ते प्रयत्न पूर्णांशानें सफल झाले नाहींत. आज इतकीं वर्षें प्राथमिक शिक्षण सार्वत्रिक व्हावें असा आपला यत्न चालला आहे, पण पोर्तुगीज साक्षरांचें प्रमाण अजून दहांवर जात नाहीं. गोव्यांतील ४ शतकांच्या फिरंगी राज्यकारभारानें जर एकादी महत्वाची गोष्ट प्रत्यक्ष अनुभवानें सिद्ध केली असेल तर ती हीच कीं, लोकांच्या जन्मभाषेला लाथाडून प्राथमिक शिक्षण परक्या भाषेंतून देण्याचे प्रयत्न केले तर ते वांझोटेच ठरावयाचे! पण हा चारशें वर्षांचा अनुभव उघड्या डोळ्यांनीं पाहात असतां प्राथमिक

शिक्षण देशी भाषांतून देण्याचें सरकार आणि आमचे मुत्सद्दी बिलकूल मनांत आणीत नाहींत! जी गोष्ट शिक्षणाची तीच इतर विषयांची. नॉर्मालांत शिकवण्यांत येणारी युरोपियन गायन-कला हिंदु विद्यार्थी मनापासून शिकत नाहींत; जे थोडे शिकतात ते ती परीक्षेच्या दुसऱ्या दिवशीं विसरून जातात! पुढें जन्मांत कधीं ते ह्या कलेचा उपयोग करीत नाहींत. बरें, इतका अट्टाहास करून जें हें गायन नॉर्मालांतील विद्यार्थ्यांनीं शिकावयाचें तें त्यांना प्राथमिक शाळेंतील विद्यार्थ्यांना शिकवावयाचें तरी असतें काय ? नाहीं. पण ह्या सगळ्या गोष्टीं, खुद्द नॉर्मालांतील शिक्षक, सरकार आणि आमचे पुढारी हे सर्व जाणत असतां नॉर्मालांत जाणाऱ्या हिंदु विद्यार्थ्यांवर दॉ-रॅ-मी करण्याची सक्ति चालूच आहे! हा त्या विद्यार्थ्यांच्या शक्तीचा व बुद्धीचा अपव्यय नव्हे काय ? व्यापारी शिक्षण देण्याकरतां म्हणून इंस्तितूत कोमेर्सियाल निर्माण करण्यांत आला. पण येथील बहुतेक सगळा व्यापार ज्या मराठींतून चालतो त्या भाषेचें शिक्षण मात्र त्या इंस्तितुनांत देण्यांत येत नाहीं, हा प्रकार हास्यास्पद नव्हे काय ? मि. दादासाहेब वैद्यांसारख्या आयुर्वेदिक वैद्यांचीं औषधें गव्हर्नर-सेक्रेटरी—आदमिनिस्त्रादोरसारखे बडे अधिकारी, दो. कुर्रेय आफोंसासारखे बडे वकील, जमीनदार व मुत्सद्दी वृत्तपत्रकार आणि मोठमोठे डॉक्टर लोकही स्वत: घेत असतात व दुसऱ्यांना त्यांची शिफारस करतात; पण ह्या वैद्यकाचें शिक्षण देणें तर सोडाच पण देशी वैद्यांना राजरोसपणें औषधें देण्याचीही चोरीच असते! देशी वैद्यक प्रगल्भतेस येण्यास पुष्कळ वाव आहे हें मी जाणतों. पण

म्हणून त्याला मारून टाकणें हें अमानुषच होणार आहे.आपला लंगडा मुलगा आजारी पडला असतां त्याला औषधोपचार करून वांचवण्याचा प्रयत्न न करतां मरूं देणारा पालक कसायाच्याच लायकीचा ठरेल ह्याबद्दल दुमत असूं शकणार नाहीं. सरकार हें जर प्रजेचें मायबाप असेल तर तिच्या विद्यांचें आणि कलांचें संगोपन करणें हें त्याचें कर्तव्यच ठरतें. पण येथील प्रकार कांहीं विलक्षणच आहे. तहानभुकेनें व्याकुळ झालेल्या इसमानें कानडी भाषेंतून पाणी मागितलें असतां "आधीं माझ्या भाषेंतून बोल, मग पाण्याचा विचार करूं" असें उत्तर देणारा मराठा गृहस्थाश्रमी पाषाणहृदयीच समजला जाईल. पण आमच्या सरकारांत, देशी भाषेंतून अर्ज करण्याची सवलत न देण्याच्या रूपानें हा प्रकार सतत चार शतकें चालला असतां त्याकडे कोणी लक्ष देत नाहीं, आणि जो तो म्हणतो 'आम्ही मोठे दॅमॉक्रात, उदारमतवादी, आहोंत!' रिपाब्लिकच्या समतेच्या तत्वाच्या सार्थतेसाठीं कित्येक गोष्टी होणें अत्यंत जरूर असतां आणि त्या करण्याचें आश्वासन मिळालें असतांही त्यांच्यासंबंधीं नुसता ब्र काढण्याची धमकही आमच्यांत आलेली नाहीं. पण "आतां काय,आम्हांला स्वराज्य मिळालें, स्वातंत्र्य मिळालें, आतां आम्ही म्हणजे सरकार आणि सरकार म्हणजे आम्ही" असा घोष आम्ही चालवीतच आहोंत! हीं ढोंगें कशाला? ही फसवणूक कोणाची? जो तो दुसऱ्याला फसवूं पाहातो कीं स्वतःचीच फसवणूक करून घेतो?

देपुतादमहाराज, ह्या आंधळ्या कोशिंबिरीच्या खेळाला आळा घालावयाचा असेल तर पार्लमेंटकडून आपण असें कबूल

करून घेतलें पाहिजे कीं, गोव्यांतील राज्यकारभारांत जो मान युरोपियन भाषांना आणि वाङ्मयांना, कलांना आणि शास्त्रांना, चालींना आणि रीतींना आहे तोच मान देशी भाषांना आणि वाङ्मयांना, देशी कलांना आणि शास्त्रांना, चालींना आणि रीतींना मिळाला पाहिजे. असें घडून येण्याला फार अडचणी आहेत ह्याची मला पूर्ण जाणीव आहे. पण मॉनार्कीच्या जागीं रिपाब्लिकची स्थापना करण्यास काय थोड्या अडचणी होत्या? 'राज्यकारभारांत सुधारणा, राज्यकारभारांत सुधारणा' असा आक्रोश करून जर इकडची खुर्ची तिकडे ठेवून कांहीं तरी लुडबूड करावयाची नसेल, जर राज्यकारभार खरोखरच लोकोपकारी करावयाचा असेल तर अडचणींची रडकथा मुळींच गातां कामा नये. परमेश्वरानें मनुष्य उत्पन्न केल्यावर त्यानें परमेश्वराला असा प्रश्न केला कीं, 'काय केल्यानें मी जगेन?' परमेश्वरानें उत्तर दिलें कीं, 'तूं चळवळ केल्यानें जगशील!' ह्या परमेश्वरानें दिलेल्या मंत्राप्रमाणें जर आम्ही वागूं, चळवळ करूं, प्रयत्न करूं, तर इष्ट हेतु आज–ना–उद्यां साध्य करूं.

पोर्तुगीज राज्यकारभारांत देशी भाषा, गायन, वैद्यक इत्यादिकांना योग्य स्थान मिळवून देण्याचा जो प्रश्न, देपुतादसाहेब, मी आपणापुढें ठेवला आहे तो माझ्या एकट्या व्यक्तीचा अथवा मानपत्र देणाऱ्या मडगांवकरांचा किंवा आपणास निवडून देणाऱ्या हिंदूंचा अगर अखिल हिंदुस्थानच्या ३० कोटी लोकांचा आहे असें आपण समजूं नये, तर हा प्रश्न उभ्या पृथ्वीतलावर जे सत्याचे भोक्ते, गरिबांचे कैवारी आणि उदारमतवादी लोक

पसरलेले आहेत त्या सर्वांचा आहे हें लक्षांत असूं द्यावें. हा प्रश्न जर आपण योग्य रीतीनें सोडवून घेण्याचा प्रयत्न केला तरच मात्र, 'आपल्या निवडणुकींतील विजयानें एका नव्या युगास प्रारंभ झाला' असें जें म्हणण्यांत येतें तें सार्थ होईल.

वास्तविक आपल्या प्रतिनिधींनें काय करावें हें लोकांनीं निवडणुकीआधींच ठरवावयाचें असतें;त्याचप्रमाणें आपण अमुक अमुक करण्याचा प्रयत्न करूं हें त्या प्रतिनिधीनेंही निवडणुकीच्या आधींच सांगावयाचें असतें; आणि ज्यांत माझी अल्प शक्ति खर्च होत आहे त्या 'हिंदु' पत्रांतून ह्या गोष्टी निवडणुकीपूर्वीं ठरवाव्या अशी सूचनाही करण्यांत आली होती. पण आपली राजकीय स्थिति तशीच चमत्कारिक असल्यानें विवाहविधीच्या वेळचे हे संस्कार आज प्रसूतिकाळीं आपण करीत आहोंत. ह्या गोष्टीचा उल्लेख कित्येकांना रुचणार नाहीं; पण आत्मनिरीक्षण करण्याचा माझा उद्देश असल्यानें तो मी मुद्दाम करीत आहें. त्या उल्लेखामुळें अगर माझ्या भाषणांतील इतर एकाद्या वाक्यामुळें कोणास कांहीं विषाद वाटला असेल तर माफी मागून मी रजा घेतों.

# ६. हिंदु संस्कृति रक्षणार्ह आहे काय ?

[ मडगांव येथील 'सारस्वत ब्राह्मण समाजा'च्या विद्यमानें होणाऱ्या वार्षिक व्याख्यानमालेंत ता. ६ एप्रिल १९२७ रोजीं केसरीचे सहसंपादक श्री. जनार्दन सखाराम करंदीकर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं पुण्याचे विद्यानिधि सिद्धेश्वरशास्त्री चित्राव ह्यांचें 'हिंदु धर्म' ह्या विषयावर व्याख्यान झालें. त्या प्रसंगीं उपवक्ते ह्या नात्यानें केलेलें भाषण.]

आज हिंदुस्थान देशभर हिंदु संस्कृतीच्या विकासार्थ हिंदु-संघटनाची चळवळ जोमांत चालली आहे. तथापि, हिंदु लोकांच्या उत्कर्षाबद्दल तीव्र तळमळ वाळगणाऱ्यांपैकीं कांहीं लोकांच्या मनांत अद्याप अशी एक शंका येतेच कीं, ज्या संस्कृतीचें संरक्षण झालें पाहिजे असें आपण म्हणतों ती संस्कृति अभिमानास्पद आणि जिवंत ठेवण्यास पात्र आहे काय ? आणि जर नसली तर ही जी चळवळ होत आहे ती निरर्थक नाहीं काय ? ही शंका उत्पन्न होण्यास ज्या गोष्टी कारणीभूत आहेत त्यांत मुख्य ही कीं, हिंदुस्थान जिंकला गेला आहे आणि हिंदुस्थानांत आज साडे-बावीस कोटी हिंदु व केवळ सात कोटी मुसलमान असतां सर्वत्र आणि सतत हिंदूंना मुसलमान चोपून काढीत आहेत. अशी ही परतंत्र होणारी संस्कृति जिवंत ठेवण्यांत काय अर्थ आहे ? परंतु पारतंत्र्य आणि संस्कृति ह्यांचा लावण्यांत येणारा कार्यकारणसंबंध तर्कशुद्ध आहे काय, ह्यावरही शंका घेतां येण्यासारखी आहे. पारतंत्र्य हें संस्कृतीचें कार्य आहे असें म्हटलें तर एकाच संस्कृतीच्या दोन राष्ट्रांत जितजेतृसंबंध मान्य करतां येणार नाहीं.

तथापि इतिहास पाहातां एकाच संस्कृतीच्या दोन राष्ट्रांनीं एक-मेकांवर जयापजय मिळविलेले दिसून येतात. एकाच हिंदु संस्कृतीच्या रजपूत–रजपुतांत किंवा एकाच युरोपियन संस्कृतीच्या दोन राष्ट्रांत ज्या वेळीं लढाया झाल्या त्या वेळीं एकानें दुसऱ्याला जिंकलें असल्याचें आढळून येतें. अर्थात् राष्ट्र जिंकलें जाण्याचें कारण संस्कृतींत न शोधतां युद्ध्यमान राष्ट्रांच्या पाशवी बलाबलांत शोधावें लागतें. एकादा असंस्कृत माणूस आपल्या शारीरिक बलानें अनेक सुसंस्कृत लोकांस आपल्या कैचींत पकडूं शकेल हें उघड दिसून येतें. देव–दानवांच्या युद्धांत कित्येक वेळीं देव हरले एवढ्यावरून दानवांची संस्कृति श्रेष्ठ होती असें मान-ण्यास कोणी तयार होईल असें दिसत नाहीं. ह्याच गोष्टीची चर्चा करतांना माझे एक मित्र विनोदानें म्हणाले कीं, "एकादा सिंह हजारों माणसांना भिववून सोडतो व प्रसंगीं पुष्कळांना खाऊनही टाकूं शकतो म्हणून जनावरांची संस्कृति मानवी संस्कृ-तीपेक्षां श्रेष्ठ आहे असा सिद्धांत काढावा काय?"

हिंदु संस्कृतीच्या संग्राहक वृत्तीचें विवेचन श्री. चित्रावशास्त्री ह्यांनीं उत्तम प्रकारें केलें आहे. तथापि हिंदु धर्मानें ख्रिस्ती धर्माला आपल्यांत शोषून घेऊं इच्छिलें नाहीं आणि पुढेंही तो घेऊं शक-णार नाहीं ह्याचें जें कारण त्यांनीं दिलें तें पटण्यासारखें वाटत नाहीं. हिंदु धर्माची ईश्वरविषयक कल्पना आणि ख्रिस्ती धर्माची ईश्वरविषयक कल्पना ह्यांच्यांत मूलतःच फरक आहे म्हणून हिंदु धर्मानें ख्रिस्ती धर्माला जवळ करणें शक्य नाहीं हें जर खरें मानावें तर असा प्रश्न उद्भवतो कीं, जगाचें कोडें उलगडण्यास

ईश्वराची मुळींच गरज नाहीं असें कंठरवानें प्रतिपादणाऱ्या आणि मृत्युसमयींही, परमेश्वराचें नांव घेण्याऐवजीं 'पिलव: पिलव:' म्हणणाऱ्या कणादमुनींना हिंदु धर्मानें आपल्या अंत:पुरांत कसें येऊं दिलें? ख्रिस्ती धर्म ईश्वराचें आस्तित्व कबूल तरी करतो. पण बुद्ध धर्म त्याच्या अस्तित्वाच्याच मुळावर घाव घालतो. असें असतां जो धर्म बुद्धमहाराजांना आपल्यांतलाच एक अवतार मानतो तो हिंदु धर्म ईश्वरवादी ख्रिस्ताला दूर लोटतो ह्याच कारण ईश्वरविपयक कल्पनेंतला फरक होय हें म्हणणें सुसंगत दिसत नाहीं. अर्थात् त्याचें कारण आपण अन्यत्रच शोधलें पाहिजे. पण त्याची सविस्तर चर्चा करण्यास आज वेळ नाहीं. तरी जातां जातां इतकें सांगणें योग्य होईल कीं, कपिलमहामुनि काय किंवा बुद्धमहाराज काय, दोघेही हिंदुस्थानांतच जन्मले, आणि उभयतांनीं आपापल्या तत्त्वांचा प्रसार आपल्याच लोकांत करण्याचा प्रयत्न केला. पण महात्मा ख्रिस्त आणि महमद पैगंबर हे हिंदुस्थानाबाहेर जन्मले आणि त्यांनीं स्वमतप्रसाराचें क्षेत्रही हिंदुस्थानाबाहेरच आंखलें. खट्याळ असला तरी स्वत:च्या पोटांत जन्मलेला आणि स्वत:च्याच घरीं लोकनायक झालेला मुलगा, परक्याच्या घरीं आणि पराठिकाणीं कीर्तिमान झालेल्या सात्त्विक मुलापेक्षां कोणाही बापाला अधिक आपलासा वाटणारच. हिंदु धर्माच्या ज्या संग्राहक वृत्तीचा वक्त्यांनीं प्रामुख्यानें उल्लेख केला त्या संग्राहक वृत्तींतच हिंदु धर्माचें एक वैशिष्ट्य, श्रेष्ठत्व आणि दीर्घजीवित्वाचें रहस्य आहे. ही संग्राहक वृत्ति, ही आकर्षणशक्ति ज्या दिवशीं हिंदु धर्मांतून त्याचे अनुयायी नाहींशी करतील

त्या दिवशीं हिंदु राष्ट्राचें काय होईल हें सांगणें कठीण आहे. पण ती वृत्ति त्याच्यांत कायम राहील तर तो अखिल मानव-जातीचा धर्म होईल हें थोड्याशा विचारान्तीं कळून येणारें आहे. जगाचें कोडें आपण उलगडीन ही जी मानवी बुद्धीची महत्त्वाकांक्षा तिचें जास्तींत जास्त समाधान जो धर्म करील तोच धर्म किंवा तेंच तत्त्वज्ञान जगांत विजयी होईल. ह्याकरतां हिंदु लोकांनीं, आपल्या धर्माला सर्व कांहीं ज्ञात झालें असें मानून जगाच्या कोड्याचा उलगडा करण्याची महत्त्वाकांक्षा मरूं न देतां तिचें पुरेपूर समाधान होईल अशा प्रकारचें तत्त्वज्ञान जगापुढें आणण्याचे प्रयत्न चालू ठेवावे आणि त्याचें दृश्य फल जें इहलौकिक कल्याण तें साधून घ्यावें. तरच हिंदु संस्कृति रक्षणार्ह राहील.

# ७–८. गोमंतकांतील शुद्धीचें रहस्य

[ता. ४ आगस्ट १९२८ रोजीं मडगांव येथें श्रीदामोदर विद्याभुवनांत वे. रामचंद्र वामन नाईक करंडे शास्त्री ह्यांच्या अध्यक्षतेखालीं जाहीर सभा भरून 'गोमंतकीय हिंदुसभा' नांवाची संस्था स्थापन करण्यांत आली. आणि तिच्या एका ठरावानुसार, गोव्यांत झालेलें शुद्धिकार्य व गोमंतकीय हिंदूंची स्थिति ह्यांची माहिती महाराष्ट्रीय जनतेस देऊन 'सभे'स तिची सहानुभूति मिळवण्यासाठीं श्री. जयवंत श्रीनिवास सुकेरकर, श्री. यशवंत सूर्यराव सरदेसाई, दत्तात्रय व्यंकटेश पै व श्री. जनार्दन विष्णु कामत ह्यांचें एक शिष्टमंडळ निवडण्यांत आलें. हें मंडळ ता. १८ ऑक्टोबर गुरुवार रोजीं पणजीहून निघालें व रत्नागिरी, मुंबई, पुणें वगैरे ठिकाणीं फिरून ता. ८ नोव्हेंबर गुरुवार रोजीं पणजीस परत आलें. मंडळानें आपल्या दौऱ्यांत, ता. १९ ऑक्टोबर रोजीं रत्नागिरी येथें श्रीविठ्ठलमंदिरांत तेथील हिंदुसभेच्या विद्यमानें बॅ. विनायक दामोदर सावरकर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं, ता. २६ रोजीं पुणें येथें सारस्वत वसाहतींतील सरस्वतीमंदिराच्या जागेंत तेथील 'सारस्वत ब्राह्मण सोशल यूनियन' व 'ब्राह्मणकुमार मंडळ' ह्या संस्थांच्या विद्यमानें प्रो. माधवराव सबनीस ह्यांच्या अध्यक्षतेखालीं, ता. २९ रोजीं मुंबई येथें 'सारस्वत ब्राह्मण समाजा'च्या दिवाणखान्यांत तेथील अखिल गोमंतकीय हिंदूंच्या विद्यमानें श्री. गणपत विश्वनाथ लाड ह्यांच्या अध्यक्षतेखालीं आणि ता. ६ नोव्हेंबर रोजीं मुंबई येथें 'ब्राह्मण समाजा'च्या हरि केशव हॉलमध्यें तेथील हिंदुसभेच्या विद्यमानें ब्रह्मचारी विनायकबुवा मसूरकर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं भाषणें केलीं. ह्या पांचही ठिकाणीं पै हेच मुख्य वक्ते ह्या नात्यानें बोलले आणि त्यांनीं 'गोमंतक व महाराष्ट्र ह्यांचे संबंध' व 'गोमंतकांतील शुद्धीचें रहस्य' अशा दोन सदरांखालीं विभागतां येतील असे मुद्दे प्रत्येक ठिकाणीं प्रतिपादन करून श्रोत्यांस गोमंतकीय हिंदुसभेची आवश्यकता व तिची कामगिरी समजावून दिली. स्थलकालविशेषानुसार प्रत्येक

व्याख्यानांत आलेले कांहीं विशिष्ट मुद्दे सोडून दिले तर प्रथमच्या चार व्याख्यानांत पहिल्या सदरांत येणारे मुद्दे प्रामुख्यानें व दुसऱ्या सदरांत येणारे गौणत्वानें आणि शेवटच्या म्हणजे ब्र. ममुरकरबुवा ह्यांच्या अध्यक्षतेखालील व्याख्यानांत दुसऱ्या सदरांत येणारे मुद्दे विशद रीतीनें व पहिल्यांत येणारे त्रुटितपणें सांगितले गेले असें म्हणण्यास हरकत नाहीं. पैकीं शेवटचें एकच व्याख्यान ७ व ८ असे दोन क्रमांक घालून दिलें आहे. ]

सद्‌गृहस्थहो, महाराष्ट्रांत जेथें जेथें आम्ही फिरलों तेथें तेथें आमचा पुष्पहारादिकांनीं अविस्मरणीय असा सन्मान झाला. तथापि मुंबई प्रदेशीय हिंदुसभेनें केलेल्या सन्मानास मी विशेष महत्त्व देतों. हा सन्मान आमच्या व्यक्तींचा नव्हे, तर ज्या सभेनें आम्हांस प्रचारक निवडलें त्या गोमंतकीय हिंदुसभेचा होय हें उघड आहे. अर्थातच आपले आभार मी मानणें म्हणजे गोमंतकीय हिंदुसभेनें मानण्यासारखेंच आहे, हेंही उघड होय.

महाराष्ट्रीय जनतेचें लक्ष हल्लीं गोमंतकाकडे विशेष वेधण्याचें कारण म्हणजे तेथें गेल्या फेब्रुवारीपासून घडून आलेली ७–७॥ हजार ख्रिस्ती गावडे लोकांची शुद्धि होय. एवढी शुद्धि कशी झाली हा प्रश्न आश्चर्य व कुतूहलपूर्वक प्रत्येक शुद्धिप्रेमी माणसापुढें आज उभा आहे. त्याच्या उत्तरार्थ प्रथमच मला असें सांगावयाचें आहे कीं, व्यासपीठावर उभे राहून किंवा बसून माझ्यासारखे जे लोक श्रोत्यांस शब्दबंबाळ करून वृत्तपत्रांच्या द्वारें प्रसिद्धी मिळवतात त्यांनीं ही शुद्धि खरोखरी केलेली नाहीं. तर ज्यांचें नांव कधीं कोणी ऐकलेंही नसेल अशाच

लोकांचे प्रयत्न ह्या विस्मयकारक शुद्धीला मुख्यत: कारणीभूत झालेले आहेत. नुकतेंच पुणें येथें माझें व्याख्यान झाल्यावेळीं श्री. तात्यासाहेब केळकर ह्यांनीं, अध्यक्ष ह्या नात्यानें बोलतांना, समारोपांत सांगितलें कीं, "गोमन्तकांत एवढी प्रचंड शुद्धि एकाएकीं झालेली नाहीं, तर तिला इतिहास आहे. एकाहून अधिक पिढ्यांचे विचार व कृति तिच्या पाठीमागें आहेत ही गोष्ट जर आपण विसरूं तर मूर्ख ठरूं." तात्यासाहेबांसारख्या विद्वान्, चाणाक्ष आणि शुद्धीच्या पूर्वी व नंतर गोमंतकाचा प्रत्यक्ष परिचय करून घेतलेल्या पुढाऱ्याचें हें म्हणणें आपण केव्हांही लक्षांतून जाऊं देतां कामा नये. शुद्धीच्या विचारांचा उगम झाल्यास पाव शतकावर काळ लोटून गेला आहे. गोमंतकांतील ही शुद्धि चळवळ ब्रिटिश हिंदुस्थानांतील चळवळीच्या अनुकरणाचें फळ मुळींच नव्हे. सन १८९५ च्या सुमारास गोमंतकांतील गावडे व कांहीं सुशिक्षित लोक ह्यांनीं श्रीशृंगेरी मठाच्या शंकराचार्यांस विनंतिपत्र पाठवून शुद्धीस अनुमति मागितली होती. पण त्यांनीं ती दिली नाहीं. महाराष्ट्रांतले पहिले शुद्धिकार प. वा. गजानन भास्कर वैद्य ह्यांच्या हिंदु मिशनरी संस्थेशींही ह्या बाबतींत कित्येक गोमंतकीयांनींही वाटाघाट केली होती व गजाननराव आणखी कांहीं काल जगते तर ती ह्यापूर्वीच फलद्रूपही झाली असती. ब्रह्मीभूत स्वामी श्रद्धानंद ह्यांच्याकडेही ह्यासंबंधीं विचारविनिमय करण्यांत आला होता. पण एक तर त्यांनाही तशी संधि मिळाली नाहीं व शिवाय जातिभेद न मानणाऱ्या आर्यसमाजाकडून होणारी शुद्धि जातिभेदाचें कडक बंधन पाळणाऱ्या गावड्यांस कितपत

पसंत पडली असती हाही प्रश्नच होता. परंतु असले प्राथमिक प्रश्न एक वेळ सुटले असते तरी पुढचे प्रश्न कसे सुटतील हीच मुख्य अडचण शुद्धीच्या मार्गांत होती. ह्या अडचणीचें व प्रस्तुत शुद्धींत तिच्या होऊन गेलेल्या सोडवणुकीचें स्वरूप नीट लक्षांत येण्यास शुद्ध झालेल्या गावड्यांच्या स्थितीची थोडी माहिती देणें जरूर आहे.

शुद्ध झालेले गोव्यांतील गावडे हे आचारविचारानें व देवदेवतार्चनानें हिंदूच होते. त्यांच्या अंगावर कधींकाळीं बाप्ति-स्म्याचें पाणी शिंपडलें गेलें आणि त्या काळच्या हिंदूंनीं त्यांना तात्काळ पावन करण्याचें टाळलें, एवढ्याचमुळें म्हणजे केवळ नाममात्रेंकरून ते ख्रिस्ती होते. जन्म, विवाह आणि मरण ह्या तीन संस्कारांच्या वेळीं ख्रिस्तालय आणि पाद्री ह्यांचें दर्शन जरी ते घेत तरी त्या संस्कारांच्या बाबतींतही ते हिंदु उपाध्यायाकडून एकादा विधि करवीत. अर्थात् त्यांच्या शुद्धीकरणाला जें काय अत्यवश्य होतें तें हेंच कीं, स्वतः गावड्यांना आपणास हिंदु म्हणवून वावरण्याचें धाडस यावें, हिंदु समाजानें त्यांना हिंदु लेखून देवालयांत प्रवेश करण्यास मोकळीक द्यावी आणि प्रेत-संस्कारासाठीं भूमि व धर्मकृत्यांसाठीं उपाध्ये मिळतील अशी व्यवस्था करून टाकावी. ह्या तीन गोष्टींशिवाय त्यांच्या शुद्धी-करणास अन्य गोष्टीची (म्हणजे त्यांच्यांत हिंदु धर्माचा अभिमान जागृत करण्याची, जरुरी नव्हती. तेव्हां ह्या तीन गोष्टी किंवा प्रश्न ज्यांनीं सोडवले त्यांनींच गावड्यांना खरोखरी शुद्ध करून घेतलें असें म्हटलें पाहिजे. परंतु हे तिन्ही प्रश्न असे आहेत कीं

ते गोमंतकीयेतरांस सोडवतां येणें स्वभावतःच अशक्य आहे व वस्तुतःही ते गोमंतकीयांनींच स्वयंस्फूर्तीनें सोडवले आहेत.

गावड्यांना हिंदु म्हणून वावरण्याला धीर येण्यास दोन गोष्टींची जरुरी होती. एक, संस्कारांच्या नोंदीच्या वेळीं त्यांना ज्या अडचणी सरकारदरबारांत येतील त्यांचें निवारण करण्याची हमी देणें आणि दुसरी, ख्रिस्ती जमीनदारांनीं त्यांना हिंदु झाल्यामुळें आपल्या जमिनींतून हांकून दिलें किंवा अंत्य संस्कारास जागा न दिली तर त्यांना राहण्यासाठीं आणि अंत्य संस्कारासाठीं जागा पुरविण्याची व्यवस्था करणें. तशांत सरकारी कायद्याच्या गोष्टींच्या बाबतींत गावड्यांसारख्या अज्ञ लोकांची स्थिति अशी कीं, त्यांना एखाद्या सरकारदरबारांत रिघाव असलेल्या इसमानें सांगितलें असतां जें खरें वाटतें तें इतरांनीं—मग ते केवढेही कायदेपंडित असोत—सांगितलें असतां खरें वाटणें कठीण ! इतकेंच काय पण बूटपाटलूण वापरलेल्या हिंदूवर ते जितका विश्वास ठेवतील तितका धोतरवाल्या हिंदूवर ठेवणार नाहींत! मग लंगोटी नेसणाऱ्याची गोष्ट पुसावी कशाला ? अर्थात् 'तुम्ही हिंदु झाल्यामुळें तुम्हांला संस्कारांच्या नोंदणीच्या वेळीं ज्या काय अडचणी येतील त्या आम्ही निस्तरतों आणि शिवाय त्याच्यासाठीं पाद्री लोक तुमच्याकडून जो पैसा घेतात तोही न घेतां आम्ही त्या निस्तरतों' अशी हमी, गोव्यांतील ज्या हिंदूंची 'कायद्याचे ज्ञानी' म्हणून गावड्यांना ओळख आहे अशांनीं घेतली तरच त्यांचा त्याच्यावर विश्वास बसण्यासारखा होता आणि ब्रह्मचाऱ्यांकडून हें काम होणें जन्मांत अशक्य होतें, हें उघड आहे.

शुद्ध झालेल्या गावडयांना ख्रिस्ती जमीनदारांपासून उपजीविकेसाठीं आणि मृतांच्या व्यवस्थेसाठीं जागा मिळेनाशा झाल्या तर त्या पुरवण्याचें कामही फक्त गोमंतकीय जमीनदारांसच शक्य होतें, ब्रह्मचाऱ्यांकडे अशा जमिनी मुळींच नव्हत्या, हें सूर्यप्रकाशाइतकें स्वच्छ आहे. शुद्धीकृतांस देवालयांत प्रवेश मिळण्याचा आणि त्यांच्या धर्मकृत्यांसाठीं पुरोहित मिळण्याचा प्रश्न सुटणेंही केवळ गोमंतकीयांवर अवलंबून होतें. पहिल्या प्रश्नाच्या बाबतींत मी असें निक्षून सांगूं इच्छितों कीं, मसूर आश्रमाच्या एकाही ब्रह्मचाऱ्याला देवस्थानाच्या एकाही व्यवस्थापक मंडळाची शुद्धीकृतांस देवालयांत जाण्याची परवानगी देण्यास मनोभूमि तयार करण्याचे श्रम ध्यावे लागलेले नाहींत. शुद्धीकृत गावडयांसाठीं स्वतंत्र देवालय उभारण्याचा बेतही आश्रमीय मंडळीनें केला होता. पण गावडयांना ही गोष्ट अर्थातच बिलकूल पसंत पडणारी नव्हती. स्वतंत्र देवालय उभारल्यानें आपण इतर हिंदूंपासून अलग राहूं ही जाणीव त्यांना होती व त्यांना शुद्ध करून घेऊं इच्छिणाऱ्या इतर गोमंतकीय लोकांसही होती. अर्थात् गावडयांना इतर हिंदूंच्या देवालयांत प्रवेश मिळत असला तरच ते शुद्धीस तयार होते. सद्गृहस्थहो, आधुनिक सुशिक्षितांना युक्तिवादानें शुद्धीकडे वळवतां येणें शक्य होतें. पण ज्यांच्या हातांत आज देवस्थानांची खरी सत्ता आहे त्या जुन्या मताच्या लोकांना नवीन कल्पना पटवाव्या कशा ? तथापि अत्यंत समाधानाची व अभिमानाची गोष्ट कीं, गोमंतकांतील जुनी पिढीही गावडयांस हिंदु मानून त्यांना देवालयांत घेण्यास तयार झाली !

पुरोहितांचा प्रश्न सोडवणेंही आश्रमाच्या हातीं नव्हतें. कारण, गोमंतकीय हिंदूनीं आपापल्या पुरोहितास 'तुम्ही शुद्धीकृतांच्या घरीं कृत्य केल्यास आमच्या घरास मुकाल' असें सांगितलें असतें तर गोमंतकीय पुरोहितांनीं ब्रह्मचाऱ्यांनीं केलेली विनंति आमूलात् झिडकारली असती.

ह्या संक्षिप्त विवेचनावरूनही तुम्हांस हें पटलेंच असेल कीं, गावड्यांच्या शुद्धीचें गमक, हिंदु जमीनदारांनीं शेतवाड्या पुरवण्याची, हिंदु वकिलांनीं कायद्याच्या अडचणी निवारण्याची, देवस्थानांच्या व्यवस्थापकांनीं देवालयांत प्रवेश देण्याची आणि गोमंतकीय यजमानांनीं आपल्या पुरोहितांस शुद्धीकृतांचीं धर्मकृत्यें केलीं असतां पौरोहित्यास न मुकण्याची हमी देणें ह्या चार गोष्टींत असून त्या चारही गोष्टी मसूरच्या ब्रह्मचर्याश्रमासच काय पण सबंध हिंदुस्थानांतील ब्रह्मचाऱ्यांसही शक्य होणाऱ्या नाहींत. ह्यांतलें प्रत्येक विधान मी शुद्धीचा प्रत्यक्ष इतिहास देऊन साधार केलें असतें. पण तें व्याख्यानाच्या कालमर्यादेस अशक्य आहे. तथापि ज्या कोणास त्याची माहिती पाहिजेच असेल त्यानें येथें हजर असलेल्या शुद्धीकृत गावड्यांस समक्ष विचारून, गोमंतकीय जमीनदारांस रात्रींबेरात्रीं कसें फिरावें लागलें, वकिलांस रात्रीचा दिवस कसा करावा लागला, देवस्थानांच्या व्यवस्थापकांस काय खबरदारी घ्यावी लागली वगैरेची मुद्दाम चौकशी करावी.

तथापि सांघिक शुद्धीच्या ह्या रहस्याची, गमकाची किंवा मर्माची पूर्ण जाणीव जरी आम्हांस नित्य होती तरी एक प्रश्न शिल्लक होता. तो म्हणजे सरकारी विरोधाचा. आमच्या राज्यांत जरी धर्मस्वातंत्र्य असलें, तरी सरकारी ख्रिस्ती अधिकाऱ्यांची

वृत्ति पूर्वींचीच आहे. शुद्धीला त्यांना कायद्यानें बंदी करतां आली नसती. पण, ती वळजबरीनें केली जात आहे, असा आरोप ठेवून शुद्धिकर्त्यांना गोत्यांत आणणें त्यांना शक्य झालें असतें. पोर्तुगालांत सध्या सर्वाधिकारी सरकार अधिकारारूढ आहे हें आपल्यापैकीं कित्येकांस ठाऊक असेल. त्यानें वसाहतींच्या गव्हर्नरांना 'अशांतता' पसरविणाऱ्या कोणाही इसमास चौकशीविना दुसऱ्या वसाहतींत हद्दपार करण्याचा अधिकार दिलेला आहे. ह्या अधिकाराचा सोटाही गोमंतकीय शुद्धिकर्त्यांविरुद्ध उभारला जाणें अशक्य नव्हतें. तेव्हां अशी कल्पना निघाली कीं, जर ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणी गृहस्थ नांवाला पुढें करण्यास मिळाला तर बरें होईल. कारण त्याला हद्दपार केलेंच तर आमचें सरकार त्याला ब्रिटिश हिंदुस्थानाबाहेर दुसरीकडे पाठवूं शकणार नाहीं. आणि तेथें त्याची रवानगी होणें म्हणजे तो घरीं जाऊन पडणें. असा विचार चालला असतां मसूरचा आश्रम तिकडे संचारार्थ गेलेला दिसला. तेव्हां त्याचा उपयोग करून घेण्याचें ठरलें. भगव्या वेषामुळें गावड्यांना 'आपण खरोखरच शुद्ध झालों' असें वाटेल, ह्या दृष्टीनेंही आश्रमच विशेष पसंत ठरला. संन्यासी लोक संसारनिरपेक्ष असतात अशी आमची भोळी कल्पना झाल्यानें आश्रमाकडून अखिल हिंदुस्थानची नैतिक व आर्थिक सहानुभूति शुद्धिकार्यास मिळविणें सुलभ पडेल असेंही कित्येकांस वाटलें. आणि शुद्धीसाठीं खरोखरी काय पाहिजे तें जाणत असतांनादेखील शुद्धीचें सर्व श्रेय गोमंतकीय हिंदूंनीं आपण होऊन अत्यंत निरपेक्षपणें मसूर आश्रमास दिलें. व श्रेयाच्या ह्या

दानाबरोबरच शुद्धीसाठीं गोमंतकीयांस जो हजारों रुपयांचा खर्च आला त्याची दक्षणाही अप्रत्यक्षत: आश्रमाच्या हातावर घातली. इतकेंच काय पण शुद्धीसाठीं महाराष्ट्रांतून ज्यांनीं खुद्द माझ्याकडे पैसा पाठविण्याची तजवीज केली त्यांना मी मुद्दाम पत्रें लिहून तो परस्पर आश्रमाकडेच पाठविण्यास बजावलें व त्याप्रमाणें तो त्याच्याकडे गेलाही.पण आश्रमानें त्याची पोंचही देण्याची दक्षता म्हणा, सभ्यता म्हणा किंवा प्रामाणिकपणा म्हणा, दाखवला नाहीं.

सरकारच्या बाजूनें जी अडचण उपस्थित होईल असा आमचा कयास होता, ती एप्रिलच्या प्रारंभीं खरोखरच उत्पन्न झाली. आनंदमूर्तीला हद्दपार करण्यांत आलें आणि आश्रमीय मंडळीला मिळेल तेथून पकडण्याचा सपाटा चालू झाला. शुद्धि बळजबरीनें होत आहे ह्या मुद्द्यावर गोव्यांतील वजनदार लोकांनाही अटक होऊं लागली. त्यामुळें शुद्ध झालेले लोक भिऊन गेले. इतकेंच काय पण एकदोन कुटुंबें पुन: खिस्ती झालीं. आश्रमाची मंडळी शुद्धि करते असें म्हणावें तर त्यांना आपण होऊन सरकारच्या स्वाधीन करणें प्राप्त आणि गोमंतकीय लोक स्वत:च करतात म्हणावें तर हद्दपार होण्याची भीति, असा पेंच उत्पन्न झाला! पण झालेली शुद्धि बुडूं नये म्हणून, येतील तीं संकटें पत्करून गोमंतकीय स्वत:च शुद्धि करतात असें सांगण्याचें ठरलें व त्याप्रमाणें करण्यांत आलेंही. तसें सांगितल्यानें आश्रमावरील बंदी उठण्यासही सोपें होईल असें आम्हांस वाटलें. पण आश्रमानें ह्याचा अर्थ उलटा केला! हद्दपार झालेल्या आनंदमूर्तींचीच सही घालून शुद्धिपत्रें द्यावीं असा मूर्खपणाचा हट्ट आश्रमीय

मंडळीनें धरला. पण हें धडधडीत असत्याचरण करणें आम्हांस शक्य नव्हतें. शिवाय कायदेशीर रीत्या प्रत्यक्ष शुद्धीलाच तें घातक झालें असतें. केळकर–मुंजे शिष्टमंडळ ज्या वेळीं गोमंतकांत गेलें त्या वेळीं त्यांना ही स्थिति आम्हीं स्पष्ट सांगितली होती व त्यांच्याच सल्ल्यासंमतीनें गोमंतकीय हिंदुसभा स्थापन केली होती. पण तिच्याविरुद्ध आश्रमानें अ. भा. हिं. महासभेच्या गोमंतक शाखेचा फार्स उठविला. विशेष दुर्दैव हें कीं, गोमंततकीय हिंदूनीं आपण होऊन बहाल केलेल्या श्रेयाच्या घोड्यावर आरूढ होऊन आश्रमानें त्यांच्या पाठीवर भेकड, नादान, लांचखाऊ, शुद्धिविरोधक वगैरे आरोपांच्या चाबकाचे कोरडे ओढीत ओढीत आपली पांढरी झोळी पिवळी करण्याचा अचूक व्यूह रचला. आणि हा व्यूह भेदला जाऊं नये म्हणून, गोमंतकांतील हिंदूनीं शुद्धीच्या श्रेयाकरितां भांडण चालवलें असून तें सबंध महाराष्ट्राविरुद्ध आहे, असा कांगावा आश्रम करीत सुटला आहे! संरक्षणाकरितां घेतलेलें हें कवच शरसंधान आपणच केलें असें म्हणत आहे! कलियुगाचा उलटा प्रभाव अन्य कोणता असणार?

परंतु त्याचा हा कांगावा सपशेल खोटा असून आश्रमाशीं गोमंतकीय हिंदूंची जी तेढ आली आहे तिच्या मुळाशीं श्रेयाचा प्रश्न बिलकूल नाहीं. कारण जर ही तेढ श्रेयाकरतां असती तर गोमंतकीय हिंदूनीं खरें कार्य स्वतः करून त्याचें श्रेय सुरुवातीसच आश्रमाला आपण होऊन कधींच दिलें नसतें आणि ज्या शुद्धीसाठीं आश्रमाची एक कपर्दिक किंवा शारीरिक अगर नैतिक स्वरूपाच्या श्रमाचा लवलेशही खर्ची पडला नाहीं ती शुद्धीही

विनायकमहाराजांचा फोटो ठेवून आणि आश्रमाचींच प्रतिज्ञा-पत्रकें वापरून केली नसती. त्याचप्रमाणें, ह्या तेढीचें 'गोमंतक विरुद्ध महाराष्ट्र' असें रूपही मुळींच नाहीं. कारण आश्रम व महाराष्ट्र, किंवा आश्रमाचें कुकर्म आणि महाराष्ट्र ह्यांच्यांतील भेद जाणण्याइतके गोमंतकीय लोक सुबुद्ध असून, महाराष्ट्रांतील हिंदु आणि गोमंतकीय हिंदु ह्यांचे राजकीय खेरीज करून इतर संबंध काय आहेत तें मी आमच्या दौऱ्यांत ठिकठिकाणीं सांगत आलों आहें व आपणासही तें सुरुवातीस सांगितलें आहेच.

आम्हांस आतां असा प्रश्न करण्यांत येतो कीं, शुद्धि गोमंतकीयांनीं केली तर आतां ते ती कां करीत नाहींत? ह्याचें उघड उत्तर हें कीं, शुद्धीचें जें शेत आम्ही पिकवलें होतें तें आश्रमाच्या नांवानें आम्हीं कापलें. आतां नवीन शेत पिकवावयाचें आहे. शेताची कापणी नेहमीं करतां येत नाहीं; मशागत मात्र नेहमीं करावी लागते. पण तिच्यासाठीं जो पैसा पाहिजे तो आम्हीं आश्रमाच्या हवालीं केला आणि आश्रम आम्हांस उसनवट म्हणूनदेखील २०० रुपयेही देण्यास तयार नाहीं! शिवाय, त्यानें ज्या भानगडी व अडचणी उपस्थित केल्या त्या निस्तरण्यास पुष्कळच शक्ति खर्च करावी लागत आहे. आतां आमच्यांत समेट झाला आहे. तो जर आश्रमानें मनोभावें पाळला तर शुद्धीचें शेत आम्ही पिकवूं अशी आशा आहे. आश्रम जर इतका समर्थ तर वसईंतील शुद्धि त्याला अद्याप कां शक्य होत नाहीं? स्थानिक लोकांची तयारी आवश्यक तितकी नाहीं म्हणूनच नव्हे काय?

सद्गृहस्थहो; सध्याची वेळ हिंदु समाजाच्या क्रांतीची आहे. अशा वेळीं ज्यांना लोकांत कांहीं कारणांमुळें पूज्यत्व आलें आहे त्यांनीं सत्य, सरळपणा, शुद्ध हेतु वगैरे गुणांच्या जोरावरच आपलें कार्य चालवलें पाहिजे. सहा हजार लोकसंख्येच्या समाजांतील ४-५ शें मुलांना शिकविण्याकरतां शंभर शिक्षक व शंभर शिक्षकिणी पाहिजेत असले भपके करतां कामा नयेत. कोणी झाला तरी सर्वांना सर्व काल फसवूं शकणार नाहीं, ह्याची जाणीव त्यानें पूर्णपणें बाळगली पाहिजे. असो. गोमंतकीय हिंदु-सभा ही गोमंतकीय हिंदूंच्या कल्याणाकरितांच स्थापन झालेली आहे. आणि त्यांचें कल्याण पर्यायानें अखिल हिंदु समाजाच्या उत्कर्षास कारणीभूत होणार आहे. ह्यासाठीं परमेश्वर आम्हांस एकमेकांच्या हातांत हात घालून कार्य करण्याची बुद्धि देवो, अशी त्याची प्रार्थना करूं या ! शेवटीं, मला एकच मुद्दा सांगावयाचा आहे तो हा कीं, गोमंतकांतील शुद्धीला केवळ धार्मिक दृष्टीनें महत्व नाहीं. तर त्याबरोबरच मराठी वाङ्मय व राष्ट्रीयत्व ह्यांच्या दृष्टींनींही तें आहे. गोमंतकांतील ख्रिश्चन म्हटला कीं तो आपलें वाङ्मय पोर्तुगीज आहे व आपलें राष्ट्र पोर्तुगाल आहे असें मानतो. अर्थात् ख्रिस्ती लोक हिंदु झाले म्हणजे ते आपलें वाङ्मय मराठी व आपलें राष्ट्र हिंदुस्थान असें मानतील. तेव्हां हिंदु धर्माच्या उत्कर्षाप्रमाणें मराठी वाङ्मयाचा उत्कर्षही ज्यांना हवा आहे त्यांनींही गोमंतकांतील शुद्धिकार्यास मदत करणें जरूर आहे.

# ९. लालाजींच्या स्मृतीस—

[ सुप्रसिद्ध हिंदी पुढारी लाला लजपतराय हे शनिवार ता. १७ नोव्हेंबर १९२८ रोजीं पहाटेस लाहोर येथें दिवंगत झाले. त्यांच्या निधनाबद्दल ब्रिटिश हिंदुस्थानांत ज्याप्रमाणें सार्वत्रिक दुःखप्रदर्शन झालें त्याप्रमाणें पोर्तुगीज हिंदुस्थानांतही झालें. दुसऱ्या कोणत्याही हिंदी पुढाऱ्याबद्दल गोमंतकांत इतका आदर व्यक्त करण्यांत आलेला दिसला नाहीं. पोर्तुगीज हिंदुस्थानच्या राजधानीचें शहर जें नवीन गोवें तेथील म्युनिसिपालिटीच्या दिवाणखान्यांत ता. २३ नोव्हेंबर रोजीं संध्याकाळीं कायदेमंडळाचे एक प्रमुख सभासद व प्रसिद्ध कायदेपंडित सि. आंतॉनियु शाव्हियॅर गॉमिश् पेरैर त्यांच्या अध्यक्षतेखालीं अखिल नागरिकांतर्फे आणि ता. २९ रोजीं मडगांव येथें म्युनिसिपालिटीच्या दिवाणखान्यांत सि. मिनेझिश् ब्रागांस त्यांच्या अध्यक्षतेखालीं सासष्टीच्या नागरिकांतर्फे दुःख प्रदर्शित करण्यासाठीं जंगी जाहीर सभा भरल्या होत्या. प्रस्तुत ठिकाणीं पणजीच्या सभेंतील भाषणांतलाच भाग विशेष आहे. पण मडगांवच्या सभेंतील भाषणांतलेही कांहीं मुद्दे दिले आहेत. ]

माझ्यापूर्वी भाषणें केलेल्या वक्त्यांपैकीं कित्येकांस असा प्रश्न पडला असल्याचें दिसतें कीं, 'दिवंगत लालाजी हे ब्रिटिश हिंदुस्थानांत जन्मले असतां आणि त्यांचें सर्व कार्यही तेथेंच होऊन गेलें असतां आम्ही पोर्तुगीज हिंदुस्थानांतील लोकांनीं त्यांच्या निधनप्रसंगाच्या निमित्तानें त्यांच्याबद्दल इतका उत्कट

आदर इतक्या सामुदायिक रीतीनें कां दाखवावा? लालाजींचें शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक व राजकीय कार्य इतकें प्रचंड होऊन होऊन गेलें आहे कीं, हिंदुस्थानांतील थोरांत थोर व्यक्तींत त्यांची गणना करतां येईल. पण त्यांचा संबंध आमच्याशीं कसा पोंचतो?' ह्याला, उलट प्रश्नानें, माझें उत्तर असें कीं, आम्ही पोर्तुगीज हिंदुस्थानांतील रहिवाशी माणसें आहोंत कीं नाहींत? जर आम्ही माणसें असलों आणि आमची माणुसकी प्रगट होणें जरूर असलें तर लालाजी व आम्ही ह्यांचा संबंध काय हा प्रश्नच उद्‌भूत होऊं शकत नाहीं. सुप्रसिद्ध तत्त्ववेत्ता कार्लाईल ह्यानें विभूतिपूजनाचें महत्त्व काय आहे तें एका स्वतंत्र ग्रंथांत दाखवून दिलें आहे. पोर्तुगीज महाकवि लुईज द कामॉइश् हे एक वाङ्मय-विभूति समजले जातात व म्हणूनच त्यांच्या 'लुझीयदश्' ग्रंथांतील विषयाबद्दल कोणाचा कितीही मतभेद असला तरी त्यांच्या काव्यात्मक विभूतिमत्त्वाबद्दल कोणासही आदर व्यक्त करावाच लागतो. तो करतांना राष्ट्र, राज्य, धर्म किंवा वर्ण आड येत नाहीं. तीच गोष्ट प. वा. लालाजींचीही आहे. त्यांनीं जातिभेद-निवारण, अस्पृश्योद्धार वगैरे बाबतींत जें महत्तम कार्य केलें तें धर्मविशिष्ट असें तरी पर्यायानें एकंदर मानवजातीच्या सुधारणेस कारणीभूत होणार आहे हें कोणास नाकबूल करतां येईल? त्यांचे शिक्षणविषयक प्रयत्नही अशाच जातीचे आहेत. पण ह्या सर्वां-पेक्षां त्यांनीं हिंदी राष्ट्राच्या स्वातंत्र्याबद्दल जो स्वार्थत्याग केला व जे कष्ट सोसले त्यांची तोड मिळणें कठीण. हिंदुस्थान हें लोकसंख्येच्या दृष्टीनें एक पंचमांश जग आहे ही गोष्ट लक्षांत

घेतली म्हणजे त्याच्या सुखशांतीवर अखिल मानवजातीची सुखशांति कशी अवलंबून आहे तें विशद करून सांगण्याचें कारण उरत नाहीं. आमचा हा प्रांत पोर्तुगीज राज्याचा राजकीय घटक असला तरी हिंदुस्थानचा राष्ट्रीय व आर्थिक घटक आहे ह्याची कबुली प्रत्यक्ष आमच्या सरकारनेंही दिली आहे. ब्रिटिश हिंदुस्थान हें जर परराष्ट्र असतें तर इतर परराष्ट्रांत जाण्यास ज्याप्रमाणें पासपोर्ट मिळवावा लागतो, त्याप्रमाणें ब्रिटिश हिंदुस्थानांत जाण्यासही आमच्या सरकारनें पासपोर्ट ठेवला नसता काय? अशा स्थितींत, अखिल जगतांत मान मिळविलेली आमची एक राष्ट्रीय विभूति दिवंगत झाल्या वेळीं आम्हीं तिजविषयींचा नुसता आदरभावही व्यक्त करूं नये असें कोण म्हणेल? आणि जर एकादा तसें म्हणणारा निपजलाच तर त्याला 'मनुष्य' ही संज्ञा कशी देतां येईल? ज्याला मनुष्य म्हणवून घ्यावयाचें असेल त्यानें मनुष्यजातीच्या उत्कर्षास कारणीभूत झालेल्या विभूतीबद्दल आदरभाव तरी व्यक्त केला पाहिजे किंवा आपणास मानवजातीशीं कांहीं कर्तव्य नसून आपण पशुकोटींतले आहोंत ह्याची कबुली तरी दिली पाहिजे! गोमंतकीय लोक धर्मभेदाकडे नजर न देतां, आपण मानव आहोंत व निस्सीम सत्यप्रियता, अतुल स्वार्थत्याग, अचाट श्रमसहिष्णुता, अलोट धैर्य इत्यादि लजपतरायजींच्या द्वारें व्यक्त झालेल्या गुणांची किंमत ओळखण्याइतके आपण सुबुद्ध व सत्प्रवृत्त झालों आहोंत, हेंच आजच्या प्रसंगानें व्यक्त करीत आहेत, असें मी मानतों.

---

घेतली म्हणजे त्याच्या सुखशांतीवर अखिल मानवजातीची सुखशांति कशी अवलंबून आहे तें विशद करून सांगण्याचें कारण उरत नाहीं. आमचा हा प्रांत पोर्तुगीज राज्याचा राजकीय घटक असला तरी हिंदुस्थानचा राष्ट्रीय व आर्थिक घटक आहे ह्याची कबुली प्रत्यक्ष आमच्या सरकारनेंही दिली आहे. ब्रिटिश हिंदुस्थान हें जर परराष्ट्र असतें तर इतर परराष्ट्रांत जाण्यास ज्याप्रमाणें पासपोर्ट मिळवावा लागतो, त्याप्रमाणें ब्रिटिश हिंदुस्थानांत जाण्यासही आमच्या सरकारनें पासपोर्ट ठेवला नसता काय? अशा स्थितींत, अखिल जगतांत मान मिळविलेली आमची एक राष्ट्रीय विभूति दिवंगत झाल्या वेळीं आम्हीं तिजविषयींचा नुसता आदरभावही व्यक्त करूं नये असें कोण म्हणेल? आणि जर एकादा तसें म्हणणारा निपजलाच तर त्याला 'मनुष्य' ही संज्ञा कशी देतां येईल? ज्याला मनुष्य म्हणवून घ्यावयाचें असेल त्यानें मनुष्यजातीच्या उत्कर्षास कारणीभूत झालेल्या विभूतीबद्दल आदर-भाव तरी व्यक्त केला पाहिजे किंवा आपणास मानवजातीशीं कांहीं कर्तव्य नसून आपण पशुकोटींतले आहोंत ह्याची कबुली तरी दिली पाहिजे! गोमंतकीय लोक धर्मभेदाकडे नजर न देतां, आपण मानव आहोंत व निस्सीम सत्यप्रियता, अतुल स्वार्थत्याग, अचाट श्रमसहिष्णुता, अलोट धैर्य इत्यादि लजपतरायजींच्या द्वारें व्यक्त झालेल्या गुणांची किंमत ओळखण्याइतके आपण सुबुद्ध व सत्प्रवृत्त झालों आहोंत, हेंच आजच्या प्रसंगानें व्यक्त करीत आहेत, असें मी मानतों.

नं. १३०
सं. नि. ८३८

# क्षत्रिय-वैश्यांचें शास्त्रसिद्ध अस्तित्व आणि प्रायश्चित्त.

## भाग १ ला.

नं. ९३८

## वेदोक्त चळवळीचा पूर्ववृत्तांत.

१ पेशवाईचा अंत झाल्यानंतर हिंदुस्थानांतील लोकांना विशेषतः राजेरजवाड्यांना स्वारीशिकारीचा कांहींच खटाटोप उरला नाहीं. इंग्रजांनीं संरक्षण-पालन-संवर्धनाची सर्व जबाबदारी घेतल्यामुळें सर्वांस पूर्ण स्वास्थ्य व सुखानुभव मिळाला. अव्वल इंग्रजीमध्यें इंग्रजी ज्ञानाचा लाभ झालेल्या सुशिक्षितांमध्यें नवीन विचाराचें चैतन्य खेळूं लागलें. अनेक प्रकारच्या चळवळी देशोद्धारार्थ सुरू झाल्या. जोतिबा फुल्यांनीं १८८३ त सत्यशोधक समाजाची स्थापना केली. ब्राह्मणेतरांना ब्राह्मणांच्या गुलामगिरींतून सोडवून त्यांना शिक्षण देऊन ब्राह्मणेतर समाजाची सामाजिक सुधारणा करण्याचा त्यांचा हेतु होता. त्यांनीं दीनबंधु नांवाचें १८७७ त वर्तमानपत्र काढून आपलीं मतें प्रसृत करण्यास प्रारंभ केला. इंग्रजी शिक्षणामुळें समान हक्काची, समत्वाची, आणि समाजांतल्या सर्व घटकांना स्वाभिमानाची जाणीव होऊं लागली. शिक्षण घेतलेल्या मराठ्यांना आपण क्षत्रिय आहोंत, अर्थात् आपणांस वेदाधिकारही आहे असें वाटूं लागलें. श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या सारख्या प्रतिभासंपन्न, सुज्ञ व शोधक संस्थानिकांचेंही या प्रश्नाकडे मन वेधल्यामुळे या विषयाला चांगलेंच महत्त्व आलें "**राजा-बोले दळ हाले**" या म्हणीप्रमाणें बडोदे संस्थानांत हा विषय रंगूं लागला. गायकवाड सरकारचे आश्रित श्री. विरजे यांनीं 'क्षत्रिय आणि त्यांचें अस्तित्व' या विषयावर एक पुस्तकही लिहिलें. या पुस्तकावर उलटसुलट चर्चा होऊं लागली. आणि याच सुमारास कै. वा. श्रीमंत छत्रपति शाहू-महाराज, संस्थान कोल्हापूर, यांनाही वेदोक्त कर्म करण्याची इच्छा उत्पन्न झाली. छत्रपति महाराजांजवळ जी वृद्ध आप्त मंडळी होती ती " जुनें

मोडूं नये नवें करूं नये " अशा बुद्धीची होती. तथापि महाराजांनीं श्री-शंकराचार्यापर्यंत तें प्रकरण नेऊन वेदोक्त कर्माचा अधिकार संकेश्वर मठाधिपतीकडून मिळविला; आणि ब्राह्मणांनीं वेदोक्त कर्में महाराजांच्या घरीं खुशाल करावीं असेंही आज्ञापत्र मिळविलें. हा अधिकार श्री शिष्य जगद्‌गुरु यांच्या कडून मिळाला होता म्हणून वाईकर ब्रह्म वृंदांनीं मुख्य श्रींकडे शास्त्रविरुद्ध निर्णयाचा फिरून विचार व्हावा असा तपासणी अर्ज केला. त्यामुळें श्रींनीं छत्रपतींचा वेदोक्ताचा अधिकार रद्द केला म्हणून तंट्यास सुरवात झाली.

२ मुख्य श्री भिल्लवडीकर स्वामी यांचे श्री शिष्य ब्रह्मनाळकर स्वामी व कोल्हापूरचे महाराज हे एका बाजूस व दुसऱ्या बाजूस मुख्य श्री. वांईकर ब्रम्हवृंद, आणि पुराणमताभिमानी मंडळी असे दोन जोराचे तट पडले. आणि केवळ अभिनिवेशानें एकमेकांवर टीकास्त्रांचा मारा सुरू झाला. भिल्लवडीकर मुख्य श्रींनीं मिरजकर यांस श्री शिष्य केलें. आणि तिकडे कोल्हापुरच्या महाराजांनीं ब्रम्हनाळकरांना उचलून धरून वेदोक्ताविरुद्ध चळवळ करणाऱ्या कोल्हापूर संस्थानांतील राजोपाध्ये प्रभृति ब्राह्मण मंडळीवर शस्त्र उचलिलें. या वेदोक्त प्रकरणापासून तों आज तागायत कोल्हापुराकडील प्रकार काय काय घडले आहेत व घडत आहेत व ते किंमूलक आहेत हें सांगण्याचें प्रयोजन नाहीं. तसेंच ब्रह्मनाळकरांचे शिष्य व त्यांचे शिष्य पित्रे स्वामी, व पित्रे स्वामीचे शिष्य डॉक्टर कुर्तकोटी, आणि मिरजकरांचे शिष्य शेंडे स्वामी आणि शेंडे स्वामींचे शिष्य शिरोळकर स्वामी अशा परंपरेंत जगद्‌गुरूंचे तंटे आणि वेदोक्त प्रकरणाची खळबळ कशी अव्याहत चालली आहे हें सर्वश्रुत आहे. या वादांत धर्मसत्ताधिष्ठित जगद्‌गुरु व शासनसत्ताधिष्ठित कै. वा. छत्रपति हे मुख्य दोन सोडन दिले तर बाहेरचे पुष्कळ अतिरथी महारथीही या वाग्युद्धांत पडलेले होते. श्री कृष्णानंद स्वामी, चिंतामणराव वैद्य, कै. वा. लोकमान्य टिळक, काळकर्ते, भालाकर्ते अशी मंडळी वेदोक्ताचा पुरस्कार करीत होती, तर कै. वा. धर्ममार्तंड भाऊशास्त्री लेले, कै. वा. विद्यावाचस्पति आपाशास्त्री राशिवडेकर, व अशीच कांहीं इतर शास्त्री मंडळी या कार्याला कंबर कसून विरोध करीत होती. तात्पर्य, १९०५ सालाच्या या वादांत कांहीं " तत्वबोध " झाल्याचें दिसत नाहीं.

३ पुढें १९०६ सालीं बंगालची फाळणी झाल्यामुळें सर्व राष्ट्रांत एका नव चैतन्याचा संचार झाला. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य या

विषयांच्या गदारोळानें, सर्व देश दुमदुमून गेला. त्या मुळें पूर्वीच्या या तणतुण्यान्या नादाकडे कुणाचें लक्ष्य गेलें नाहीं. किंबहुना असेंही म्हणतां येईल कीं जागृतीच्या काळांत या प्रश्नाचें पूर्वीचें उग्र स्वरूप बहुतेक नाहींसें झालें. १९१४ सालीं महायुद्ध सुरू झालें, व सरकारला हिंदुस्थानाची मदत घेण्याची तीव्रता भासूं लागली. त्याच वेळीं हिंदी राष्ट्रानें स्वराज्याची मागणी जोरानें केली म्हणून प्रातिनिधिक स्वरूपाचें स्वराज्य कसें काय द्यावें हें ठरविण्याकरितां भारत मंत्री मॅंटेग्यु साहेब हे हिंदुस्थानांत आले. त्यामुळें जातवार प्रतिनिधींच्या चळवळीला तोंड लागलें. यापूर्वी १९१६ सालीं लखनौ कांग्रेसमध्यें मुसलमानांना सवता सुभा देण्यांत आला होता; म्हणून इतर जातींना उचल घेण्यास भारत मंत्र्याचें आगमन हें मोठेंच कारण सांपडलें. जाति-जातींच्या सभा भरूं लागल्या. निरनिराळ्या जातींचीं शिष्ट मंडळें विलायतेस रवाना झालीं. त्यांनीं विलायतेस जाऊन आपापलीं मतें कळविलीं. परंतु जातवार प्रतिनिधींच्या स्वरूपाचें स्वराज्य सर्वांशीं मिळालें नाहीं. समुद्रमंथनांतून जसें हालाहल विष उत्पन्न झालें तसें या चळवळींतून पुढें ब्राह्मणब्राह्मणेतरांचें द्वेषविष उपस्थित होऊन अत्याचार सुरू झाले. कांहीं सत्यशोधकांनीं तमाशाच्या द्वारें धिंगाणे घालण्यास सुरवात केली. पुष्कळ खेड्यांतील ब्राह्मणांना अतिशय त्रास झाला. अद्यापही सत्यशोधकी अत्याचार घडल्याचें केव्हां केव्हां वृत्तपत्रांत वाचावयास मिळतें. अत्याचारांची विश्वसनीय माहिती पंढरपूरच्या ब्रा. सं. सभेच्या कमिशननें प्रसिद्ध केली आहे. असो.

४ काल हा एक मोठी चमत्कारिक वस्तु आहे. कालाच्या उदरांतून काय काय रत्नें बाहेर पडतील, काल कोणाला पोटांत घेईल, काल कोणाची बुद्धि फिरवील. हें कांहीं सांगतां येत नाहीं. कालाच्या ओघांत सांपडलेल्या, दुर्दशेनें ग्रासलेल्या आणि अवनतीच्या फेऱ्यांत पडलेल्या स्वराज्यैकदृष्टी हिंदु समाजाला अलीकडे म्हणजे गेल्या पांच चार वर्षांत संघटित होण्याची बुद्धि तीव्रतेनें होऊं लागली आहे. जातीजातींतले तंटे मोडावे, सर्वांचें ऐक्य करावें, समाजांत बल वाढावें, अशा बुद्धीनें पुष्कळ परिषदा भरूं लागल्या आहेत यांतच डॉक्टर कुर्तकोटी, श्रीशंकराचार्य मठ करवीर, यांनीं गेलीं तीन चार वर्षें हिंदुसमाजाकरितां **हिंदु धर्म परिषदेचा** स्तुत्य उपक्रम चालविला आहे.

५ महाराष्ट्रांत धर्म आणि राष्ट्रीय शिक्षण देण्याकरितां 'प्राज्ञपाठशाळा मंडळ' ही संस्था स्थापन झालेली आहे. या संस्थेंतील पंडित व

शास्त्री मंडळी व्यापक दृष्टीनें देशकाल वर्तमान लक्ष्यांत घेऊन धार्मिक प्रश्नांचा विचार करीत असते. या मंडळीच्या चर्चेत ठरलेला हिंदु धर्म-सुधारणेची योजना आम्हीं आपली म्हणून गेलीं चार वर्षें धर्म परिषदेपुढें व महाराष्ट्रापुढें मांडीत आहोंत. आमच्या योजनेंत क्षत्रिय आणि वैश्य यांच्या बद्दल एक कलम आहे. या विषयावर आम्हीं वेळोवेळी आमचे विचार प्रकट केले आहेतच. शिवाय नागपूर येथें महाराष्ट्र धर्म परिषदेनें क्षत्रिय-वैश्यांचे अस्तित्व सिद्ध केलें आहेच; तथापि अद्याप कांहीं शास्त्री मंडळी आणि इतर पुराणमताभिमानी लोक हा वाद पुनः पुनः उकरून काढीत असतात. त्यांच्या या वादाला हल्लींची जनता किती मान देते हें सांगण्याचें प्रयोजन नाहीं. तथापि भावी पिढीस चातुर्वर्ण्याच्या पुनर्घटनेचें, क्षत्रियवैश्यांच्या अस्तित्वाचें आणि त्यांच्या प्रायश्चित्ताचें स्वरूप समजावें म्हणून हा विषय आम्ही पुस्तक रूपानें पुढें ठेवीत आहोंत.

## भाग २ रा.

# अभाववाद्यांचा पूर्वपक्ष.

१ या विषयावर जो वाद चालला आहे, तो केवळ कांहीं पुराण-वाक्यांच्या आधारें चालला आहे. तीं पुराणवाक्यें उद्धृत करणारा अर्वाचीन ग्रंथकार कमलाकर भट्ट हा होय. तेव्हां त्यांचें म्हणणें येथें प्रथम देतों.

ननु कलौ क्षत्रियवैश्याभाव उक्तो भागवते नवमस्कंधे ।

इक्ष्वाकूणामयं वंशः सुमित्रांतो भविष्यति ।
यतस्तं प्राप्य राजानः संस्थां प्राप्स्यंति वै कलौ ॥
देवापिर्योगमास्थाय कलाम ग्राममास्थितः ।
सोमवंशं कलौ नष्टं कृतादौ स्थापयिष्यतीति ॥

द्वादशेपि.

एतेषां नामलिंगानां पुरुषाणां महात्मनाम् ।
कथामात्रावशिष्टानां कीर्तिरेव स्थिता भुवि ॥

देवापिः शंतनोर्भ्राता मरुश्चेक्ष्वाकुवंशजः ।
कलापग्राम आसाते महायोगबलान्वितौ ॥
ताविहेत्य कलेरंते वासुदेवानुशिक्षितौ ।
वर्णाश्रमयुतं धर्मं पूर्ववत्प्रथयिष्यतः ॥

**विष्णुपुराणेऽपि—**

देवापिः पौरवो राजा मरुश्चेक्ष्वाकुवंशजः ।
कृते युग इहागत्य क्षत्रमावर्तकौ हि तौ ॥

**तथा--**

महापद्मपतिः कश्चिन्नंदक्षत्रविनाशकृत् । .........

**पुराणांतरेऽपि—**

ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्याः शूद्रा वर्णास्त्रयो द्विजाः ।
युगे युगे स्थिताः सर्वे कलावाद्यंतयोः स्थितिरिति
अतः कथं द्विज संकरजा उक्ताः । मैवम् ।
कलौ तु बीजभूतास्तु केचित्तिष्ठंति भूतले ।
तथैव देवापिपुरू ( मरू )सांप्रतं समवास्थिताविति विष्णुपुराणात् ।
ब्रह्मक्षत्रविशः शूद्रा बीजार्थं य इह स्थिताः ।
कृते युगे हि तैः सार्धं निर्विशेषास्ततोभवन्निति । मात्स्योक्तेश्च–प्रच्छन्न-रूपाः स्वकर्मभ्रष्टाः क्षत्रिया वैश्याश्च संत्येव केचिदित्यस्मत्पितृचरणाः॥
वाई येथील कै. वा. धर्ममार्तंडांच्या भाषेत या सर्व वचनांतील मुद्दे मुख्य दोन असून ते पुढीलप्रमाणें आहेत.

२ कलावाद्यंतयोः स्थितिः हें वचन व्यास महर्षींचेंच असल्यामुळें " श्रुतिस्मृतिपुराणोक्तफलप्राप्त्यर्थं " असें म्हणून प्रत्येक कर्माचा संकल्प करणाऱ्या द्विजांना तें अत्यंत मान्य आहे.

३ याज्ञवल्क्य मुनींनीं धर्मस्थानामध्यें पुराणांचें परिगणन केलें असल्यामुळें हें पुराण वचन धर्मशास्त्रामध्यें प्रमाणभूत मानणेंच भाग आहे. परिसाप्रमाणें क्षत्रिय नांवानें विद्यमान, परंतु रूपानें गुप्त असल्यामुळें हें वचन अर्थवादपर अथवा अतिशयोक्तीचें नसून अक्षरशः खरें मानण्यासारखें आहे. आणि वचनांत सांगितल्याप्रमाणें कलींत क्षत्रिय व वैश्य नसल्याचें सिद्ध होत आहे.

# भाग ३ रा

# पूर्वपक्षखंडण व अस्तित्वसिद्धि.

१ आर्य संस्कृतीच्या आणि सनातन वैदिक धर्माच्या इतिहासामध्ये चातुर्वर्ण्य संस्थेचें बरेंच महत्व आहे. किंबहुना असेंहि म्हणतां येईल कीं चातुर्वर्ण्य संस्थेच्या जोगावरच हिंदुसमाज हा इतके दिवस टिकलेला आहे. ईश्वराचे अवतार चातुर्वर्ण्यसंस्थापना आणि धर्मसंस्थापना करण्याकरितांच होत असतात. चातुर्वर्ण्याचे धर्म आणि संस्कृति या दोन्ही दृष्टींनीं इतकें महत्व असतां जगाला ललामभूत होणाऱ्या या संस्थेचा नायनाट करण्याचा प्रयत्न जेव्हां सनातन वैदिक धर्मीय लोकच करूं लागतात तेव्हां " कालाय तस्मै नमः " असें म्हणण्याची पाळी येते. परक्या संस्कृतीनें आर्य संस्कृतीची ही संस्था आधींच खिळखिळी करून टाकली आहे अशा स्थितींत जेव्हां कांहीं लोक पुराण वाक्यें पुढें करून क्षत्रिय वैश्यांचा अभाव प्रतिपादन करतात तेव्हां " कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ " या म्हणीचें स्मरण होतें. असो.

पूर्वपक्षाची बाजू किती लंगडी आहे आणि क्षत्रिय व वैश्य यांचें अस्तित्व कसें सिद्ध आहे हें आतां पाहूं.

श्रुति, स्मृति आणि पुराणें हे आमचे धर्मग्रंथ होत. पुराणांपेक्षां स्मृति आणि स्मृतींपेक्षां श्रुति यांना उत्तरोत्तर प्रामाण्य जास्त आहे असें शास्त्रमत आहे, म्हणून श्रुति, स्मृति आणि पुराणदृष्ट्या या प्रश्नाचा विचार करूं. क्षत्रिय-वैश्यांच्या अभावबोधक श्रुति कोठेंहि नाहींत. उलट समाजाच्या स्वास्थ्याकरितां कोणकोणत्या गोष्टी असाव्यात असें जेथें जेथें वर्णन आलेलें आहे तेथें तेथें आमच्या राष्ट्रामध्यें क्षत्रिय, वैश्य असावेत असेंच म्हटलें आहे. नमुन्याकरितां तैत्तिरीय संहितेंतील एक सूक्त देतों.

आब्रह्मन् ब्राह्मणो ब्रह्मवर्चसी जायतामास्मिन् राष्ट्रे राजन्य इषव्यः शूरो महारथो जायतां दोग्ध्री धेनुर्वोढानड्वानाशुः सप्तिः पुरंधिर्योषा जिष्णू रथेष्ठाः सभेयो युवास्य यजमानस्य वीरो जायतां निकामे निकामे नः पर्जन्यो वर्षतु, फलिन्यो न ओषधयः पच्यंतां योगक्षेमो नः कल्पताम् ।

या सूक्तांत, हे परमेश्वरा, आमच्या राष्ट्रामध्यें ब्रह्मतेजानें युक्त असे ब्राह्मण, शूर, महारथी, आणि अचूक नेम मारण्यामध्यें पटाईत असे क्षत्रिय, दुभत्या गाई, चांगले अवलादीचे बैल ( यांची पैदास करणारे

उत्तम वैश्य ) वेगवान् घोडे, पतिव्रता स्त्रिया, सभापंडित तरुण, वेळचे वेळीं पाऊस आणि सर्व प्रकारची धनधान्यसमृद्धि होवो असें मागितलें आहे. यावरून क्षत्रियांची राष्ट्राच्या सुस्थितीस किती आवश्यकता आहे याची कल्पना येईल.

बृहदारण्यक उपनिषदाच्या पहिल्या अध्यायाच्या चौथ्या ब्राह्मणांत सृष्ट्युत्पत्ति सांगितली आहे. तेथें परब्रह्मानें आधीं ब्राह्मण उत्पन्न केले. परंतु तेवढ्यानें पूर्तता झाली नाहीं, म्हणून " श्रेयोरूपमत्यसृजत क्षत्रम् " श्रेयस्कर असें क्षत्र उत्पन्न केलें व पुढें " सविशमसृजत " विश् म्हणजे वैश्य उत्पन्न केले असें म्हटलें आहे.

तात्पर्य, चार वर्ण किंवा वर्ग उत्पन्न केल्याशिवाय समाजाला सुख आणि शांति यांचा अनुभव येत नाहीं.म्हणूनच परब्रह्मानें ही व्यवस्था केली.

श्रुतीनंतर सुप्रसिद्ध व सर्वमान्य मनु, याज्ञवल्क्य व पराशर अशा स्मृतींमध्यें कोठेंहि क्षत्रिय–वैश्यांचा अभाव सांगितला नाहीं. उलट क्षत्रिय-वैश्य यांना उद्देशून ब्राह्मणाप्रमाणें सर्व धर्म सांगितले आहेत. पराशर स्मृतीमध्यें प्रस्तावनेंतच ( त्या वेळीं सर्व वर्ण शूद्रतुल्य झाले होते म्हणून ) " तेषां निंदा न कर्तव्या युगरूपा हि ते द्विजाः " असें स्पष्ट म्हटलें आहे. कलियुगामध्यें प्रमाण म्हणून समजलेली जी पराशर स्मृति तिच्यावरून क्षत्रिय-वैश्यांचा अभाव बिलकुल सिद्ध होत नाहीं. महाभारत हा इतिहास ग्रंथ आहे. तथापि त्यांतील भगवद्गीतेला स्मृतितुल्य मान देतात, त्या गीतेमध्यें व महाभारतामध्यें कलियुगांत क्षत्रियवैश्यांचा अभाव आहे असें कोठें म्हटलेलें नाहीं. शांतिपर्वाच्या ७३ व्या अध्यायांत पुढील वचनें आहेत.

> परस्परस्य सुहृदौ विहितौ समचेतसौ ।
> ब्रह्मक्षत्रस्य संमानात्प्रजा सुखमवाप्नुयात् ॥ ४ ॥
> विमाननात्तयोरेव प्रजा नश्येयुरेव हि ।
> ब्रह्मक्षत्रं हि सर्वेषां वर्णानां मूलमुच्यते ॥ ५ ॥
> यदा हि ब्रह्म प्रजहाति क्षत्रं ।
> क्षत्रं यदा वा प्रजहाति ब्रह्म ॥ ६ ॥
>
> ..........................................
>
> एतौ हि नित्यसंयुक्तावितरेतरधारणे ।
> क्षत्रं वै ब्रह्मणो योनिर्योनिः क्षत्रस्य वै द्विजाः ॥ ११ ॥

या श्लोकांचें सूक्ष्म निरीक्षण केल्यास ब्राह्मणांशिवाय क्षत्रिय आणि क्षत्रियांशिवाय ब्राह्मण राहूंच शकत नाहींत असा सिद्धांत निघतो. म्हणून श्रुति, स्मृति आणि भारत यांमध्यें क्षत्रिय आणि वैश्यांचें अस्तित्व साधार सिद्ध आहे असेंच म्हटलें पाहिजे.

३ कलियुगांत क्षत्रियवैश्यांचा अभाव आहे असें म्हणणाऱ्यांची मुख्य मदार येऊनजाऊन काय ती शूद्रकमलाकरांतील 'ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्याः शूद्रा वर्णास्त्रयो द्विजाः । युगे युगे स्थिताः सर्वे कलावाद्यंतयोः स्थितिः ॥ या वाक्यावर आहे. कमलाकर भट्टानें 'पुराणांतरेऽपि 'असें म्हणून हें वाक्य उद्धृत केलें आहे. परंतु हा पूर्वपक्ष आहे आणि त्याच ग्रंथांत पुढें ग्रंथकारानें आपल्या पूज्य वडिलांचें क्षत्रिय–वैश्यांच्या अस्तित्वाबद्दलचें अनुकूल मत स्पष्ट सांगितलें आहे. तें असें—

कलौ बीजभूतास्तु केचित्तिष्ठन्ति भूतले ॥

प्रच्छन्नरूपाः स्वकर्मभ्रष्टाः क्षत्रियवैश्याश्च सन्त्येव क्वचिदिति अस्मत्पितृचरणाः ॥ यावरून बीजरूप प्रच्छन्नरूप म्हणजे उघडपणानें ज्यांचें अस्तित्व भासमान होत नाहीं अशा प्रकारचे क्षत्रिय--वैश्य कलियुगांत सुद्धां आहेत हें ठरतें. श्री. चिंतामणराव वैद्य हे हें वाक्य अनिर्दिष्ट पुराणांतलें आहे असें म्हणतात. जरी हें पुराणवाक्य असें कबूल केलें, तथापि त्यावरून श्रुति व स्मृति ह्या कालियुगांत रद्द आहेत असें ठरत नाहीं. पुराणाचा दर्जा हा श्रुति स्मृति यांच्या खालचा आहे असें आम्हीं प्रथमच सांगितलें आहे.

इंग्रजी शिक्षणामुळें अंधश्रद्धा बरीचशी नाहींशी होत आहे आणि तिच्या ठिकाणीं चिकित्सा उत्पन्न होऊं लागली आहे. या चिकित्सेची छाया जुन्या लोकांवरहि पडूं लागलेली दिसते. पुण्यास गुदस्तां भरलेल्या ब्राह्मण्यसभेचें हस्तपत्रक आमच्या हातीं आलें. त्यांत "श्रुतिस्मृतियुक्त धर्म पाळणारा ब्राह्मण" असें म्हटलें होतें. श्रुतिस्मृतिपुराणोक्त या संकल्पांतून पुराणोक्त हें पद बुद्धिपुरःसर ज्याअर्थीं हल्लीं गाळण्यांत येऊं लागलें आहे, त्याअर्थीं पुराणप्रामाण्याबद्दल बेभरंवसा उत्पन्न झाला आहे, हें उघड दिसतें. पुराणाला प्रामाण्य दिल्यास कोणकोणत्या आपत्ति आपणावर येऊन कोसळतील याची कल्पना पुराणमताभिमान्यांना सुद्धां येऊं लागल्यामुळें पुराणप्रामाण्यावर बोट ठेवून दहा वर्षांपूर्वीं जसें नामानिराळें होतां येत असे तसें आतां येईनासें झालें आहे.

घटकाभर प्रतिपक्षाचें म्हणणें कबूल केलें तरी कशी आपत्ति येते पाहा. महाभारतांतील वनपर्वांमध्यें "ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्याः नाशिष्यंति जनाधिप॥१ एकवर्णस्तदा लोको भविष्यति युगक्षये"—व प. अ. १९०. म्हणजे कलियुगाचे शेवटीं एकवर्ण होणार असे भविष्य सांगितलें आहे. कलियुगाच्या शेवटीं म्हणजे चौथ्या चरणांत क्षत्रियवैश्यांचा अभाव असूं शकेल. तो प्रथम चरणांत आहे असें म्हणण्यांत काय पुरुषार्थ आहे ? पांचवा वेद मानलेल्या भारतांतील वाक्याची किंमत पुराणवाक्यापेक्षां केव्हांहि कमी मानतां येणार नाहीं.

पुराणास जर प्रामाण्य द्यावयाचें असेल तर तीं सर्व पुराणें आणि उपपुराणें व्यास महर्षिप्रणीत आहेत असें समजून त्यांना वेदतुल्य मान्यता दिली पाहिजे. तशी द्यावयाची असेल तर पुनः कशी अडचण येते पहा. हल्लीं बौद्ध अवतार असून पुढें कलंकी अवतार होणार आहे, ही गोष्ट आबालवृद्धांसहि माहीत आहे. कलंकी अवताराची हकीकत कल्कि पुराणांत दिलेली आहे. त्यांत १० व्या अध्यायांत कल्कीच्या विवाहाचें वर्णन आहे:—

"विवाहो रमया कल्केरभूदतिसुखावहः ॥ ३० ॥ नृपा नानाविधैर्भोज्यैः पूजिता विविशुः सभाम् । ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्याः शूद्राश्चापरजातयः॥ ३१ ॥ विचित्रभोगाभरणाः कल्किं द्रष्टुमुपाविशम् ॥" कलियुगांत जर क्षत्रिय वैश्य नव्हते तर कल्कीच्या विवाहप्रसंगीं ते एकदम कोठून उत्पन्न झाले ? अभावापासून भावाची उत्पत्ति कशी मानतां येईल ? बरें, हेंच कल्किपुराण इतरपुराणांप्रमाणें व्यासप्रणीतच आहे असें मानलें तर त्यांतील प्रथमाध्यायाची संगति कशी लवावयाची ? कल्कि पुराणाच्या प्रथमाध्यायांत

एवन्नु प्रथमे पादे कलेः कृष्णाविनिंदकाः ॥३७ ॥
द्वितीये तन्नामहीनास्तृतीये वर्णसंकरः ।
एकवर्णाश्चतुर्थे च विस्मृताच्युतसत्क्रियाः ॥ ३८ ॥

असें वर्णन आहे. त्यावरून तृतीय चरणापासून वर्णसंकर होत होत चतुर्थ चरणांत चातुर्वर्ण्य बुडेल असें भविष्य आहे. कलीच्या तृतीय किंवा चतुर्थ चरणामध्यें बुडणारें चातुर्वर्ण्य आज बुडविण्यांत धर्माभिमान्यांना काय फलप्राप्ति आहे तें कळतें तर बरें झालें असतें.

एवढा वेळपर्यंत कलल्या विवेचनावरून "कलावाद्यंतयोः स्थितिः" हें अनिर्दिष्ट पुराणवाक्य आहे, तें पूर्वपक्षांतलें आहे. श्रुतिस्मृतिप्रामाण्यापुढे तें

रद्द आहे आणि इतर पुराणवाक्यांनाहि तसेंच प्रामाण्य दिलें तर कसा अनवस्थाप्रसंग येतो इत्यादि मुद्दे वाचकांच्या लक्षांत आले असतीलच. आणखी एक प्रश्न असा उपस्थित होतो कीं, हें प्रतिपक्षाचें सगळें म्हणणें जरी कबूल केलें तरी स्कंदपुराणांतील हें भावी स्थितीचें वर्णन कशावरून नसेल? अध्यात्मरामायण भागवत वगैरे ग्रंथांतहि कलियुगांतील सामाजिक परिस्थितीचें भेसूर चित्र रेखाटलेलें आहे. कलियुगांत आचार नाहीं; विचार नाहीं; तंत्र नाहीं मंत्र नाहीं; वर्ण नाहीं, आश्रम नाहीं, असें सांगण्याच्या श्लोकांत "कलाद्यंतयोः स्थितिः" असें म्हटलेलें नसेल कशावरून? सगळ्याच गोष्टी जेथें अंधेरांत आहेत, तेथें अमकेंच खरें आहे असें म्हणण्यांत काय स्वारस्य आहे? महापुराणांपैकी भागवत ग्रंथामध्यें "विप्रत्वे सूत्रमेव हि" "शूद्रप्रायेषु वर्णेषु" असें कलियुगवर्णन द्वादशस्कंधामध्यें आहे. या शब्दांचा केवळ वाच्यार्थच घ्यावयाचा असेल तर कलियुगांत ब्राह्मणहि नाहींत असेंच म्हटलें पाहिजे. कलियुगांत आदिअंत म्हणजे ब्राह्मण आणि शूद्र आहेत असें जर एका पुराणवाक्यानें ठरवावयाचें असेल तर दुसऱ्या पुराणवाक्यांनी ब्राह्मणच नाहींत असें कां म्हणूं नये? पुराणांतील वर्णनें हीं अर्थवादपर असतात आणि प्रकरणांवरून त्यांचा अर्थ लावावयाचा असतो हें लक्षांत ठेविलें पाहिजे. क्षत्रिय-वैश्यांच्या अभावाचीं वर्णनें तेवढीं प्रमाणें म्हणून पुढें करावयाचीं आणि ब्राह्मणांच्या अभावाचीं वर्णनें मागें दडवून ठेवावयाचीं यांत शहाणपणा नाहीं. "राजपुतान्यांत, उत्तर-हिंदुस्थानांत आणि आंध्र प्रांतांत जर क्षत्रिय आहेत आणि ते जर प्रत्यक्ष आहेत तर महाराष्ट्रांतीलच गेले कशावरून? महाराष्ट्रांतहि गागाभट्ट आणि समर्थ रामदासस्वामी यांनीं मान्यता दिलेलें भोसल्यांचें क्षत्रिय घराणें अद्याप जिवंत आहे" ब्राह्मणांच्या अदर्शनामुळें क्षत्रिय-वैश्यांच्या आचारांचा आणि क्रियांचा लोप झाला असेल तर तेवढ्याबद्दल प्रायश्चित्त दिलें म्हणजे झालें. महाराष्ट्रांत क्षत्रियांपेक्षां वैश्यच या कामीं जास्त अघाडी मारणार असा रंग दिसतो. अखिल भारतीय वैश्य कॉमटी परिषद व वैश्य-विद्याश्रम सासवनें या संस्थांची जी आम्हांस माहिती आहे तीवरून वैश्यवर्णाचें अस्तित्व दहापांच वर्षांत चांगलेंच भासमान होईल अशी खात्री वाटते. महाराष्ट्रीय क्षत्रिय वर्गास आम्हीं यापूर्वीच म्हणजे नागपूर येथील महाराष्ट्र धर्मपरिषदेनंतर एक अगत्याची सूचना केली होती, ती कांहीं वाचकांस स्मरत असेलच. सारांश, याप्रमाणें क्षत्रिय-वैश्यांचें प्रत्यक्ष अस्तित्व शास्त्रानें

सिद्ध झाल्यावर फक्त क्रियालोप आणि संस्कारलोप याबद्दल प्रायश्चित्ताचाच तेवढा विचार शिल्लक राहतो.

४ प्रायश्चित्ताचा विचार पुढच्या भागांत येणार आहे. म्हणून कलिकल्पनेच्या मुद्याचा विचार करून हा भाग संपवितों.

'प्राप्तं कलियुगं विद्धि' असें महाभारतांतील शल्यपर्वांत म्हटलें आहे. चार युगांपैकीं चौथें कलियुग आणि त्याचीं अमुक वर्षें झालीं वगैरे म्हणणें पुराणदृष्टीनें सरळ आहे. परंतु कलियुगाची कल्पना श्रुतिस्मृतिग्रंथांत सांगितलेली मान्य करावयाची किंवा नाहीं हाहि एक विचार करण्यासारखाच प्रश्न आहे. पुराणापेक्षां श्रुतिस्मृतींला प्रामाण्य अधिक आहे हें शास्त्रसिद्धच आहे. श्रुतीमध्यें ऐतरेयब्राह्मणांत कलियुगाची पुढीलप्रमाणें कल्पना आहे:—

कलिः शयानो भवति संजिहानस्तु द्वापरः ।
उत्तिष्ठंस्त्रेता भवति कृतं संपद्यते चरन् ॥

याचाच अनुवाद मनुस्मृतीमध्यें पुढीलप्रमाणें आहे:—

कृतं त्रेतायुगं चैव द्वापरं कलिरेव च ।
राज्ञो वृत्तानि सर्वाणि राजा हि युगमुच्यते ॥ ३०१ ॥
कलिः प्रसुप्तो भवति स जाग्रद्द्वापरं युगम् ।
कर्मस्वभ्युद्यतस्त्रेता विचरंस्तु कृतं युगम् ॥ ३०२ ॥

मनुस्मृतिकारांच्या कल्पनेप्रमाणें "राजा हि युगं" म्हणजे राजा हाच युग होय. आपल्या प्राचीन इतिहासांत राजसत्ताक शासनपद्धति होती. राजा हा कोणताहि कारभार करतांना अष्टप्रधान किंवा मंत्रिमंडळ यांचा सल्ला घेत असे. हल्लीं सर्व जगांत प्रजासत्तावादच आहे आणि यापुढें स्वयंनिर्णयाच्या तत्त्वाचा प्रसार होत आहे. एका व्यक्तीच्या हातांतील सत्ता जाऊन ती एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेनें पूर्ण भरलेल्या सर्व जनसमुदायांत हळुहळू संक्रांत होणार आहे. राजाचा राजेपणा प्रजेच्या हातांत जाणार आहे. म्हणून 'प्रजा हि युगमुच्यते' असें आतां लवकरच म्हणावें लागेल. राजा अज्ञानांधकारांत घोरत पडला असतां कलियुगास प्रारंभ होतो. तो जागा

झाला म्हणजे द्वापरयुग सुरू होतें असें जें म्हटलें आहे तेंच जनता अज्ञानांधकारांतून जागृत झाली म्हणजे द्वापरयुग सुरू झालें असेंहि म्हणतां येईल, अर्थातच जनताजनार्दन जागा झाल्यापासून कलियुगाचा लोप झाला. हल्लीं द्वापरयुगास प्रारंभ झाला आहे. कलियुगांत कदाचित् क्षत्रिय-वैश्यांचा अभाव सत्य मानला तरी द्वापरयुगांत क्षत्रियवैश्यांचें अस्तित्व हें शरदृतूंतील पौर्णिमेच्या चंद्राप्रमाणें आल्हादकारकच होणार आहे.

---

## भाग ४ था.

—(0)—

# इतिहास काय म्हणतो ?

---

क्षत्रिय-वैश्यांचें अस्तित्व शास्त्रसिद्ध आहे, हें आम्ही एवढ्या वेळ केलेल्या विवेचनावरून वाचकांच्या लक्षांत आलें असेल. पराशर स्मृतीचा प्रारंभ, देवल स्मृतींतील क्षत्रिय-वैश्यांचा उल्लेख आणि कल्किपुराण हे ग्रंथ पाहिले तर त्यांवरून क्षत्रिय-वैश्यांचा अभाव आहे असें म्हणतां येणार नाहीं. प्रतिपक्षाला बरें वाटावें म्हणून घटकाभर क्षत्रिय-वैश्यांचा अभाव संस्कृत ग्रंथांवरून कबूल केला तथापि इतिहासाला अगदींच गुंडाळून ठेवावयाचें कीं काय ? इतिहास हें प्रमाण अगदीं टाकाऊ आहे कीं काय ? कलियुगाला प्रारंभ भारतीय युद्धाच्या वेळीं झालेला होता; असे उल्लेख भारतामध्यें सांपडतात. भारतीय युद्ध खिस्त पूर्व ३१०१ इतकें प्राचीन मानलें तरी वराहमिहिरावरून खि० पू० २५२६ वर्षांपर्यंत यौधिष्ठिर घराणें राज्य करीत होतें असें दाखवितां येतें. भारतीय युद्ध रा. ज. स. करंदीकरांच्या मताप्रमाणें

अलीकडे ओढलें तरी सुद्धां कलियुगाला प्रारंभ झाल्यानंतर पुष्कळ दिवस क्षत्रिय वैश्य हयात होते हें ठरतेंच. बुद्ध धर्माच्या सर्वस्थापी क्रांतीनंतर शुंगघराण्यांतील पुष्यमित्र नांवाच्या राजानें अश्वमेध यज्ञ केला. महाभाष्यकार पतंजली या यज्ञास हजर होते, असा पुरावा सांपडतो. महाभाष्यकारांचा काल ख्रि. पू. १५० हा आहे. शुंग घराण्यानंतर गुप्त घराण्यांतील समुद्रगुप्तानें मोठा अश्वमेध यज्ञ केला. समुद्रगुप्त हा सम्राट् होता. त्याचीं नाणीं हल्लीं जीं उपलब्ध झालीं आहेत; त्यावर अग्निकुंड व अश्वमेधाचा घोडा यांचें चित्र आहे. समुद्रगुप्तानंतर हर्षवर्धन हाही मध्यकालांत मोठा सम्राट् होऊन गेला. हा मोठा सम्राट् विख्यात सत्याश्रय पुलकेशीचा समकालीन होता. उभयतांनींही अश्वमेध यज्ञ केला. हर्षवर्धनाचा अश्व पुलकेशीनें अडविला. उभयतांत तुंबळ युद्ध झालें आणि नर्मदेपालीकडे हर्ष व दक्षिणेस पुलकेशी अशी मर्यादा ठरली. शिवाय आंध्रभृत्य, राष्ट्रकूट, चालुक्य, शिलाहार वगैरे अनेक घराण्यांचीं अधिराज्यें महाराष्ट्रावर झालेलीं आहेत. या घराण्यांचा इतिहास झुगारून दिल्याशिवाय कोणच्याही विचारी मनुष्याला क्षत्रिय-वैश्य नाहींत असें म्हणतां येणार नाहीं. इस्लाम संस्कृतीशीं आपल्या छातीचा कोट करून लढणारे राजपुतान्यांतील वीर क्षत्रिय नव्हते असें जो म्हणेल त्याला मनुष्य कोटींतून बाहेर काढावें लागेल. मुसलमानांनीं रजपूत क्षत्रियांचीं घराणीं सोयरीकीनें बिघडविलीं तेव्हां ते कसले आले आहेत क्षत्रिय ? असें कोणी म्हणतील परंतु अकबरानें व त्या नंतरच्या बादशहांनीं हीं घराणीं बिघडविलीं असें धरून चाललें तरी अकबराच्या पूर्वीं म्हणजे अलीकडे अलिकडे कलियुगांत क्षत्रिय वैश्यांचा अभाव होता; असें सिद्ध होत नाहीं. मुसलमानांचा चांद सर्व हिंदुस्थानभर फडकण्यापूर्वी सर्व हिंदुस्थान देशांत लहानमोठीं बरींच राज्यें होती. त्या राजवटींतील सर्व राजे क्षत्रिय नसले तरी बरेचसे क्षत्रिय होते असें म्हणणें भाग आहे. महाराष्ट्रांत हिंदुपद पादशाहीकरितां श्री शिव भूपतींबरोबर ज्या अनेक मराठ्यांच्या घराण्यांनीं आपल्या आहुति समर कुंडांत दिल्या त्या घराण्यांना शूद्र म्हणणार कीं काय ? तात्पर्य, इतिहासाकडे कानाडोळा करून, परिस्थितीकडे दुर्लक्ष्य करून नुसतीं शास्त्रांतील वाक्यें तर्कशून्य पद्धतीनें सांगत बसण्याचा आणि क्षत्रिय-वैश्यांचें अस्तित्व नाहीं, असें म्हणण्याचा काल निघून गेला आहे इतिहाससूर्याचे जे प्रखर किरण आज अनेक संशोधकांच्या प्रयासानें भरत खंडावर पडत आहेत ते ज्याला सहन होत नसतील त्यांनें यापुढें

घूक–वृत्ति स्वीकारिली पाहिजे. हिंदुस्थानांत जो इतिहास भास्कराचा उदय झाला आहे तो अस्ताला जाण्याचा संभव नाहीं. याकरितां शास्त्री मंडळींनीं यापुढें कोणच्याही धार्मिक प्रश्नांचा विचार करतांना नुसतें वाक्य घेऊन भागणार नाहीं. कोणतेंही शास्त्रीय वाक्य कोणत्या परिस्थितींत उत्पन्न झालें, हें नीट पाहिलें पाहिजे व नंतरच वाक्यार्थ केला पाहिजे. नुसतें अमक्या ग्रंथांत अमकें आहे म्हणून लोकांनीं तसें वागावें असें म्हटल्यानें सांगणाराचा अजागळपणा तर दिसतोच, पण मुख्य ग्रंथकाराच्याही पदरांत बावळटपणाचा दोष येतो. इतिहास ही बाब शास्त्रार्थ निर्णयाला लक्ष्यांत घेण्यासारखी आहे. थोडी कल्पना यावी म्हणूनच येथें हा त्रोटक विचार केला आहे.

---

## भाग ५ वा

# प्रायश्चित्त विचार.

याप्रमाणें क्षत्रिय–वैश्यांचें अस्तित्व सिद्ध झाल्यावर त्यांच्या प्रायश्चित्ताचा विचार सहजच उपस्थित होतो. महाराष्ट्रामध्यें असलेल्या क्षत्रिय-वैश्यांना व्रात्य प्रायश्चित्त देऊन त्यांचे पुनः संस्कार करून त्यांना विहित क्रिया करण्यास लावणें अगत्याचें आहे. कित्येकांना महाराष्ट्रांतील क्षत्रिय-वैश्यांच्या कांहीं पिढ्या संस्कारलोप व क्रियालोप यांमध्यें गेल्या असल्यामुळें क्रियाभ्रष्ट व आचारभ्रष्ट अशा या लोकांना कसले संस्कार व कसला आचार शिकवावयाचा असें गूढ पडतें. "वृषलत्वं गता लोके ब्राह्मणादर्शनेन च" या मनुस्मृतीच्या श्लोकांत सांगितल्याप्रमाणें महाराष्ट्रांतले क्षत्रिय वृषलत्वाप्रत पोंचले आहेत म्हणजे शूद्रसम झाले आहेत हें खरें; परंतु ते खास शूद्र मात्र नाहींत. म्हणून उपायचिंतनाला अवसर आहे. जुन्या मताचे अडाणी ब्राह्मण आणि फाजील सुधारलेले सुशिक्षित ब्राह्मण यांच्या घरांतील

आचारविचाराकडे पाहिलें तर हे लोकसुद्धां शूद्रसमच आहेत असें म्हणावें लागेल. महाराष्ट्रांतला कांहीं भाग सोडला तर खानदेश, बागलाण, नगर वगैरे जिल्ह्यांतील आणि कृष्णाकांठ व गोदाकांठ सोडला तर इतर प्रांतांतील ब्राह्मणहि राहणीनें घाणेरडे असेच आढळतील. त्यांना पाहिलें म्हणजे भागवतांतील 'शूद्रप्रायेषु वर्णेषु' या वचनाची सत्यता पटते. निष्कर्ष इतकाच कीं, महाराष्ट्रांतील क्षत्रिय-वैश्यांचा आचार विचार निकृष्ट अशा ब्राह्मण वर्गाच्या आचारासारखाच आहे. येऊनजाऊन कांहीं रूढि व पाटासारख्या चाली यांमध्येंच थोडा फरक पडेल.

क्षत्रिय-वैश्यांचे आचारविचार मलिन असल्यामुळें ते शूद्रसम झालेले आहेत, म्हणून त्यांना संस्कार करण्याच्या वेळीं कांहीं विशिष्ट बंधनें त्यांच्यावर लादण्यांत यावीत असें कांहीं लोक म्हणतात. परंतु ब्राह्मण मुलाची मुंज लावण्याच्या वेळीं त्याच्या बापानें इतका गायत्री मंत्र जपला आहे काय, किंवा हा मुलगा वर्षभर तरी, विनचूक संध्या करील काय, हा विचार कोणीहि करीत नाहीं. ब्राह्मणांमध्यें गर्भाधान, उपनयन, विवाह वगैरे संस्कार होतात असें म्हणण्यापेक्षां संस्कारांचीं सोंगें होतात असे म्हणणेंच बरें. कारण गर्भाधानाचा संस्कार न होतांहि पुष्कळ ब्राह्मणाचे व्यवहार चाललेलेच असतात. संभोगकालीं रात्रीं नवऱ्यानें म्हणावयाचे मंत्र हे उपाध्याच दिवसाच स्वतः म्हणून टाकतो! उपनयन किंवा मुंज म्हणजे आज 'बांध मुंज' आणि उद्यां 'सोड मुंज' अशी मुंज सोडण्याची घाई होते! वेद-विद्येला आरंभ करण्याच्या पूर्वीचा उपनयन हा एक धार्मिक, पवित्र व गंभीर संस्कार आहे हें तत्त्व किती आईबापांच्या लक्षांत येत असेल ईश्वरच जाणे! उपनयन म्हणजे अशास्त्रीय अशा मातृभोजनाच्या अंगतीपंगतीचा थाट, भिक्षावळ म्हणजे भिक्षेच्या वेळची घोड्यावरून वाजतगाजत, दारू उडवीत मिरवणूक आणि लग्न म्हणजे एक प्रकारचा विहिणींचा उत्सवच, अशी सर्व ब्राह्मणांची समजूत झालेली आहे. लग्नांतील विड्या तोडणें, तेलफळ, रुखवत वगैरे सर्व गोष्टींना इतकें महत्त्व आलें आहे कीं, त्या बिचाऱ्या उपाध्यायाला आकाशांतील अरुंधतीचें दर्शन दिवसाच करविणें भाग पडतें. शिवाय उपाध्येबुवासहि ध्रुव, अरुंधती मुळींच माहीत नसतात. एवंच क्षत्रिय-वैश्यांप्रमाणें कलियुगांत अभावरूपानें नसलेला व शुद्ध परंपरेनें असलेला जो ब्राह्मणवर्ण किंवा जी ब्राह्मण जात तिच्यामध्यें सुद्धां संस्कारांची ही अशी रडकथा, मग इतरांना नांवें ठेवण्यांत काय अर्थ आहे!

२ वैदिक संस्कारांना आलेलें हें उत्सवाचें स्वरूप लक्षांत घेतलें असतां ब्राह्मण लोक स्वस्थानापासून कसे च्युत झालेले आहेत याची स्पष्ट कल्पना येते. 'जसा देव तसा नंदी,' 'जसा गुरु तसा शिष्य' याच न्यायानें इतरांच्या संस्कारांचीहि वाट लागणार आहे तेव्हां यापुढे संस्काराच्या वेळीं ब्राह्मणावर जर आचरणासंबंधीं कांहीं नियम लादावयाचे असले आणि ते त्यांना मान्य असले तरच क्षत्रिय-वैश्यांना असुक अमुक करा असें म्हणणें उचित होईल. आम्हास तर अशी खात्री वाटते कीं, उद्यां प्रसंग आला तर ब्राह्मणांपेक्षां क्षत्रिय-वैश्य हेच नियमबद्धतेला जास्त अनकूल होतील.

महाराष्ट्रांत क्षत्रियांपैकीं जर एक भोंसले-घराणें घेतलें तर त्या घराण्यास गागाभट्ट आणि श्रीरामदास यांनीं पूर्वीच मान्यता दिली आहे. अर्थात् भोंसले-कुळाशीं संबद्ध असणारीं उच्च मराठा कुळें यांना प्रथम व्रात्य प्रायश्चित्त देऊन त्यांचें उपनयन करावें आणि वेदाधिकार द्यावा हा वेदाधिकार देण्याच्या बाबतींत दोन मतें आहेत एका पक्षास असें वाटतें कीं, एकदम जे कोणी आपली परंपरा दाखवून क्षत्रिय म्हणवून घेण्यास तयार असतील त्यांचें सरसकट एकदम प्रायश्चित्तीकरण करून उपनयन करून टाकावें. दुसऱ्या पक्षास असें वाटतें कीं,हें असलें झटपट प्रायश्चित्त म्हणजे पैशावर येतें व पैसा म्हटला कीं, ब्राह्मणांची लबाडी दिसून येते, म्हणून दुसरीच कांहीं तरी तोड काढावी.

४ आम्हाला असें वाटतें कीं, वेदसंस्कार व धार्मिक आचार यांबद्दल हल्लीं उत्पन्न झालेला अनादर कांहीं चांगला नव्हे. समाजांत अश्रद्धधान माणसें असणें इष्ट नव्हे. श्रद्धा, सद्भावना आणि सुविचार हीं उत्पन्न होण्याला थोड्याबहुत तरी धार्मिक आचरणाची अत्यंत आवश्यकता आहे. 'पी हळद व हो गोरी' या म्हणीप्रमाणें एकदम 'हा घ्या वेदाधिकार, हे घ्या संस्कार,' असें म्हणणें कोणास योग्य वाटेल तर तें वाटो! परंतु वैदिक आचारभ्रष्ट क्षत्रियवैश्यांमध्यें जे अवैदिक असे आचारविचार रूढ झालेले आहेत ते नाहींसे होऊन त्यांच्याहि ठिकाणीं खरी वैदिक तेजस्विता व आत्मनिष्ठा ही उत्पन्न व्हावयास पाहिजे असल्यास तर आपस्तंब सूत्रांत सांगितल्याप्रमाणेच प्रायश्चित घेतलें पाहिजे.

अथ यस्य पिता पितामह इत्यनुपेतौ स्यातां ते ब्रह्महसंस्तुतास्तेषामभ्यागमनं भोजनं विवाहमिति वर्जयेत् । अतिक्रांते सावित्र्याः कालऋतुं त्रैविद्यक ब्रह्मचर्य

# १० सध्याच्या सामाजिक चळवळींचें स्वरूप

[ श्री श्रीपाद महादेव माटे, एम्. ए., पुणें ह्यांनीं ता. १२ एप्रिल १९२९ रोजीं मडगांव येथील सारस्वत ब्राह्मण समाजाच्या वार्षिक व्याख्यानमालेंत 'हिंदु समाजाचें नवें रूप' ह्या विषयावर व्याख्यान दिलें. त्या प्रसंगीं अध्यक्षस्थानावरून केलेलें प्रास्ताविक व समारोपात्मक भाषण पहिल्या छेदकांतील भाग प्रास्ताविक भाषणांतला असून इतर छेदकांतला समारोपात्मक भाषणांतील आहे.]

निरनिराळ्या सत्तांखालीं विभागलेला अखिल हिंदु समाज आज निकृष्टावस्थेस पोंचला आहे. त्याला अर्थातच कांहीं तरी कारणें असलीं पाहिजेत. आजचें त्याचें निकृष्ट रूप सुधारावयाचें झाल्यास उत्कृष्ट रूप कोणतें तें त्याला दाखविलें पाहिजे. हिंदु-संघटनेची चळवळ ही ह्या सुधारणेच्या दृष्टीनेंच अस्तित्वांत आलेली आहे. पण ती लोकप्रिय होत चालल्याचें पाहून तिच्यामध्यें अनेक उपटसुंभही शिरले आहेत. वास्तविक हें कार्य करणाऱ्यांना समाजशास्त्राचें आणि इतिहास व समाजसुधारकांचीं चरित्रें ह्यांचेंही ज्ञान असावें लागतें. केवळ समाजशास्त्र जाणणारा तात्विक सुधारणा सुचवील, पण त्याबरोबरच समाजसुधारकांच्या चरित्रांचें निरीक्षण केलेला मनुष्य त्यांच्या मार्गांतील अडचणींचाही विचार करून त्यांना व्यवहार्यता कशी द्यावी तें दाखवून देईल. श्री. माटे ह्यांनीं ह्या दृष्टीनें अभ्यास केला असल्याचें त्यांच्या लेखनावरून दिसून येतें. शिवाय महत्वाची गोष्ट म्हणजे हिंदु समाजाला नवें रूप देण्याच्या बाबतींत त्यांनीं प्रत्यक्ष कार्यही केलें आहे. तेव्हां प्रस्तुत विषयावर बोलण्यास ते अधिकारी आहेत. नवें म्हटल्यानें

बिचकण्याचें कारण नाहीं. नवें म्हणजे कोणीही आणि कधींही न पाहिलेलें असें नव्हे तर आजच्याहून आणि आमच्याहून भिन्न एवढाच त्याचा अर्थ असूं शकेल.

हिंदुस्थानांत आज अनेक 'सामाजिक' म्हटल्या जाणाऱ्या चळवळी चालू आहेत. ह्या चळवळींना सामाजिक स्वरूप मुळींच नाहीं असें अर्थातच म्हणतां यावयाचें नाहीं. परंतु त्यांच्यापैकीं पुष्कळ चळवळींचें सद्यःस्वरूप व त्यांच्यामुळें निर्माण होत असलेली परिस्थिति सूक्ष्मपणें अवलोकन केली तर त्यांचें स्वरूप वस्तुतः राजकीय किंवा त्याहीपेक्षां अधिक यथार्थतेनें सांगावयाचें झाल्यास आर्थिक आहे कीं काय, अशी शंका उद्भवूं लागते. अर्थाकरतां राजकारण आणि राजकारणाकरतां 'सामाजिक' हें रूप किंवा नांव त्या चळवळींच्या डोक्यावर लादलें आहे असेही उद्गार तोंडावाटे बाहेर पडूं पाहातात. एकंदर आर्थिक स्वरूपाच्या बनावांत एक मोठें तत्व दिसून येतें तें हें कीं, ह्या बनावांपासून होणाऱ्या फायद्याचा भाज्य सारखा वाढत जावा, तो फायदा ज्यांच्या पदरांत पडावयाचा त्या भाजकांची संख्या कमी होत जावी आणि ह्या दोन्ही मार्गांनीं भागाकार भूमितिश्रेढीनें वाढत जावा अशीच त्या बनावांची रचना आणि इच्छा असते. ही इच्छा आणि ती रचना हीं सर्वच बनावांच्या बाबतींत नेहमीं सिद्धीस जातात असें जरी नसलें तरी त्यांचें ध्येय तसें नसतें असें अनुमान मात्र काढतां यावयाचें नाहीं. हें तत्व आर्थिक बनावांच्या बाबतींत जितक्या उत्कटत्वानें दिसून येतें तितक्या उत्कटत्वानें तें इतर बनावांच्या बाबतींत दिसून येत नाहीं. शुद्ध

राजकीय स्वरूपाच्या बनावांचें ध्येय फायद्याच्या भाज्याकडे नसतें असें नव्हे; पण तो फायदा ज्यांना मिळावयाचा त्या भाजक व्यक्तींची संख्या घटत जावी असा मात्र त्या बनावांचा हेतु नसतो. उलट ही भाजकांची संख्याही वाढावी असाच त्यांचा प्रयत्न असतो. शुद्ध सामाजिक स्वरूपाच्या बनावांतही अशीच स्थिति दिसून येते. फायदा अधिकांत अधिक व तो घेणाऱ्यांची संख्या कमींत कमी हें तत्व एका आर्थिक स्वरूपाच्या चळवळींत मात्र अप्रतिहत वावरत असतें. अर्थात्, ह्या तत्वाचा व्यत्यास केला म्हणजे असें निष्पन्न होतें कीं, ज्या ज्या चळवळींत ह्या तत्वाचा अवलंब झालेला दिसतो ती ती चळवळ किंवा तो तो बनाव आर्थिक स्वरूपाचाच असला पाहिजे. मग त्या बनावांना कोणी 'राजकीय' हें नांव देवोत किंवा कोणी 'सामाजिक' असें म्हणोत.

आज राजकीय किंवा सामाजिक गणल्या जाणाऱ्या हिंदुस्थानांतील चळवळींचें वरील तत्वानुरोधानें निरीक्षण—परीक्षण केलें तर त्यांच्यापैकीं पुष्कळांचें यथार्थ रूप आर्थिक असून, पोटाकरतां राजकारण आणि राजकारण रंगण्याकरतां त्याला समाजकारणाचें रूप किंवा नांव हीच त्यांची प्रणालि आहे असें म्हणणें भाग पडतें. ब्राह्मणांच्या काय किंवा ब्राह्मणेतरांच्या काय, हरएक ज्ञातिविशिष्ट चळवळींत आणि पक्षांत जी फाटाफूट व नवनवी पोटपक्षनिर्मिती दिसते त्याचें कारण हेंच आहे. ठराविक पैशाचा वांटा अधिकांत अधिक मिळवावा हें कार्य साधावयाचें झालें तर, तो पैसा ज्या व्यक्तींनीं आपसांत विभागून घ्यावयाचा त्या व्यक्तींची संख्या किमान मर्यादेवर आणण्याची बुद्धि व्हावी

हें सहजप्राप्तच होय. सरकारच्या तिजोरींतील भाकरीचा जो फार मोठा वांटा ब्राह्मणांच्या पोटांत जातो तो हिसकावून घेण्याचा एक हेतु मनांत धरून ब्राह्मणेतर पक्ष जन्मास आला. सुरुवातीस ह्या पक्षांत अनेक ब्राह्मणेतर समाविष्ट झाले. पण पुढें कित्येकांस असें वाटूं लागलें कीं, ब्राह्मणेतर चळवळीपासून जो कांहीं फायदा उरतो त्यांतील मोठा वांटा मराठ्यांच्या पदरांत पडत असतो. तेव्हां, तो त्यांच्याच पदरांत न पडावा किंवा आपल्याही पदरांत पाडून घ्यावा हा हेतु धरून 'मराठेतर ब्राह्मणेतर पक्ष' उद्‌भूत होऊं लागला. ब्राह्मणांतही, चित्पावन–चित्पावनेतर, गौड–आद्य-गौड वगैरे पक्षोपपक्ष धुमाकूळ घालूं लागले. शिष्यवृत्त्या, दीन-साहाय्यक निधि वगैरेंचा फायदा स्वगणगोत्रांत पाडावयाच्या बुद्धीनें ज्ञातिदृष्टि किती ऱ्हस्व होत आली आहे ह्याचा अनुभव घेतलेला नाहीं असा चौकस सारस्वत ब्राह्मण क्वचितच आढळूं शकेल ! केवळ शैक्षणिक किंवा केवळ दीनदयात्मक बुद्धीनें निर्माण झालेल्या सामाजिक चळवळींची व संस्थांची जेथें अशी स्थिति, तेथें इतर नांवांच्या चळवळींची निराळी स्थिति नसली तर त्यांत आश्चर्य कसलें ? कौन्सिलांत दोन प्रतिनिधि अधिक मिळत नसतील किंवा सरकारी नोकऱ्यांत अमुक इतक्या जागांचें आश्वासन मिळत नसेल तर देश पारतंत्र्यांत पडला तरी चालेल अशी ज्या चळवळींची उघड वृत्ति, त्या चळवळी राजकीय म्हटल्या गेल्या काय किंवा त्यांना अन्य नांव दिलें काय, त्यांचें खरें नांव 'पोटाळ' चळवळी हेंच होय. तथापि, सुदैवानें हिंदु-स्थानांतील सर्वच सामाजिक चळवळी अशा पोटाळ नाहींत. तर

त्यांपैकीं कित्येकांचें ध्येय खरोखरच उच्च व व्यापक आहे. आणि त्या जरी ज्ञातिविशिष्ट नांवानें चाललेल्या आहेत तरी केवळ तसें करण्याशिवाय अन्य मार्ग नाहीं म्हणूनच होत. जातींचा विध्वंस करणें हेंच मुख्य ध्येय डोळ्यांपुढें धरून आस्तित्वांत आलेल्या किंवा अस्तित्वांत घातलेल्या संस्थेनें स्वतःचें जन्मनामच जातिवाचक ठेवावें हें काय गौडबंगाल असतें ह्याचा उलगडा मला करतांच येत नाहीं. पण बहुतेक संस्थांची गोष्ट जरी अशी कोड्यासारखी असली तरी कांहीं संस्थांना ज्ञातिवाचक नांव ध्यावेंच लागतें, हेंही मी जाणून आहें. संस्थेच्या जनकांच्या व खऱ्या नेत्यांच्या मनांत वर्गवाचक नांवाचा फारसा प्रेमा नसला तरी आजूबाजूची परिस्थितीच अशी असते कीं ज्ञातिविशिष्ट किंवा वर्गविशिष्ट नांव चळवळीशीं न जोडलें तर ती चालूच शकत नाहीं. अर्थात् अशा परिस्थितींतील चळवळीस ध्येयबाधक नांव देण्यांत आलें तर त्याचा दोप तें देणाऱ्यांवर न येतां एकंदर परिस्थितीवरच जाऊन पडतो हें उघड होय. स्पृश्यांनीं चालवलेली अस्पृश्योद्धाराची चळवळ, निरनिराळ्या जाती आपल्यांतील पोटभेद मोडण्याकरतां करीत असलेली खटपट, वेश्याव्यवसायप्रतिबंधाबद्दल निरनिराळ्या वर्गांकडून चाललेले प्रयत्न, मजुरादि वर्गांच्या राहणी वगैरेंत सुधारणा करण्याची चळवळ इत्यादि कांहीं चळवळींना शुद्ध सामाजिक स्वरूप असलें तरी 'सामाजिक' ह्या नांवाखालीं मोडणाऱ्या अनेक चळवळी वस्तुतः प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षतः राजकीय स्वरूपाच्या आहेत. त्यांचें राजकीय स्वरूप जरी अंशतः प्रसंगप्राप्त असलें तरी तें जाऊन त्यांना

शुद्ध सामाजिक स्वरूप येणें जरूर आहे. कारण आपली आजची राजकीय आकांक्षा जी स्वराज्य किंवा स्वातंत्र्यप्राप्ति ती पुरी झाल्यावरही आपणांस सामाजिक प्रगति करीत राहावें लागेलच. राजकारण हें कितीही महत्वाचें असलें, आणि स्वातंत्र्य हें नैतिक दृष्ट्या साध्यही असलें तरी स्वातंत्र्याचें भौतिक स्वरूप साधनात्मकच असतें आणि सामाजिक सुख, शांति व प्रगति हेंच त्याचें साध्य असतें. तेव्हां आज ना उद्यां सामाजिक चळवळी ह्या शुद्ध सामाजिक स्वरूपानें चालवल्या गेल्या पाहिजेत. श्री. माटे हेही ह्याच मताचे आहेत, हें त्यांच्या व्याख्यानावरून कळून येऊन मला आनंद होतो.

---

# ११. मराठा गायक वर्गास चार शब्द

[ता. २० व २१ मे १९२९ असे दोन दिवस श्रीस्थल कामाक्षा मु. शिरोडें–गोवा येथें प्रो. रामचंद्र नारायण वेलिंगकर, बी. ए. (ऑक्स.) ह्यांच्या अध्यक्षतेखालीं 'प्रागतिक मराठा सामाजिक परिषद' भरली होती. तींत पहिल्या दिवशीं झालेलें भाषण. ]

अध्यक्षमहाराज व सद्‌गृहस्थहो, सुदैवानें किंवा दुर्दैवानें मी पेटंट म्हणजे पाहिजे त्या वेळीं बोलूं शकणारा वक्ता नाहीं. तथापि, सभापति हा सभेचा सर्वार्थी प्रतिनिधि असल्यानें त्याच्या सूचनेस मान न देणें म्हणजे पर्यायानें सभेचा अवमान करण्यासारखेंच होय. आणि मला तर सभेचा अवमान करण्याची इच्छा मुळींच नाहीं. इतकेंच काय, पण प्रस्तुत परिषदेबद्दल मला

फार सहानुभूति वाटते. ही सहानुभूति नुसत्या हजर राहाण्यानें पाहिजे तितकी प्रगट होते असें मला वाटलें होतें; पण, आतां पाहावें तर अध्यक्षमहाराज सहानुभूति दाखविण्यासाठीं मला बोलण्याचा आग्रह करतात. तेव्हां, माझ्या न बोलण्याचा अर्थ सहानुभूतीचा अभाव होण्याचा संभव दिसतो व तो टाळण्यासाठींच म्हणून मी चार शब्द बोलूं इच्छितों. हे शब्द अर्थातच मुत्सद्दे-गिरीनें सांगण्यास मी शकणार नाहीं; कारण, तसें करण्याइतका अवसर मला मिळालेला नाहीं. तशांत मी ब्राह्मणेतर असतों तर जितकें चांगलें बोलूं शकलों असतों किंवा तें आपणांस जितक्या लवकर पटलें असतें, तितकें मी ब्राह्मण असल्यानें बोलूं शकणार नाहीं, आणि आपणांस तें झटपट पटणारही नाहीं. तेव्हां माझ्या भाषणांत आपणांस जर कांहीं न्यूनाधिक्य दिसून आलें तर माझ्यांत कळकळीचा किंवा सहानुभूतीचा अभाव आहे असें समजूं नका, तर तो माझ्यांतील मुत्सद्देगिरीचा अभाव माना.

आज हिंदु समाजांत सर्वत्र जागृतीचीं चिन्हें दिसून येत आहेत. समाजाच्या सर्व थरांत एक प्रकारची हालचाल होत आहे. हिंदु समाजांत आज जरी हजारों जाती दिसून येतात, तरी मुळांत त्यांत चार किंवा पांचच तेवढे भेद होते, आणि तेही टेबलाच्या खुराप्रमाणें समान दर्जाचे आधारस्तंभ मानले जात होते. त्यांत उच्चनीच असा भेद नव्हता. हा भेदभाव ज्या वेळीं हिंदु समाजांत उत्पन्न झाला, तेव्हांच त्याच्या अधोगतीचा पाया भरला गेला अशी माझी अल्प समजूत आहे. हा भेदभाव आतां जबाबदार माणसांनीं मानूं नये व व्यक्तही करूं नये असें मला वाटतें. व

म्हणून 'समाजाच्या खालपासून वरपर्यंतच्या थरांत' असा शब्द-प्रयोग न योजतां मी 'समाजाच्या सर्व थरांत' असा शब्दप्रयोग सहेतुक योजला आहे.

ही जी हालचाल आज दिसत आहे, ती अर्थातच त्या त्या वर्गातील बुद्धिप्रधान लोकांनीं उत्पन्न केली आहे. पण कोण-त्याही हालचालीचा किंवा चळवळीचा इष्ट परिणाम पदरांत पडावयाचा झाला तर ती चळवळ सर्वच वर्गानें उचलणें अपरि-हार्य आहे. कोणत्याही समाजांत बुद्धिप्रधान लोक हे नेहमींच अल्पसंख्य. आणि चळवळीचें खरें क्षेत्र व कार्य हीं तर बहुजन-समाजांतच असावयाचीं. ह्यासाठीं बुद्धिप्रधान वर्गाला अप्रबुद्ध मानल्या जाणाऱ्या बहुजनवर्गाचें पाठबळ व सहकार्य मिळालें तरच चळवळ फलद्रूप होत असते. दुसऱ्या शब्दांनीं सांगावयाचें म्हणजे पुढारी व अनुयायी ह्यांचें जेव्हां सख्य व सहकार्य जुळून यावें, तेव्हांच बुद्धिप्रधान वर्गाच्या आकांक्षा मूर्त स्वरूपांत उतर-णें शक्य असतें.

पण कोणतीही चळवळ निघाली म्हणजे तिच्या उत्पत्ती-बरोबरच पुढारी व अनुयायी ह्यांच्यामध्यें आणखी एक वर्ग जन्मास येत असतो. ह्या वर्गातील लोकांना आपण 'मधले लुड-बुडे' म्हणूं. हे धड पुढारीही नसतात आणि धड अनुयायीही नसतात. हे मधले लोक पुढाऱ्यांची ऐट आणतात व त्यांच्याइतक्या मानमरातबाची हाव धरतात. पण त्यांच्यांत पुढाऱ्यांची लायकी नसते आणि अनुयायांचीही लायकी नसते. उत्तम अनुयायी होण्यासही लायकी लागते.आणि लायक अनुयायी हेच पुढाऱ्यांपेक्षां

चळवळींचे अधिक पोषक झाले असल्याचीं उदाहरणें दाखवितां येण्यासारखीं आहेत. पुढारीपणाचा आव आणतांना हा मधल्या तरुणांचा वर्ग आपली बुद्धिमत्ता, आपली विवेचन-शक्ति, आपलें श्रवण—अवलोकन, आपला अनुभव व आपण आजवर काय कार्य केलें ह्याचा विचार बहुधा करीत नसतो आणि त्यामुळें तो स्वतःविषयीं फारच मोठी कल्पना करून घेत असतो. प्रतिपक्षीयांप्रमाणेंच स्वपक्षीयांनाही टोंचून बोलण्यास त्याला मुळींच दिक्कत वाटत नाहीं. आपल्या वैयक्तिक माना-पमानाच्या आणि हेव्यादाव्याच्या गोष्टींस बळी पडून स्वीकृत आणि ईप्सित कार्याचा नाश झालेला पाहाण्यासही ह्या लोकांस वाईट वाटत नसतें. ह्यामुळें ते आपल्या स्वतःच्या पायांवर धोंडा पाडून घेऊन खाजगी जीवन तर बिकट करून टाकतातच; पण त्यांच्यापासून होणारें खरें नुकसान म्हणजे, त्या चळवळींत पड-णाऱ्या खरोखरी चांगल्या, शुद्ध वर्तनी, बुद्धिमान् आणि सभ्य पुढाऱ्यांविषयींही दूरस्थांच्या मनांत दुर्ग्रह उत्पन्न होतात, व त्या-मुळें चळवळ सपशेल फसण्याचीही भीति उत्पन्न होते, हें होय.

आजचे अध्यक्ष श्री. प्रो. वेलिंगकर व स्वागताध्यक्ष श्री. रायकर, त्याचप्रमाणें श्री. शिरोडकर बंधु वगैरेंशीं माझा फारसा परिचय नाहीं. पण ह्या सर्वांशीं गेल्या आक्टोबरांत मी मुंबईस गेल्यावेळीं जी ओळख झाली व विशेषतः प्रो. वेलिंगकर ह्यांचें जें अत्युत्कृष्ट व दूरदर्शी भाषण आज ऐकलें, त्यावरून योग्य माणसांच्या हातींच गोमंतक मराठा वर्गाची चळवळ जात आहे असें मला वाटलें, व त्याबद्दल फार संतोष झाला. त्यांना माझी

अशी विनंति आहे कीं, ह्या आपल्या चळवळींत मी मागें वर्णन केलेले मधले पुढारी उत्पन्न होऊं देऊं नयेत; आणि झाले असल्यास त्यांना बाजूस सारण्याचे प्रयत्न करावे. समाजाचें नियंत्रण आणि मार्गदर्शित्व करण्याचा अधिकार ज्याप्रमाणें भगवीं वस्त्रें धारण केल्यामुळें प्राप्त होत नाहीं, त्याचप्रमाणें चारदोन लेख आणि व्याख्यानें वडवितां आल्यानेंही प्राप्त होत नाहीं. जानवें घातल्यानें तो प्राप्त होतो ही समजूत जशी खोटी तशीच जानव्याची उठल्याबसल्या अवहेलना केल्यानें तो लाभतो हीही गोष्ट खोटी. त्याकरितां समाजशास्त्राचें तात्विक अध्ययन व व्यावहारिक निरीक्षण केलें पाहिजे. विमानें हवेंत तरंगतात हें खरें. पण हवेवरही पृथ्वीचें गुरुत्वाकर्षण असतें, ही गोष्ट विसरून चालणार नाहीं. गुरुत्वाकर्षणाचे नियम लक्षांत न घेतां केलेलें विमान जसें जमिनीवरच राहील, वर उडूं शकणार नाहीं, तसेंच एका समाजाचें दुसऱ्या समाजावर, एका मताचें दुसऱ्या मतावर, इतकेंच काय पण एका व्यक्तीचें दुसऱ्या व्यक्तीवरही नैतिक, आर्थिक आणि कायदेशीरही आकर्षण असतें, हें लक्षांत न आणतां एकादा समाज—उदाहरणार्थ ब्राह्मण समाजच घेऊं—आपण आपली प्रगति इतरांस दूर ठेवून करूं म्हणेल तर तें अशक्य, निदान महत्प्रयासाचें तरी खास होईल. ह्यासाठीं एका समाजानें दुसऱ्या समाजाचें प्रेम, सहानुभूति, मदत, किमानपक्षीं अविरोध, जें काय मिळवितां येईल तें मिळविलें पाहिजे. ह्यासंबंधींची जी वाटाघाट परस्परांमध्यें व्हावयाची ती कोणाकडूनही न होतां, सुबुद्ध, जबाबदार, सदिच्छ आणि विशेषतः सुमुख अशा पुढाऱ्या—पुढाऱ्यांत झाली

पाहिजे. गोमंतक मराठा समाजाची गोष्ट घेतली तर, त्यानें देव-स्थान मंडळांकडे जाऊन त्यांची ह्या कामीं काय मदत मिळ-ण्यासारखी आहे तें पाहिलें पाहिजे, व ह्या मंडळांनीं त्याला शक्य ती मदत देण्याचें बिनचुकारपणें मनावर घेतलें पाहिजे.

गोमंतक मराठा समाजाच्या अंतर्भागास उद्देशून मला कांहींच सांगतां येणार नाहीं; कारण, ह्या समाजाशीं माझें दळणवळण फारच थोडें आहे. ही गोष्ट मला दिलगिरीची वाटत असली तरी ती सत्य आहे. जो समाज आज एवढी मोठी सभा इतक्या सुव्यवस्थितपणें भरवूं शकतो, त्या समाजासंबंधींचें अ-ज्ञान माझ्यासारख्या वृत्तपत्रकाराच्या पेशाच्या माणसाला वैगुण्या-त्मकच मानावें लागेल. तथापि, ह्या वर्गाची प्रत्यक्ष माहिती जरी असावी तितकी मला नसली, तरी तात्विक दृष्ट्या सर्वांनाच लागू पडणारी एक गोष्ट येथें सांगावयास हरकत नाही. ती अशी कीं, समाजाची सुधारणा व कायदा ह्यांचा संबंध भाषा व व्याकरण ह्यांच्या संबंधासारखा असतो. ज्याप्रमाणें आधीं भाषा उत्पन्न होते व मग तिला नियंत्रण आणि स्थैर्य देणारें व्याकरण तयार केलें जातें, त्याचप्रमाणें समाजांतील अनिष्ट चाली हांकलून लावून, इष्ट चाली स्वीकारण्यासाठीं समाजाचें मन तयार कर-ण्याचें काम समाजनेत्यांनीं आधीं केलें पाहिजे. व पालटून इष्ट बनलेली परिस्थिति रूढीच्या रूपानें कृतींत उतरविण्यासाठीं कायदा करून घेतला पाहिजे. समाजाचें मन न बदलतां केवळ कायद्याच्या जोरावर त्याच्यावर एकादी रूढि लादली तर कायद्याला कशी बगल द्यावी व शिक्षा कशी टाळावी ह्याचा विचार तो करूं

लागतो. आणि अनिष्ट चाल मोडण्याचें बाजूस पडून, कायद्यापासून पळवाट काढण्याची अनीति समाजांत बोकाळूं लागते. असो.

शेवटीं, एकंदर हिंदु समाजास मला असें निक्षून सांगावयाचें आहे कीं, गोमंतक मराठा समाजाच्या सुधारणेचा प्रश्न हा केवळ त्या वर्गाचा नसून, त्यांत आम्हां सर्वांचाच स्वार्थ आहे. हिंदु समाजानें हा वर्ग आपला नाहीं, त्याच्याशीं आपला संबंध नाहीं, असें आंतल्या आंत पाहिजे तर वेडेपणानें खुशाल समजावें. पण ज्या वेळीं एकादा परकी माणूस आमच्या समाजाचा विचार करतो, त्या वेळीं गोमंतक मराठा वर्ग हा हिंदूतलाच आहे हें तो यथार्थ जाणतो आणि नेमकें त्याच्याकडे बोट दाखवून आमची सामाजिक हीनता स्पष्ट करतो, हें सर्वश्रेष्ठ म्हणविणाऱ्या वर्गानेंही अवश्य लक्षांत घेतलें पाहिजे. मांजरानें डोळे झांकले म्हणून इतरांना थोडेंच दिसल्याशिवाय राहणार आहे! मग कोणाची समजूत कशीही असो. शरिराच्या एकाद्या अवयवास गळूं झालें तरी त्याची बाधा सर्वच शरिरास होत असते, हें विसरूं म्हटलें तरी विसरतां येणारें नव्हे. तेव्हां गोमंतक मराठा समाजाच्या अवयवाकरितां नसलें तरी एकंदर हिंदु शरिराच्या सौख्याकरितां आणि मजबुतीकरितां तरी हा अवयव सुधारलाच पाहिजे.

सद्गृहस्थहो! माझ्या बोलण्यांत एकादा कठोर व वाजवीपेक्षां फाजील असंदिग्ध शब्दप्रयोग होऊन गेला असेल—बाकी तो तसा होऊं नये ह्याबद्दल मी यावच्छक्य खबरदारी घेतली आहे—तर मला क्षमा करा. सत्य हें पुष्कळ वेळीं कठोर असतें, पण तें समाजाच्या हितासाठीं स्पष्ट सांगणाराच त्याचा खरा मित्र असतो.

# १२. गोमंतकांतील मराठीची स्थिति

[ सन १९२९ सालच्या मे महिन्याच्या २६, २७ व २८ ह्या तारखांस बेळगांव येथें महाराष्ट्र-साहित्य-संमेलनाचें १४ वें अधिवेशन प्रो. शिवराम महादेव परांजपे ह्यांच्या अध्यक्षतेखालीं पार पडलें. त्यांत दुसऱ्या दिवशीं श्री. न. चिं. केळकर ह्यांनीं गोव्यांतील मराठी भाषेच्या वाढीस साह्य करण्यासंबंधीं पोर्तुगीज सरकारास विनंति करणारा ठराव मांडला. ह्या ठरावास अनुमोदन देतांना केलेलें भाषण.]

विश्वविद्यालयाच्या परीक्षा घेतांना परीक्षक थोडे व विद्यार्थी पुष्कळ अशी स्थिति असते. पण श्री. तात्यासाहेब केळकर ांनीं येथें माझ्या बाबतीत उलट स्थिति निर्माण केली आहे. आज हजर असलेले दोनअडीच हजार साहित्यसेवक परीक्षकांच्या जागीं असून विद्यार्थ्यांच्या जागीं मी एकटाच आहें. तेव्हां गुरु विद्यार्थ्यांकडे ज्या दृष्टीनें पाहतात त्याच दृष्टीनें आपण मजकडे पाहाल अशी मला आशा आहे. गोमंतकांतील मराठीसंबंधीं श्री. तात्यासाहेब केळकर ह्यांनीं जो ठराव आपल्यापुढें मांडला आहे त्याचें महत्व नीट ध्यानांत येण्यासाठीं गोव्याच्या परिस्थितीचें थोडें Explicação देणें जरूर आहे. साहित्य-संमेलन आणि साहित्य-परिषद ह्यांचा संबंध अत्यंत निकट असतां संमेलनांत प्रतिनिधि म्हणून भाग घेणाऱ्यांनाही साहित्य-परिषद म्हणजे काय आहे त्याचा खुलासा मागण्याची आणि देण्याची जर गरज भासते तर संमेलनाशीं त्या मानानें दूरचा संबंध असलेल्या गोमंतकांतील मराठीच्या स्थितीसंबंधींच्या Explicação ची जरुरी अधिकच भासावी ह्यांत नवल नाहीं. येथें जमलेल्यांत महाराष्ट्राच्या

एका विशिष्ट भागाचे तेवढे प्रतिनिधि नाहींत; तर बृहन्महाराष्ट्रांतील एकमेकांपासून दूर दूर असणाऱ्या भागांतील प्रतिनिधि आहेत हें माझ्या पूर्ण लक्षांत आहे. आणि म्हणूनच ज्यांचा अर्थ केवळ पोर्तुगीज भाषेची ओळख असणाऱ्यांस कळण्या-सारखा आहे असे शब्द माझ्या भाषणांत येऊं देऊं नयेत अशी खबरदारी घेण्याचा बेत मीं केला होता. परंतु त्या बेताचा बांध फोडून Explicação हा पोर्तुगीज शब्द येऊन गेला ह्याबद्दल आपण मला क्षमा करावी. पोर्तुगीज भाषा न जाणणाऱ्या माझ्या महाराष्ट्रीय श्रोतृबंधूंस घोटाळ्यांत पाडावें किंवा माझ्या पोर्तुगीज भाषेच्या ज्ञानाचें प्रदर्शन करावें असा, हा शब्द वापरण्यांत, माझा हेतु आहे असें कोणी समजणार नाहीं अशी मला आशा—आशा कशाला ? खात्री आहे. कारण, मराठी भाषेचा शिरकाव विश्व-विद्यालयीन शिक्षणांत व्हावा असा ठराव करीत असतां महाराष्ट्र साहित्यांतील आचार्य मानले जाणारे लोकही 'सूचक', 'अनुमो-दक' ह्यांच्याऐवजीं 'प्रपोझर', 'सेकंडर' हे शब्द उपयोजीत अस-लेले आपण पाहातों. हे लोक आपल्या इंग्रजी न जाणणाऱ्या बांधवांना घोटाळ्यांत पाडूं इच्छितात किंवा स्वतःच्या इंग्रजी भाषाज्ञानाचें प्रदर्शन करूं पाहातात असें कसें म्हणतां येईल ? [ह्या शब्दाचा अर्थ काय, असा श्रोत्यांकडून प्रश्न.] Explicação ह्याचा अर्थ Explanation ! असो.

गोमंतकांत हिंदु व ख्रिस्ती असे दोन प्रमुख समाज आहेत. ख्रिस्ती समाजानें आपला मूळ हिंदु धर्म सोडला हें तर उघडच आहे. पण आपली भाषा, वेष, खाद्य, पेय हींही सोडून

तो पुरेपूर पोर्तुगीज बनला आहे. पोर्तुगीज हीच आपली मातृभाषा, पोर्तुगिजांचे राष्ट्रवीर तेच आपले राष्ट्रवीर, इतकेंच काय पण पोर्तुगाल हाच आपला मातृदेश असें हा समाज समजतो. आणि ह्याहीपेक्षां विलक्षण गोष्ट अशी कीं, गोव्याचा उल्लेख करतांना, पोर्तुगीज लोक ज्याप्रमाणें 'आमची वसाहत' म्हणतात त्याचप्रमाणें गोव्यांतील खिस्ती समाजही म्हणत असतो. आपल्या मातृभूमीला आपल्या जेते लोकांची वसाहत म्हणून अभिमानानें संबोधण्यांत कांहीं वावगें आहे, असेंही ह्या समाजाला वाटत नाहीं! अर्थात् अशा समजुतीच्या समाजाकडून मराठी भाषेला साह्य किंवा प्रोत्साहन मिळण्याऐवजीं विरोध व उपहास होत असला तर त्यांत निराळें नवल कांहींच नाहीं. मराठी भाषेचा प्रतिरोधक असा हा गोव्यांतील खिश्चन समाज संपत्तीनें, अधिकारानें आणि शरीरसामर्थ्यानेंही हिंदु समाजापेक्षां बलवत्तर आहे. संख्येनें दोन्ही समाज तुल्यबल असले तरी केवळ संख्याबल हें समाजाचें वैभव वाढवण्यास जसें समर्थ नसतें तसेंच भाषेचें वैभव वाढवण्यासही समर्थ नसतें हें उघड आहे. परंतु, अशी सर्वस्वी प्रतिकूल परिस्थिति असतां गोमंतकांतील हिंदु समाजानें मराठी भाषेची जोपासना, वृद्धि आणि महति टिकविली आहे ही गोष्ट महाराष्ट्रास अभिमानास्पद नाहीं काय? पोर्तुगीज भाषा न येणाऱ्या वधूवरांना स्वतःचे विवाहही लावून घेतां येणार नाहींत असा कायदा गोव्यांत मागें एकदां अंमलांत होता आणि सैतानाचीं वचनें दडून बसलीं असतील ह्या शंकेनें शेंकडों देशी भाषांतील ग्रंथ अग्निनारायणार्पण करण्यांत येत होते. अशा अति

बिकट परिस्थितींत ज्या आपल्या पूर्वजांनीं मातृभाषेची जोपासना केली त्यांच्या ऋणांतून उतराई होण्याचा कांहींतरी प्रयत्न गोमंतकीयांप्रमाणें इतर महाराष्ट्रीयांनींही करणें त्यांचें कर्तव्य नाहीं काय, असा बृहन्महाराष्ट्रास माझा प्रश्न आहे. गोमंतकीय लोकांच्या कर्तबगारीची टिमकी आपल्यापुढें वाजवावी ह्या बुद्धीनें मी हा प्रश्न करीत नाहीं, तर मराठी भाषेच्या अभिमानामुळेंच करतों. मी गोमंतकीय नसतों तर हा प्रश्न ह्याहीपेक्षां अधिक नेटानें मी आपणांसमोर टाकला असता. गोव्यांतील ख्रिश्चनांनीं आपली भाषा, वाङ्मय, विभूति, मायभूमि इत्यादि सर्व कांहीं पोर्तुगिजांना विकलीं म्हणून त्यांना आम्ही हसतों. "तुम्हीं पोर्तुगालसाठीं सर्वस्व गमावले, पण स्वत: पोर्तुगीज लोक तुम्हांला आपले असें कोठें म्हणतात ? उलट तुम्हांस पोर्तुगिजीचा उच्चारही धड करतां येत नाहीं असें म्हणून ते तुम्हांस हिणवितात कीं नाहीं ?" असें आम्ही आमच्या ख्रिश्चन बंधूना उपहासपूर्वक विचारतों. पण मला येथें महत्वानें सांगावयाचें आहे तें हें कीं, गोव्यांतील ख्रिश्चन लोकही आम्हां तेथील हिंदूस उलट असें विचारतात कीं, "तुम्ही मराठी भाषेचा एवढा अभिमान बाळगतां आणि महाराष्ट्रीयांचा एवढा उदोउदो करतां; पण ते तुम्हांला कोठें पुसतात?" ह्या त्यांच्या प्रश्नाला काय उत्तर द्यावें तें तुम्ही सांगा. ख्रिश्चन लोक जो प्रश्न आम्हांस करतात तो अगदींच निरर्थक नव्हे हें मला मोठ्या कष्टानें येथें सांगावें लागतें. मला अशीं कित्येक उदाहरणें माहीत आहेत कीं, महाराष्ट्रीय वृत्तपत्रकारांनीं गोमंतकीय लोकांकडून लेख मागवावेत

व त्यांनीं ते पाठविल्यावर वाचूनही न पाहतां कव्हरावरील नुसतें तिकीट पाहून फेकून द्यावेत ! गोमंतक प्रांत निराळ्या राज्यसत्ते-खालीं असल्यानें तेथील पोस्टाचें तिकीटही इंग्रजी तिकिटाहून निराळें असतें. ह्यामुळें पत्र कोठून आलें तें चट्‌दिशीं लक्षांत येऊन महाराष्ट्रीय नियतकालिककारांचे आंतील मजकूर वाचून पाहण्याचेही श्रम वांचतात! कालच्या विषयनियामक मंडळाच्या बैठकींत ग्रंथकारांची नोंद ठेवण्यासंबंधींचा ठराव आला असतां मला असा प्रश्न करण्याची इच्छा झाली होती कीं, ' ग्रंथकार कोणाला म्हणावें ? ' कायद्यानें प्रत्येक गुन्ह्याला शिक्षा सांगितली आहे. पण सर्वच गुन्ह्यांना शिक्षा होते काय? नाहीं. तर जे गुन्हे उघडकीस येतात तेवढ्यांनाच शिक्षा होते असा सर्वांचा अनुभव नाहीं काय ? हीच स्थिति आज मराठी ग्रंथकारांची आणि लेखकांची आहे. ज्याचें नांव झालें तो चांगला ग्रंथकार किंवा लेखक ! अशी स्थिति असल्यामुळें गोव्यांतील कित्येक चांगले लेखकही महा-राष्ट्रास आज शून्यवत् होऊन बसले आहेत. ' आपुली आपण करी स्तुति तो एक मूर्ख ' हें श्रीसमर्थांचें वचन माझ्या पूर्ण लक्षांत आहे. पण ' आपुली आपण न करी जाहिरात तो एक मूर्ख ' असें युग सध्या चालत आहे हेंही विसरून चालावयाचें नाहीं. महाराष्ट्र वाङ्मयाला ही स्थिति भूषणास्पद होईल काय ? गोमन्तकाचे ऋणानुबंधी व माझे पूज्यवर मित्र श्री. तात्यासाहेब केळकर ह्यांनीं गोव्यासंबंधींचा ठराव मांडण्यांत काय रहस्य आहे हें विशद करून सांगण्याचें आतां निराळें कारण राहिलेलें

नाहीं. आम्ही आतां आमच्या ख्रिश्चन बंधूंना उजळ मुखानें सांगूं कीं, महाराष्ट्र–साहित्य–संमेलनांत तात्यासाहेबांसारखे वाङ्मय-मुकुटमणि गोमंतकीयांच्या मराठीबद्दलच्या कर्तबगारीची जाणीव इतरांना करून देत आहेत.

ठरावाचे शब्द तात्यासाहेबांनीं पसंत केले आहेत ह्यावरून ते कसे धारवाटी कांट्यानें तोळूनमापून ठेवण्यांत आले असतील तें कळून येतें. त्याच्या सामान्य धोरणासंबंधीं प्रथमतःच सांगावयाची गोष्ट अशी कीं, ह्या ठरावानें आपण परराष्ट्रीय राजकारणांत हात शिरकावतों असें कोणीं समजूं नये. विश्वविद्यालयानें उच्च शिक्षणाचें पुच्छ चिकटाविल्याशिवाय कोणींही नियतकालिककार होऊं नये असा निर्बंध पोर्तुगाल सरकारनें आमच्यावर लादला आहे! पण हा निर्बंध सर्व भाषांना सामान्य असल्यामुळें त्याच्याविरुद्ध तक्रार ह्या ठरावांत केलेली नाहीं. सर्व भाषांना सामान्य असे जे निर्बंध आहेत त्यांना राजकीय स्वरूप असल्यानें तें भांडण भांडण्याचें काम आम्हीं आपसांत करण्यासाठीं ठेवलें आहे. आणि मराठी नियतकालिकांना गव्हर्नरची खास परवानगी ध्यावी लागावी असा जो विशेष निर्बंध आहे त्याचें स्वरूप वाङ्मयात्मक असल्यानें तेवढ्यापुरतीच तक्रार–व तीही विनंतिरूपानें–संमेलनानें करावयाची आहे. कोणी विचारील, केवळ मराठीवर विशेष निर्बंध कोठें लादण्यांत आला आहे? त्याला उत्तर हें कीं, चौघांना एकदम मारलें म्हणून मार खाल्लेल्या एकेकट्यानें प्रतिकार करूं नये असें म्हणणें हास्यास्पद होय. पण वस्तुस्थिति अशी आहे कीं, हा विशेष

निर्बंध पोर्तुगजितर सर्व भाषांसाठीं म्हणून करण्यांत आला असला तरी तो मराठीच्याच गळ्यांत नेमका आणि आधीं पडला. एकादा असें म्हणेल कीं, राज्यकर्त्यांना पोर्तुगिजीखेरीज इतर भाषा येत नाहींत म्हणून त्यांनीं त्यांच्यावर असा निर्बंध ठेवला आहे. पण लक्षांत घ्या कीं, कांहीं मराठी वृत्तपत्रांना सरकारनें परवानगी दिली आहे आणि ती देतांना किंवा दिल्यावर राज्यकर्त्यांना पोर्तुगजितर भाषा एकाएकीं समजूं लागल्या असें एकही उदाहरण नाहीं! शेवटीं, कोणी असा प्रश्न करील—करील कशाला, एकानें तो केलाही—कीं, तुमचें राज्य परक्यांवर असतें तर तुम्हीं असा निर्बंध त्यांच्या भाषेवर लादला नसता काय? ह्याला माझ्यापुरतें उत्तर 'नाहीं' असें आहे. पण आम्हीं तो लादला असता असें गृहीत धरलें तर असेंही गृहीत धरावेंच लागतें कीं, आम्ही आज जशी तक्रार करतों तशीच त्यांनींही त्या वेळीं केली असती! पोर्तुगीज व तदितर भाषा ह्यांच्यावरील निर्बंध समान असते, पोर्तुगिजीप्रमाणेंच इतर भाषांतूनही प्राथमिक शिक्षण देण्याची सरकारनें सारखीच सोय केली असती, पोर्तुगिजीप्रमाणेंच इतर भाषांतील साक्षरांनाही मताधिकार दिला असता, तर ठरावांतील 'अपमानास्पद' हा शब्द काढून टाका असें मींच म्हटलें असतें. पण आमचे राज्यकर्ते आम्हांस मनुष्य ह्या नात्याचे हक्क देण्यांत जितकें औदार्य दाखवतात त्यापेक्षांही अधिक कंजूषपणा आम्हीं विशिष्ट राष्ट्राचे घटक ह्या नात्यानें भाषादिकांचे जे विशिष्ट हक्क आम्हांस न्यायतःच असतात ते कबूल करण्यांत दाखवीत असतात व म्हणूनच

'अपमानास्पद' हा शब्द ठरावांत महत्वाचा आहे. श्री. तात्यासाहेब केळकरांसारख्या महाराष्ट्रीय पुढाऱ्यानें हा ठराव मांडण्यांत औचित्य हें कीं, हा अपमान केवळ गोमंतकीयांना तेवढा जाणवतो असें नसून तो मराठी भाषेच्या सर्व अभिमान्यांसही ममत्वबुद्धीमुळें जाणवतो. तेव्हां ठराव आपण सर्व एकमतानें पास कराल अशी माझी खात्री आहे.

[ नंतर अध्यक्षांच्या सूचनेवरून त्यांनी खालीलप्रमाणें कोंकणीतून चार शब्द बोलून दाखवले.]

कानडी–मराठी वाद हा भाषांमध्यें नाहीं ही गोष्ट समाधानाची होय. कोंकणी ही भाषा मराठीहून भिन्न आहे कीं नाहीं ह्या वादांत मी पडूं इच्छीत नाहीं आणि पडण्याची माझी लायकीही नाहीं. पण भाषाशास्त्रानें कोंकणी ही आदिभाषा असा निर्णय दिला तरी तिचा अंगिकार करणें कितपत हितावह होईल हाच माझ्या दृष्टीनें महत्वाचा मुद्दा आहे. मराठींत प्रचारांत नसलेले असे अनेक शब्द कोंकणींत आढळून येतात व प्रचारांत असलेल्या शब्दांऐवजीं उपयोगांत आणले तर मराठी शब्दांपेक्षां अधिक अर्थव्यंजक ठरतील असे शब्द, म्हणी आणि वाक्प्रचारही कोंकणींत भरपूर सांपडतात ही गोष्ट नाकबूल करतां यावयाची नाहीं. उदाहरणार्थ **बाळंतभेट** ह्या शब्दाऐवजीं **पट्ठाळा** हा शब्द कितीतरी अधिक अर्थवाहक आणि पारिभाषिक स्वरूपाचा आहे. मात्र हे कोंकणी शब्द जे मराठींत घ्यावयाचे ते पुणेरी लेखकांनीं आधीं घेतले पाहिजेत. कारण पुणेकर हे मराठीचा 'स्टॅंडर्ड' बनविणारे आहेत अशी समजूत आहे. 'उच्चारानुसारी

लेखन ' ह्या तत्वानुसार मराठींतील अनुस्वारांचें उच्चाटन करावें असें एक मत आज प्रचलित आहे. आणि ह्या बाबतींत ज्या उच्चारांचें अनुसरण करावयाचें ते उच्चार पुणेंकरांचेच होत हें उघड आहे. अर्थात् मराठीला आधारभूत म्हणजे पुणेंकर. तेव्हां त्यांनींच कोंकणीचा अभ्यास आधीं करणें जरूर आहे. ज्यांना भाषेचे आधार बनावयाचें आहे त्यांनीं कष्टांचा बोजा उचलावा हें साहाजिकच नव्हे तर न्याय्यही आहे. गोमंतकीय लेखकांनीं कितीही चांगले कोंकणी शब्द मराठींत कितीही डौलदारीनें ठेवले तरी ' ह्या लोकांना मराठीची ओळखच नाहीं ' असें म्हणण्यास पुणेंकर आणि इतर लोकही कमी करणार नाहींत! कोंकणी शब्द मराठींत येऊं लागले म्हणजे कोंकणी—मराठी वाद आपोआपच मिटला. पुढच्या वर्षी तुम्हीं सर्व साहित्यभक्तांनीं गोव्यास यावें अशी आमची इच्छा आहे. ती सफल केल्यास आम्ही तुमच्यावर कोंकणीचा पाऊस पाडूं. सबब आतां थोड्याच शिंतोड्यांनीं समाधान माना.

# १३. दौ. रॉश दिनीझ ह्यांना निरोप

[पोर्तुगीज हिंदुस्थान सरकारचे कायद्याचे सल्लागार आणि गव्हर्नर जनरलांच्या गैरहजिरींत दोनतीनदां त्यांच्या जागीं नेमले गेलेले दौतोर आकूर्सियु मँदिश् द रॉश दिनीझ हे युरोपियन गृहस्थ हिंदी लोक व त्यांच्या आकांक्षा यांच्याबद्दल फार सहानुभूति दाखवणारे होते. ते गोमंतक सोडून पोर्तुगालास जाते वेळीं त्यांच्या मडगांवच्या मित्रमंडळींनीं ता. ४ आगस्ट १९२९ रोजीं स्टेशनवर त्यांना निरोप देण्याचा छोटासा समारंभ घडवून आणला. त्या प्रसंगीं पोर्तुगीज भाषेंतून केलेल्या भाषणाचा गोषवारा.]

दौ. आ. मँ. द रॉश दिनीझ, मडगांव शहरांतलि आपली हिंदु मित्रमंडळी आपणास निरोप देण्यासाठीं येथें आलेली आहे. स्वतःच्या वैयक्तिक फायद्यावर नजर देऊन आमच्यापैकीं कोणी येथें आला आहे अशी आपण मुळींच कल्पना करूं नये. हा छोटासा समारंभ आम्ही आपण अधिकाराच्या जागेवर अधिष्ठित होण्याच्या वेळीं करीत नसून आपण येथून निघतांना करीत आहों ह्यावरूनच आमच्या हेतूची कल्पना आपण करावी. ज्या हिंदुस्थानानें एका काळीं जगाला ज्ञान दिलें आणि मोठमोठीं साम्राज्यें स्थापिलीं त्या हिंदुस्थानास आज गुलामाप्रमाणें वागावें लागत आहे. शक्तिमान् लोकांची मैत्री करणें हें सोईचें असतें. पण दडपल्या जाणाऱ्या लोकांस जो कोण आपले म्हणवितो तोच मानवतेच्या कसास उतरतो. जे लोक हिंदुस्थानास ओळखतात त्यांतील बहुतेक सगळेच त्याच्या बुद्धिमत्तेचें कौतुक करतात आणि पोर्तुगालविषयीं ममत्वबुद्धि दिसून येत असल्याबद्दलही

त्याची पाठ जोरानें थोपटतात. पण एका बाजूनें त्याच्या ह्या गुणांची तारीफ करणें आणि दुसऱ्या बाजूनें त्याला मिळालेले व मिळावयास पाहिजे असलेले हक्क हिरावून घेणें हें ढोंगीपणाचें लक्षण नव्हे काय? आपणास असला ढोंगीपणा शिवला नाहीं ह्याचीं अनेक उदाहरणें आहेत. पण तीं कालांतरानें प्रसिद्ध व्हावीं अशाच स्वरूपाचीं आहेत. हा एकच गुण हिंदुस्थानचें खरें कल्याण इच्छिणाऱ्या लोकांचें आपण आदरस्थान होण्यास पुरेसा आहे. पण आपल्या अंगीं आणखीही गुण आहेत. आपण नुकतेंच जाहीर रीत्या असें सांगितलें कीं, हिंदुस्थानच्या अंगीं जे गुण आहेत ते लक्षांत घेतां पोर्तुगालनें त्याला वसाहतींप्रमाणें न वागवतां आपल्यालगतच्या आसोरिश् द्वीपसमूहाप्रमाणें वागविलें असतें, पण हिंदुस्थान हें पोर्तुगालपासून फार दूर पडलें असल्यामुळें असें घडून येत नाहीं. ह्यावर प्रश्न असा कीं, हें अंतर तोडून पो. हिंदुस्थान पोर्तुगालास भिडवण्याचा एकादा उपाय आहे काय? आणि जर नाहीं तर त्याच्याकडून हिंदुस्थानास त्याच्या आकांक्षांप्रमाणें वागवण्याचा उपायही कायमचा हरला असें म्हणावयाचें कीं काय? हिंदुस्थानानें सदोदित आजच्या कष्टमय स्थितींतच दिवस कंठावे असा ह्याचा अर्थ होईल काय? नाहीं. तर ज्या वेळीं आपल्यासारख्या अंतःकरणापासून उदारमतवादी असलेल्या लोकांना रिपाब्लिकचीं खरीं तत्वें व्यवहारांत उतरून दाखविण्याची संधि येईल, ज्या वेळीं लायकी असलेल्या माणसांनींच वर चढावें असा काल प्राप्त होईल आणि ज्या वेळीं हिंदुस्थानची प्रजा खालपासून वरपर्यंत आपल्या हक्कांकरितां

मरण्यासही तयार होईल त्या वेळीं हिंदुस्थानाला त्याचें ईप्सित खात्रीनें मिळेल. आपली आठ वर्षांतील वागणूक ह्या तत्वाचें उदाहरण म्हणून पुढें ठेवतां येईल. माझी ओळख आपणास व्यक्तिशः किंवा माझ्या लेखांवरूनही झाली असणें असंभवनीय आहे. कारण ते बहुधा मराठींतून असतात. पण आपल्या नांवाचींच नव्हे तर ज्या बिकट प्रसंगांतून आपणास वाट काढावी लागली त्या प्रसंगांचीही ओळख मी करून घेऊं शकलों आहें. आणि ह्या प्रसंगांत आपण जें स्वतःचें वर्तन ठेवलें त्यामुळेंच मी आपल्याविषयीं आदरबुद्धि बाळगूं लागलों. सरकारी अधिकाऱ्यांचा स्वखुषीनें गौरव करण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग आहे ही गोष्ट आपण लक्षांत घ्यावी. जें काय मीं सांगितलें तें संक्षिप्त असेल. पण त्यांत सर्व कांहीं आलें आहे. शेवटीं मी आपणा सर्वांचें शुभ चिंतितों व सर्वांच्या वतीनें आपणास प्रेमाचा निरोप देतों.

---

## १४. कै. परांजपे ह्यांच्या स्मृतीस—

[ मडगांव येथील श्रीदामोदर वाचनमंदिर ह्या संस्थेचा १२ वा वाढदिवस—समारंभ श्री. ना. नारायण अनंत बांदोडकर ह्यांच्या अध्यक्षतेखालीं ता. १५ आक्टोबर १९२९ रोजीं साजरा झाला. त्या वेळीं अध्यक्षांच्या हस्तें कै. शिवरामपंत परांजपे ह्यांच्या तसबिरीचा अनावरणविधि करण्यांत आला. त्या प्रसंगीं झालेलें भाषण. ]

कै. अण्णासाहेब परांजपे ह्यांची मुख्य कामगिरी म्हणजे तरुणांच्या मनांत त्यांनीं तीव्रतम देशप्रीति उद्दीपित केली ही होय. त्यांचें कोणतेंही लिखाण वाचलें तर त्याच्यामागें जळजळीत देशप्रीतीच असलेली दिसून येते. देशसेवेच्या खालोखाल त्यांच्या वाङ्मयसेवेचा उल्लेख केला पाहिजे. त्यांनीं वाङ्मयाच्या सर्व प्रांतांत विहार केला आहे. मराठी भाषेंतील उच्च प्रतीच्या लेखकांत त्यांची गणना होते. त्यांनीं स्वतःची अशी विशिष्ट लेखनशैली निर्माण केली होती. त्यांच्या वाङ्मयांतील कामगिरीचें श्रेष्ठत्व थोडक्यांत वर्णावयाचें म्हटल्यास, त्यांचें वाङ्मय वाचल्याशिवाय मराठी भाषेचा आपण अभ्यास केला आहे असें कोणासही म्हणतां येणार नाहीं, इतकें सांगितलें म्हणजे पुरे. थोर पुरुषांच्या गुणांचें वर्णन किंवा चित्रांचें अनावरण करावयाचें तें, एका अर्थी, त्यांचे गुण आपल्या अंगांत आणण्यासाठीं होय हें उघड आहे. पण सर्वांनाच हें ध्येय कृतींत उतरविणें शक्य नसतें. तथापि ज्यांच्यामध्यें परांजप्यांसारख्या थोर पुरुषांचे गुण बीजावस्थेंत असतात त्यांना त्या गुणांचा विकास करण्याच्या कामीं मदत करणें हें मात्र सर्वांनाच सुशक्य असतें. उच्च प्रतीचे देशभक्त किंवा वाङ्मयनिर्माते हे निसर्गतःच जन्मावे लागतात हें

कबूल. परंतु श्रेष्ठ देशप्रीति आणि उच्च वाङ्मय ह्यांच्या निर्मितीस आवश्यक असें वातावरण उत्पन्न करणें इतरेजनांनाही शक्य असतें हें विसरून चालणार नाहीं. उदाहरणार्थ, एकाद्या आकिंचन विद्वानानें लिहिलेला उत्तमोत्तम ग्रंथ अमुद्रित स्थितींत पडून राहिला तर तदंतर्गत वाङ्मय निर्माण झालें नाहीं असेंच व्यवहारत: म्हणावें लागेल. पण आपण सामान्य लोकांनीं गरीब पण श्रेष्ठ दर्जाच्या वाङ्मयसेवकांत जर असा विश्वास उत्पन्न केला कीं, आपलें पुस्तक छापून प्रसिद्ध होण्याचाच काय तो अवकाश, त्याच्या प्रती खपून छपाईसाठीं आलेला सर्व खर्च खात्रीनें भागून निघेल, तर त्या विद्वानास उत्तेजन मिळून तो आपला ग्रंथ प्रसिद्ध करील व चांगल्या वाङ्मयाच्या निर्मितीस आपण अंशत: कारणीभूत झालों असें म्हणतां येईल. ह्यासाठीं कै. अण्णासाहेबांसारखे वाङ्मयमुकुटमणि किंवा देशसेवक आपल्यांत निपजावे किंवा सुप्तावस्थेंत असलेले उदयास यावे अशी जर आपली खरीखुरी इच्छा असली तर, ठराविक कालमर्यादेंत एकादें तरी चांगलें पुस्तक आपण विकत घेईन, एकाद्या तरी चांगल्या नियतकालिकाचा वर्गणीदार होईन आणि एकाद्या तरी देशसेवकास ह्या ना त्या रीतीनें मदत करीन, असा निश्चय प्रत्येकानें केला पाहिजे. वाङ्मयांतील उत्तमोत्तम ग्रंथांपैकीं कांहींचें तरी वाचन व मनन आपण नियमितपणें करीत राहीन आणि सार्वजनिक मोफत वाचनालयांखेरीज इतरत्र शक्य तोंवर फुकट वाचणार नाहीं, अशीही प्रतिज्ञा सुशिक्षित लोकांनीं करून ती पाळली पाहिजे. असें झालें तरच अण्णासाहेबांसारख्या थोर वाङ्मयोपासकांच्या तसबिरी अनावृत केल्याचा उपयोग. नपेक्षां त्या उलट्या टांगल्या तरीही सारखेंच!

---

## १५. लोकसत्तावादी आलमैद ह्यांचें कार्य.

[ पोर्तुगालच्या लोकसत्तेचे एक उत्पादक, कैवारी आणि रिपब्लिकचे एकदांचे अध्यक्ष, त्याचप्रमाणें शीलवान् याज्ञाथोपासक दौ. आन्तॉनियु इयुजॅ द आलमैद हे लिस्बन येथें ता. ३१ आक्टोबर १९२९ रोजीं निधन पावले. त्यांच्याबद्दल आदरभाव व्यक्त करण्याकरतां त्याच सालच्या ता. १ डिसेंबर रोजीं नवीन गोवें येथें मुनिसिपालटीच्या दिवाणखान्यांत पोर्तुगीज हिंदुस्थानवासीयांतर्फे एक जाहीर सभा भरवण्यांत आली होती. ह्या सभेचें अध्यक्षस्थान तिसवाडी मुनिसिपालटीचे अध्यक्ष व कायदेमंडळाचे एक माजी सभासद सि. सालिश् द आंद्रादि ह्यांना देण्यांत आलें होतें. त्या प्रसंगीं झालेलें भाषण.]

अध्यक्षमहाशय व सद्गृहस्थहो, मला आपण कोंकणी भाषेंतून बोलण्याची परवानगी द्यावी. आमचे किरिस्तांव बंधु आपला कोणी आप्तेष्ट वारल्या वेळीं जे दुःखोद्गार काढतात ते पोर्तुगीज भाषेंतून 'ऑ मेव् देउश्' असे काढण्याऐवजीं 'मुझ्या देवा', 'सायबा तूं भोगोस' असे कोंकणींतूनच काढीत असतात. ह्यावरून गोमंतकीय ख्रिस्ती लोकांची अंतःकरणाचे खरे भाव व्यक्त करण्याची भाषा कोंकणीच आहे असें दिसून येतें. माझी सभांतून बोलण्याचा नेहमींची भाषा मराठी असते आणि प्रयत्न केला तर मी आज पोर्तुगीजही बोलूं शकलों असतों. पण दौ. आलमैद ह्यांच्याबद्दल मीं व्यक्त केलेला आदर आपल्या अंतःकरणावर ठसावयाचा झाला तर तो कोंकणींतूनच करणें युक्त असें वाटूनच मी तिचा आश्रय घेत आहें. मराठींतून बोललों असतां माझ्या भाषणाचा विपर्यास होण्याचा जो संभव आहे तोही कोंकणीमुळें टळावा अशी माझी अपेक्षा आहे.

दौ. आल्मैद केव्हां व कोठें जन्मले, ते काय शिकले, किती श्रीमंत झाले, त्यांना किती मुलें झालीं वगैरेसंबंधीं आजच्या प्रसंगीं बोलण्यांत फारसा अर्थ नाहीं. ते एक माणूस होते हें सर्वांस ज्यावरून ठाऊक आहे त्यावरून ते केव्हांतरी जन्मले, कांहीं काळ जगले व एक दिवस मेले हें त्यांनीं सहज ताडलें असेल. पण एवढ्यावरून ते आजच्यासारख्या निवडक सभेच्या आदरास पात्र झालेले नाहींत. नुसतें जन्मून मरणाऱ्याचे गोडवे सार्वजानिक रीत्या कोणी गात नाहींत व गाऊं म्हटलें तर तें शक्यही नाहीं. कारण दर मिनिटास जगांत २¼ लोक जन्मतात व २ मरतात असा एकानें हिशेब काढला आहे. ह्या सर्वांचें गुणवर्णन करूं बसल्यास इतर कामास कोणास कधीं वेळ मिळेल ? मृत माणसांत जेव्हां सर्वसामान्य लोकांहून कांहीं विशेष आढळून येतो तेव्हांच तो सामुदायिक आदरास पात्र होत असतो. तेव्हां दौ. आल्मैद ह्यांचा विशेष काय तेंच पाहणें आजच्या प्रसंगीं उचित होईल.

दौ. आल्मैद ह्यांचा विशेष किंवा असामान्य गुण संक्षेपतः सांगावयाचा झाला तर असें म्हणतां येईल कीं, ते लोकसत्तेचे हुतात्मे व गरिबांचे कैवारी होते. लोकसत्तेचें महत्व जनतेस शिकवण्यास जेव्हां त्यांनीं प्रारंभ केला तेव्हांची पोर्तुगालची स्थिति अत्यंत बिकट होती. राजाच्या हातांत राज्यकारभाराची सारी सत्ता केंद्रीभूत करावी असे प्रयत्न दीयश् फेरैर व झ्युत्रांव फ्रांकु ह्या मुख्य प्रधानांकडून जोरानें चालले होते. अर्थात् दौ. आल्मैद-सारख्या सत्ताविभागणीच्या तत्वाच्या पुरस्कर्त्यांना स्वमतप्रसार

करण्याकरतां दंड, कैद, हद्दपारी वगैरेंची शिक्षा भोगावी लागत असे. ही शिक्षा त्यांनीं आनंदानें भोगली, पण आपलें ब्रीद सोडलें नाहीं, ह्यांतच त्यांचा मोठेपणा आहे. ह्या त्यांच्या मोठे-पणाकडे पाहिलें म्हणजे मी आपणा स्वत:लाच असा प्रश्न करूं लागतों कीं, दौ. आल्मैद ह्यांच्याबद्दलचा आदर व्यक्त करण्यास मी पात्र आहें काय ? त्यांनीं लोकसत्तेच्या वाढीकरतां, लेखन-वाचनाच्या स्वातंत्र्याकरतां, राजकीय सत्तेच्या विभागणीकरतां कमालीचा स्वार्थत्याग केला व अनन्वित असे जाच सहन केले. पण मी ह्या कार्याकरतां काय करतों आहें ? स्वमतप्रसाराच्या आड आलेल्या अडचणी कापून काढून शूरवीराप्रमाणें सतत चालत राहावें हा त्यांचा बाणा.आणि आलेल्या अडचणी कितीही अन्याय्य व अहितकर असल्या तरीही षंढाप्रमाणें त्यांना मान वांकवणें हा माझा बाणा ! तेव्हां मी कोणत्या तोंडानें त्या हुता-त्म्याबद्दलचा आदरभाव व्यक्त करावा ?

कायद्यानें निषिद्ध मानलेल्या गोष्टी आपण न केल्या म्हणजे आपणाकडे केवढ्याही सामर्थ्यवान् माणसांच्यानें तिरप्या डोळ्यांनीं बघवणार नाहीं असा विश्वास प्रत्येक नागरिकाच्या अंत:करणांत ज्या वेळीं उत्पन्न होतो त्याच वेळीं कायद्याचें महत्व लोकांना मानावें लागतें. जनतेची नीतिमत्ता बिघडावी, लोकांनीं एकमेकांचे खून किंवा लुटालूट करण्यास प्रवृत्त व्हावें किंवा देशांत बजबजपुरी माजावी, अशा प्रकारचें कांहींएक न करतां, आपण सत्य, न्याय्य, फायदेशीर, पण कित्येक वेळां अत्यंत अप्रिय असें बिनहरकत लिहूं किंवा बोलूं शकतों,

अशी ग्वाही कायदा देत नसेल तर त्याची मातब्बरी खऱ्या नागरिकाला मुळींच राहणार नाहीं. सरकार ही जी संस्था उत्पन्न झाली आहे तिचें मुख्य कार्य असा विश्वास जनतेंत उत्पन्न करणें हेंच असतें. जें सरकार नागरिकांत हा विश्वास उत्पन्न करूं शकत नाहीं तें सरकार रानटी मानावें लागतें असें दौ. आं. झ्यु. द आल्मैद ह्यांचें मत होतें. ज्या वेळीं त्यांनीं आपल्या कार्यास प्रारंभ केला त्या वेळच्या सरकारनें अर्थात् राजसत्तेनें आपल्या अपकृत्यांनीं जनतेचा विश्वास उडवून टाकला होता. हा विश्वास पुन: प्रस्थापित केल्याशिवाय जनतेच्या मनांत पोर्तुगालच्या उज्ज्वल भवितव्याबद्दल आशा उत्पन्न होणार नाहीं आणि त्याबद्दल झटण्यासही ते प्रवृत्त होणार नाहींत असें वाटून त्यांनीं प्रथम राज्ययंत्रच बदलून घेण्याचा निश्चय केला व आपल्या कर्तबगारीनें तो सिद्धीस नेऊन आम्हां सर्वांस आजचे दिवस दाखवले.

पण दौ. आल्मैद ह्यांची देशभक्ति संकुचित नव्हती. पोर्तुगालनें स्वातंत्र्य उपभोगावें व इतर देशांनीं पारतंत्र्याच्या गर्तेंत कुजत पडावें अशी त्यांची विचारसरणी बिलकूल नव्हती. तशी ती असती तर माझ्या मनांत त्यांच्याविषयीं तितकासा आदरभाव राहिला नसता. दौ. आल्मैद ह्यांनीं राजसत्तेच्या कालांत हिंदु समाजाच्या हितसंबंधांची तरफदारी पार्लमेंटांत अत्यंत जोरानें केली. पण ह्या त्यांच्या कृत्याबद्दल मला जितकें समाधान वाटतें, त्यापेक्षां हजारों पट अधिक समाधान त्यांच्या वरील विचारसरणीमुळें वाटतें. पोर्तुगालनें जसें स्वत: स्वतंत्र

व लोकसत्ताक राहिलें पाहिजे तसेंच इतर देशांनींही राहिलें पाहिजे, इतकेंच नव्हे तर शक्य झाल्यास पारतंत्र्य झुगारून देऊं इच्छिणाऱ्या प्रत्येक देशास पोर्तुगालकडून साह्य मिळावें इतकें त्यांचें सामर्थ्य वाढलें पाहिजे, असें दौ. आल्मैद ह्यांचें मत होतें. ते केवळ पोर्तुगालचे हितकर्ते असते तर पोर्तुगाललाच त्यांचें महत्व वाटलें असतें. पण ते स्वतंत्रतादेवीचे निस्सीम व स्थलातीत उपासक होते व म्हणूनच पोर्तुगालप्रमाणें इतरत्रही त्यांच्याविषयीं आदर असलेला आढळून येतो. अशा पुरुषाविषयीं आदरभाव व्यक्त करण्यासही कांहीं अधिकार लागतो कीं नाहीं ? तो अधिकार आपणास आहे काय, हाच प्रश्न आज माझ्या मनांत पुन: पुन: येतो व आपल्याही मनांत तो येत असेल असें मी समजतों.

दौ. आल्मैद ह्यांनीं डॉक्टरीच्या धंद्यावर पुष्कळ पैसा कमावला व पोर्तुगीज साम्राज्यांत मोठ्यांत मोठा जो मान मिळणें शक्य आहे तो रिपब्लिकच्या अध्यक्षपदाचा मानही त्यांनीं मिळविला. पण त्यांची थोरवी त्यांनीं मिळवलेल्या पैशांतही नाहीं आणि मानांतही नाहीं असें समजणारा मी आहें. तर त्यांची थोरवी त्या पैशाचा स्वत:च्या ध्येयसिद्धीसाठीं जो त्यांनीं त्याग केला त्यांत आहे. रिपब्लिकच्या अध्यक्षपदाच्या मानाची गोष्ट घेतली तर तो बलवान् व युक्तिवान् माणसास मिळवितां येतो, त्याकरतां माणूस खरोखरच लोकसत्तेचा भोक्ता असावा लागतो असें नाहीं हें जगांतील अनेक देशांच्या उदाहरणावरून दाखवतां येतें. पण त्या पदावरून दौ.आल्मैद ह्यांनीं लोकसत्ताविभागणीचा

जो पुरस्कार केला आणि गरिबांबद्दल जो कनवाळूपणा दाखवला त्यांतच त्यांचें महत्व आहे. हा त्यांचा कनवाळू स्वभाव लक्षांत घेऊनच मी जुतीं घालून व साधा पोषाख करून ह्या झकपक सभेंत येण्यास धजलों. जुतीं घालणारा हा प्राणी एकदम अध्यक्षांच्या टेबलाजवळच्या खुर्चीवर जाऊन कसा बसूं शकतो आणि त्या थोर पुरुषाच्या चरित्रावर बोलण्यास कसा धजतो हें जें कोडें पुष्कळांस पडलें असल्याचें मला त्यांच्या चेहऱ्यावरून दिसून आलें, तें त्यांना आतां उलगडलें असलें पाहिजे. असो.

दौ. आल्मैद ह्यांच्या कार्याविषयीं बोलावें तितकें थोडेंच होणार आहे. पण जातां जातां मला इतकेंच सांगितलें पाहिजे कीं, त्यांची इच्छा पुरवण्यास प्रत्येकानें झटणें हेंच आम्हां सर्वांचें कर्तव्य आहे. मृत माणसाची अंतिम इच्छा पुरवली तर त्याच्या आत्म्याला मोक्ष मिळतो, ह्यासाठीं त्याच्या वंशजांनीं ती इच्छा पुरवावी, असें आमच्या हिंदु धर्माचें सांगणें आहे. दौ. आल्मैद ह्यांची इच्छा कोणती होती तें ठरवावयाचें असल्यास त्यांना कोणत्या ध्येयाचा निदिध्यास होता तें लक्षांत आणलें म्हणजे पुरे. पूर्ण लोकसत्ता हाच त्यांच्या निदिध्यासाचा विषय होता. तेव्हां त्यांच्याविषयीं प्रकट करावयाचा आदरभाव जर अंत:करणापासूनचा असेल तर आपण असा निश्चय केला पाहिजे कीं, ह्या ध्येयाप्रीत्यर्थ आपण यावच्छक्य झटत राहूं.

# अभिप्राय

गोमंतकीय साहित्यसेवक व 'हिंदु' पत्राचे संपादक या नात्यानें श्री. पै सुप्रसिद्ध आहेत. गोमन्तकासारख्या पोर्तुगीज अंमलाखालीं मराठी भाषा जिवंत ठेवण्यांत त्यांनीं जे परिश्रम घेतले आहेत व ते घेत आहेत ते केवळ अपूर्व आहेत. त्यांनीं वेळोवेळीं केलेल्या भाषणांचा हा संग्रह वाचकास विचारप्रवर्तक व उद्बोधक वाटल्याशिवाय राहणार नाही. त्यांच्या या पुस्तकांत, भावी गोमंतकाची पूर्वतयारी, फिरंगी औदार्याचें सत्यस्वरूप, स्वराज्याची मीमांसा, गोमंतकांतील शुद्धीचें रहस्य, मराठा गायक वर्गास चार शब्द, गोमंतकांतील मराठीची स्थिति इत्यादि राजकीय, सामाजिक धार्मिक, वाङ्मयिक वगैरे अनेक विषयांवरील भाषणें संकलित केलेलीं आहेत. गोमंतकाच्या परिस्थितीची थोडक्यांत कल्पना येण्यास हीं भाषणें उपयोगी पडतील. श्री. पै यांची भाषा सोज्ज्वळ आहे. एकंदरींत पुस्तक वाचनीय व संग्रहणीय आहे. —चित्रमयजगत्, मे १९३१.

---

गोमंतकांतील एक सुप्रसिद्ध वाङ्मयभक्त व सामाजिक कार्यकर्ते श्री. द. व्यं. पै ह्यांनी निरनिराळ्या प्रसंगीं केलेल्या पंधरा भाषणांचें संकलन ह्या पुस्तकांत केलेलें आहे. भाषणें राजकीय, सामाजिक, ललितकलाविषयक अशा विविध विषयांवर असल्याकारणानें, पुस्तक कंटाळवाणें होत नाहीं. प्रत्येक विषयावरील मतप्रतिपादनही प्रशंसनीय आहे. सर्वच विषयांवर जरी आमचें श्री. पै ह्यांच्याशीं मतैक्य होत नसलें, तरी हें पुस्तक सामाजिक व राजकीय क्षेत्रांत कार्य करीत असणाऱ्यांना लाभदायक झाल्यावांचून राहणार नाहीं, एवढें मात्र आम्ही निःसंशय सांगूं शकतों. पुस्तकाची छपाई सुबक व किंमतही अगदीं माफक आहे.

—वागीश्वरी, वैशाख १८५३.

---

४३४९

गोमंतकांतील शुद्धिप्रकरण व मडगांव येथील महाराष्ट्र-साहित्य-संमेलन ह्या निमित्तानीं आपल्या गोमंतकस्थ बांधवांची सांप्रतची स्थिति व त्यांच्या चळवळी यांकडे महाराष्ट्रीयांचें लक्ष अलीकडे बरेंच वेधलें आहे. ह्या चळवळींचे एक प्रमुख पुरस्कर्ते व मडगांव येथील 'हिंदु' पत्राचे विद्वान् संपादक श्री. दत्तोपंत पै यांनीं तत्प्रांतीय सामाजिक, राजकीय व भाषिक विषयांवर गेल्या पांचसहा वर्षांत जीं अनेक भाषणें केलीं, त्यांपैकीं १५ निवडक भाषणांचा हा लहानसा संग्रह त्यांनीं आतां प्रसिद्ध केला आहे. यांतील कांहीं भाषणें अतिशय त्रोटक आहेत; परंतु 'भावी गोमंतकाची पूर्वतयारी', 'स्वराज्यमीमांसा', 'गोमंतकांतील शुद्धीचें रहस्य', 'गोमंतकांतील मराठीची स्थिति' अशासारख्या गोमंतकाच्या व पर्यायानें महाराष्ट्राच्या दृष्टीनेंही अतिशय जिव्हाळ्याच्या प्रश्नांची त्यांनीं जी समयानुरूप चर्चा केली आहे, तिजवरून त्यांची लोकहितविषयक कळकळ, स्वकीय गाऱ्हाण्यांचें मार्मिक ज्ञान, खडेतोड कोटिक्रम व महाराष्ट्रीय बाणा हीं चांगलींच व्यक्त होत आहेत. अर्थात् हीं छापील निवडक भाषणें गोमंतकस्थांना तर पसंत पडतीलच; पण एकंदर महाराष्ट्रीयांसही तीं उद्बोधक वाटण्यासारखीं असल्यामुळें प्रस्तुत लघुसंग्रह वाचनीय झाला आहे.

—लोकशिक्षण, ज्येष्ठ १८५३.

REFBK-0004349

# द. व्यं. पै ह्यांचीं पुस्तकें

**पोर्तुगेज भाषा-प्रवेश**—तर्खडकरकृत भाषांतरपाठमालेच्य धर्तीवर रचलेलें पुस्तक. लिहिण्यावाचण्यापुरतें पोर्तुगीज भाषेचें आणि तिच्या व्याकरणाचें ज्ञान सुलभपणें करून देतें. मराठ शिक्षण संपवून पोर्तुगेज शिकूं जाणाऱ्या विद्यार्थ्यांस बक्षिसा दाखल देण्यास उपयुक्त. किंमत १। रु.

**गोमंतकाचा भूगोल**—मराठी दुसऱ्या व तिसऱ्या इयत्तेंत शिकण्यास उपयुक्त. किंमत ३॥ आणे.

**गोमंतकाची राज्यव्यवस्था**—मराठी चौथ्या व पांचव्य इयत्तेंत शिकवणें उपयुक्तच नव्हे तर अत्यावश्यक असें हें पुस्त आहे. शिक्षक, व्यापारी व कोणीही नागरिक ह्यांना नेह जरूर लागणारी माहिती ह्यांत आहे. ह्या पुस्तकाचा उपयो विद्यार्थ्यांस बक्षिसें देण्यासाठींही करणें अवश्य आहे.

घाऊक घेणाऱ्यांस भरपूर कमीशन दिलें जाईल. शाळांस कमीशन दिलें जाऊन टपालखर्च माफ केला जाईल.

मिळण्याचें ठिकाण:—**हिंदु छापखाना, मडगांव.**

Suplemento ao "Hindu", n.° 48 do ano 7.°
Margão, 1-4-1931.